
# लोकराज्य

एप्रिल । २०१३ । किंमत ₹१०



# शिवरायांचे आज्ञापत्र



आरमारास तख्ते, सोंट, डोलाच्या काठ्या
आदिकरून थोर लाकडे असावी लागतात.
आपले राज्यांत अरण्यांत
सागवानादि वृक्ष आहेत, त्यांचे जे अनुकूल
पडेल ते हुजूरचे परवानगीने बाहेर न्यावे.
याविरहित जे परमुलुखीहून
खरेदी करून आणवीत जावें. स्वराज्यातील
आंबे, फणस आदिकरून हेही लांकडे
आरमाराचे प्रयोजनाचीः परंतु त्यास हात
लावूं देऊ नये. काय म्हणोन कीं, झाडे
वर्षा-दोन वर्षांनी होतात असें नाही.
रयतांनी ही झाडे लावून लेकरासारखी
बहुत काळ जतन करून वाढविली. ती झाडें
तोडिल्यावर त्याचे दुःखास पारावार काय?
एकास दुःख देवून जे कार्य करीन म्हणेल ते कार्य
कारणारास हित स्वल्पकाळचें बुडोन
नाहीसेंच होतेः किंबहुना धनियाचे पदरी
प्रजापिडण्याचा दोष पडतो. या वृक्षाच्या
अभावें हानिही होत्ये. याकरिता हे गोष्टी
सर्वथैव होऊं न द्यावी. कदाचित एखादें
झाड बहुत जीर्ण होऊन कामांतून गेलें
असले तरी त्याचे धन्यास राजी करून घेऊन
द्रव्य देऊन त्याचे संतोष देऊन तोडून न्यावे.

संदर्भ : आज्ञापत्र,
संपादक : ग. ह. खरे; श्री. र. भिडे

RABHA

वर्ष ६५ वे | अंक १ | एप्रिल २०१३

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

■ मुख्य संपादक प्रमोद त्र्यं. नलावडे

■ व्यवस्थापकीय संपादक प्रल्हाद जाधव

■ संपादक सुरेश वांदिले

■ कार्यकारी संपादक प्रभाकर मुराळकर

■ उपसंपादक किरण केंद्रे

■ प्रशासन व वितरण अधिकारी दिगंबर पालवे

■ वितरण अधिकारी विलास बोडके
दत्तात्रय कोकरे

■ साहाय्य विद्या कदम

■ मुखपृष्ठ राभा

■ मांडणी, सजावट संदीप पवार,

■ मुद्रण एच. टी. मीडिया लि.
दिघे, नवी मुंबई

■ संपादकीय पत्ता ■
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
संपादकीय संपर्क : ०२२-२२८८२८८८

e-mail : lokrajya@dgipr.maharashtra.gov.in
lokrajya2011@gmail.com

ई-लोकराज्यसाठी
Website : http://dgipr.maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारणासाठी संपर्क - ०२२-२२०२१५३०
वितरण संपर्क - ०२२-२२०२३९५७

e-mail : lokvitran@dgipr.maharashtra.gov.in
lokrajyavitaran@gmail.com

# अंतरंग



## वारसा जपूया

महाराष्ट्रातील जंगले जैववैविध्य आणि विपुल पक्षी व प्राणीसंपदेने समृद्ध आहेत. राज्य शासनाचा वन विभाग याचे संरक्षण करण्यासाठी कटिबद्ध आहे. मात्र वनांचे संरक्षण आणि संवर्धन हे केवळ वनखात्याचे काम नाही. वने हा आपला सर्वांचा वारसा आहे. तो जपणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

६

## संवर्धन आणि संस्कृती



देशातील आणि जगातील सर्वाधिक प्रगतशील आणि आघाडीचं राज्य म्हणून महाराष्ट्राचा लौकिक आहे. वाढत्या औद्योगिकीकरण आणि नागरिकीकरणामुळे राज्याच्या वनक्षेत्रात होत असलेली घट थांबविण्याबरोबरच वनक्षेत्रात वाढ करण्याचं एक मोठं आव्हान आपल्यासमोर आहे.

८

## महाराष्ट्र ते महा-वन-राष्ट्र



महाराष्ट्र ही संताची आणि शूरवीरांची भूमी आहे. इथल्या संतांनी निसर्ग संवर्धनाचे बीज आपल्या संत साहित्यातून पेरून ठेवले आहे. आपल्या सर्वांचे आराध्यदैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांनी वनसंवर्धनासाठी आज्ञावली काढल्या आहेत. प्रत्येकाने हिरवाई कशी वाढेल यासाठी प्रयत्न करायला हवेत.

१०




## वनव्यवस्थापनात लोकसहभाग

महाराष्ट्रात वनखात्याची जमीन असलेल्या पंधरा हजार गावांपैकी १२ हजार ७६० गावांत संयुक्त वनव्यवस्थापन व वनसंरक्षण समित्या स्थापन करण्यात आल्या असून, महाराष्ट्राने देशात आघाडी घेतली आहे.

२२

| | | |
|---|---|---|
| वृक्षवल्ली आम्हां सोयरी | संपादकीय | ५ |
| जैव विविधतेचे जतन | भास्कर जाधव | १२ |
| सहअस्तित्वाचा विश्वास | प्रवीण परदेशी | १३ |
| व्याघ्रप्रकल्पांच्या वाटेवर... | ए. के. मिश्रा, एच. व्ही. माडभुषी | १७ |
| बोर अभयारण्य | अनिल गडेकर | २१ |
| चेतना चिंतामणीचे गाव | गौरी सूर्यवंशी | २५ |
| नवा अध्याय | गणेश देशमुख | २८ |
| आनंदसागर | डॉ. दिलीप यार्दी | ३२ |
| सागरेश्वराचा सुगंध | टी. यू. शेवते | ३६ |
| 'कले'ची सुटका | आर. व्ही. गोळे | ३७ |
| समृद्धीचा प्राणवायू | किशोर रिठे | ४० |
| वने आणि उपजीविका | टी. एस. के. रेड्डी | ४३ |
| सहल वनातली | आर. के. वानखडे | ४५ |
| संजय गांधी राष्ट्रीय: उद्यान संस्मरणीय सफर | सुनील लिमये | ४६ |
| परिवर्तनाचा सुसंवाद | राजेंद्र सरग | ५० |
| वनसंपदेचा इतिहास | चारुशीला बा. चंदनशिवे | ५३ |
| साद घालती रानवाटा | टीम लोकराज्य | ५४ |
| दुर्मीळ खजिना गवसला | किरण केंद्रे | ५६ |
| अर्थसंकल्प २०१३ - समृद्धीचे नवे पर्व | -- | ५८ |
| नांदेड : काल आणि आज | सुधाकर डोईफोडे | ६० |
| टंचाईला मदत अन् रेल्वे रुळावर ! | प्रवीण टाके | ६४ |
| हसरं बाळ : एचआयव्हीमुक्त बाळ | शैला खांडगे | ६६ |

### साहित्यिकांनी अधिकाधिक लाभ घ्यावा




महाराष्ट्र शासनातर्फे प्रकाशित होणारे लोकराज्य मासिक अनेक कारणांनी लक्षवेधी असूनही मराठी साहित्य वर्तुळाकडून काहीसे दुर्लक्षितच राहिले आहे. अवघ्या दहा रुपयांमध्ये सुमारे साठहून अधिक पानांचा भरगच्च मजकूर यातून वाचकांपुढे येत असतो. लोकराज्यचा खपही चार लाखाहून अधिक असल्याने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात हे अंक पोचत असतात. आज सगळीकडेच वृत्तपत्रांचे स्थानिकीकरण झालेले असताना संपूर्ण महाराष्ट्रातील वाचकांपर्यंत आपले साहित्य पोहोचवण्यासाठी लोकराज्य हा उत्तम मार्ग आहे.

**- भानू काळे,** संपादक, अंतर्नाद, पुणे


### ज्ञानकक्षा विस्तारल्या

लोकराज्य मासिकाच्या फेब्रुवारीचा अंक नुकताच वाचनात आला. २७ फेब्रुवारी रोजी कविवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस होता. यानिमित्त लोकराज्यने हा फेब्रुवारी महिन्याचा अंक हा 'मराठी भाषा विशेषांक' म्हणून प्रकाशित केला आहे. मराठी भाषा संवर्धनात लोकराज्यने हा महत्त्वपूर्ण वाटा उचलला आहे असे वाटते. अंकात मराठी भाषेच्या सौंदर्याचे आणि सामर्थ्याचे विविध पैलू मांडले आहेत. त्यादृष्टीने विविध मान्यवरांच्या लेखांचा समावेश करण्यात आला आहे. हे लेख वाचकांची ज्ञानकक्षा आणखी विशाल करण्यासाठी उपयुक्त ठरतात. अंकातून मराठी भाषा संवर्धनाची संपादकांची तळमळ स्पष्टपणे जाणवते, याचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे.

**- हेमंत लक्ष्मण पवार,** संपादक- साप्ता. अभिरेखा, सांगली


### जगण्याचा सुसह्य मार्ग

दिवसभर शेतात चिखलमातीत राबून मिळवलेल्या मजुरीतून वार्षिक वर्गणी भरून मी लोकराज्य अंक घेऊन त्यातील शब्द न् शब्द वाचत असतो. अंकातील सर्व विषयांची समर्पक माहिती लोकांना, विद्यार्थ्यांना देत असतो. त्यामुळे सर्वांना उमेद व प्रोत्साहन मिळते. सतत नशिबाला दोष देत राहणाऱ्या जनतेला, शेतकऱ्यांना अंकातील माहितीने जगण्याचा सुसह्य मार्ग उपलब्ध झाला आहे. ग्रामीण भागातील सर्व लोक, विद्यार्थी, महिला कौतुक करताहेत. कमी किंमत, उत्तम कागद, आकर्षक स्वरूप, कलात्मक मांडणी, वास्तववादी जिव्हाळ्याची परिपूर्ण माहिती हे लोकराज्यचे वैशिष्ट्य आहे.




**- पी. आर. मोहिते,**
अध्यक्ष, श्रमिक सेवा विकास संघ,
नागरदळे.

### उत्तम संदर्भ




स्व. वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने माहे डिसेंबर २०१२ मध्ये प्रकाशित केलेल्या विशेषांकामध्ये अनेक विभागांच्या महत्त्वपूर्ण निर्णयाचे विश्लेषण, ठळक नोंदी, दुर्मीळ छायाचित्रे यांची अत्यंत आकर्षक पद्धतीने मांडणी केलेली असून हा अंक एक उत्तम संदर्भ म्हणून संग्रही ठेवण्यासारखा आहे; याशिवाय त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत राबविलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांचे बदलत्या काळाच्या संदर्भात केलेले विश्लेषण या अंकाचे वैशिष्ट्य ठरले आहे.

लोकराज्यच्या अंकातून कृषी, सहकार, आदिवासी, कामगार, शिक्षण आदी क्षेत्रांत स्व. वसंतराव नाईक यांनी केलेल्या योगदानाबद्दल मान्यवरांनी लिहिलेले लेख आजच्या युवा पिढीला दीपस्तंभासारखे प्रेरणादायी ठरतील.

पुढच्या काळातदेखील अशीच उपयुक्त माहिती लोकराज्यच्या अंकातून प्रकाशित केली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**- शिवाजीराव देशमुख,** सभापती, महाराष्ट्र विधान परिषद

### तलाठ्यांना भेट




लोकराज्यचा जानेवारी २०१३ चा विशेषांक महसूल विभागाच्या सुवर्ण जयंती राजस्व अभियानावर प्रकाशित झाला. या विशेषांकात अभियानाअंतर्गत चालणाऱ्या इ-फेरफार, इ-चावडी, फेरफार अदालत, दाखले शिबिर इत्यादी वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांचा तपशील देण्यात आला आहे. त्यामुळे हा विशेषांक प्रत्येक महसूल अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी संग्रहणीय असाच आहे. विशेषांकाचे हे महत्त्व लक्षात घेऊन तहसील कार्यालय पालम, जिल्हा परभणी येथील नायब तहसिलदार कैलासचंद्र वाघमारे यांनी आपल्या अधीनस्थ सर्व तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांना अंक स्वखर्चाने सप्रेम भेट दिले. याप्रसंगी तहसिलदार एम. आर. प्रत्येकी, तालुका तलाठी संघटनेचे अध्यक्ष एस्. डी. मुलगीर, उपाध्यक्ष अरविंद डांगे इत्यादी उपस्थित होते.

'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...

वार्षिक वर्गणी - वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००/-)

*या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी

http://dgipr.maharashtra.gov.in

# वृक्षवल्ली आम्हां सोयरी



**लो**कराज्यच्या सर्व वाचक, वर्गणीदार, लेखक यांना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा देताना अतिशय आनंद होत आहे. या महिन्यापासून आपला 'लोकराज्य' ६५ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. लोकराज्यचा प्रवास स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मुंबई राज्य असल्यापासून अव्याहतपणे सुरू आहे. द्विभाषिक राज्य, संयुक्त महाराष्ट्रात हा प्रवास अखंडितरीत्या सुरू राहिला. या कालावधीत लोकराज्यने महाराष्ट्रप्रेमी जनांच्या मनामनात आणि घराघरात प्रवेश केला आहे. ६५ वर्षांची ही यशस्वी वाटचाल वाचकांचा पाठिंबा आणि शासनाच्या सक्रिय सहकार्यामुळे शक्य झाली.

२२ एप्रिल रोजी जागतिक वसुंधरा दिन साजरा केला जातो. आपली पृथ्वी आणि पृथ्वीवरील वनसंपदा, जलसंपदा, वन्यप्राणी, जलचर यांच्याविषयी ममत्वभाव निर्माण व्हावा आणि निसर्गाचे संतुलन राखण्याच्या जबाबदारीसाठी या दिनानिमित्त सर्व जगभर जनजागृती केली जाते. या पार्श्वभूमीवर लोकराज्यचा हा अंक वनसमृद्धी विशेष म्हणून प्रकाशित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राला लाभलेल्या ३ लाख ७ हजार ७१३ चौरस किलोमीटर क्षेत्रात ६१ हजार ९३९ चौरस किलोमीटर वनक्षेत्र आहे. हे एकूण क्षेत्राच्या २० टक्के भरते. सह्याद्रीच्या पर्वतरांगांतील पश्चिम घाट, सातपुडा पर्वतरांगा, अजिंठ्याचे डोंगर, बालाघाट, विदर्भातील गाविलगड, ताडोबा, सिरोंचा या प्रदेशातील समृध्द वने हे महाराष्ट्राचे वैभव होय. विदर्भात राज्याच्या ३८ टक्के वनक्षेत्र आहे ही बाब विशेषत्वाने नमूद करावीशी वाटते. महाराष्ट्रात नवेगाव, बोरिवली (मुंबई), गुगामल (अमरावती), पेंच, ताडोबा, चांदोली अशी सहा राष्ट्रीय उद्याने; ४३ अभयारण्ये आणि मेळघाट, ताडोबा, पेंच, सह्याद्री हे चार व्याघ्र प्रकल्प आहेत.

भारतीय संस्कृतीत वनांना देवतेच्या रूपात बघितलं जातं. मानवी संस्कृती वन आणि नद्यांच्या आधारावर विकसित झाली हे आपण जाणतोच. प्राचीन काळी वनदेवतेची पूजा केली जायची. आताही केली जाते. मात्र औद्योगिकीकरण आणि आधुनिकीकरणाच्या रेट्यात वृक्षदेवतेवर घाला घालण्यास मानवाने कमी केले नाही. आता वनाकडे व्यावहारिक दृष्टीने आणि मानवाच्या निकड, गरजा, सोयी, सुविधा याचा आधार म्हणून बघितले जाते. पर्यावरणाचा समतोल हा वनसंपदेवर अवलंबून असल्याची जाणीव असूनही विकासाच्या नावाखाली मानवाने वनसंपदेची हेळसांड केली. याचे भयावह परिणाम २१ व्या शतकाच्या प्रारंभापासूनच दिसायला लागले आहेत. पर्यावरण संतुलन बिघडल्याने जागतिक तापमानवाढीचा धोका वाढत असून ऋतुचक्रात विस्मयकारक बदल होत आहेत.

वनसंपदेच्या हेळसांडीमुळे असंख्य वन्यजीवांचे प्राण कंठाशी आले आहेत. अनेक प्रजाती नष्ट झाल्या. काही प्रजाती नष्ट होण्याच्या पातळीपर्यंत पोहोचल्या. जैविक वैविध्यतेच्या केंद्रस्थानी असलेल्या वाघासारख्या प्राण्यांचे शिरकाण सातत्याने सुरू आहे. शतकभरापूर्वी १०,००० च्या संख्येत असलेले वाघ आता दीड हजाराच्या आसपास उरले आहेत. कोणत्याही प्राण्याची शिकार हा पुरुषार्थ ठरत नाही आणि कर्तृत्व तर निश्चितच नाही. पण मनुष्यप्राणी या भ्रमात राहिला आणि त्याने वाघासकट अनेक वन्यप्राण्यांची शिकार करून जैवविविधतेचा पाया खिळखिळा केला. वन संपत्तीवर केवळ आपलाच मालकी हक्क सिद्ध करू पाहणाऱ्या मनुष्यप्राण्याचे वागणे, 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ', असे ठरते.

शाश्वत विकासात वनांची भूमिका महत्त्वाची असल्याने वन व्यवस्थापन, संवर्धन आणि वन्य प्राण्यांचे संरक्षण या बाबींकडे आता विशेषत्वाने लक्ष देण्यात येत आहे. अभयारण्ये, संरक्षित क्षेत्रांची निर्मिती, व्याघ्र प्रकल्प, इतर वन्यप्राण्यांसाठीही संरक्षण आणि संवर्धनाच्या विविधांगी योजना राज्य आणि केंद्र पातळीवर राबविण्यात येत आहेत. वन्यप्राणी आणि मनुष्यप्राण्याच्या सहजीवनाचा सुवर्णमध्य साधून पायाभूत सुविधांची निर्मिती करावी लागेल याची जाणीव आता सर्वांनाच झाली आहे. त्यामुळेच संयुक्त वन व्यवस्थापनाची संकल्पना वनक्षेत्रात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. यामध्ये वन व्यवस्थापन, संरक्षण आणि संवर्धनात स्थानिकांचा सहभाग घेतला जातो. वनांवर आधारित रोजगार-स्वयंरोजगाराच्या योजना राबवून स्थानिकांसाठी उत्पन्नाची साधने निर्माण केली जात आहेत. महाराष्ट्रात संयुक्त वन व्यवस्थापनाचा प्रयोग यशस्वी झाला आहे. वन्य प्राण्यांच्या शिकारीच्या मागावर असलेल्या शिकाऱ्यांवर त्यामुळे बऱ्याच प्रमाणात वचक बसला आहे.

गेल्या काही वर्षात जंगलालगतच्या गावांमध्ये बिबट शिरण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसते. बिबट वा अन्य वन्यप्राण्यांच्या निवासस्थानी मानवी हस्तक्षेप आणि अतिक्रमण वाढल्याने या प्राण्यांना मानवी वस्तीत येण्यावाचून दुसरा पर्याय उरत नाही. यावरचा प्रतिबंध संयुक्त वन व्यवस्थापन, लोकप्रबोधन आणि लोकसहभागातून होऊ शकतो. त्यासाठी निधीची तरतूद आणि कालबध्द नियोजन करण्यात आले आहे.

या अंकात वन विभागामार्फत महाराष्ट्रात वनसंपदा आणि वन्यजीवांच्या संरक्षण आणि संवर्धनसाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नांचा आढावा घेण्यात आला आहे. वन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण परदेशी यांनी अंकाच्या निर्मितीसाठी सहकार्य केले त्यांचे विशेष आभार. वनांबद्दलचे प्रेम, स्नेह व आस्था वाढण्यासाठी आणि सहअस्तित्वाची भावना निर्माण करण्यासाठी हा अंक उपयुक्त ठरेल याचा आम्हाला विश्वास वाटतो.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या आज्ञापत्रात मनुष्यप्राण्यांसाठी वनसंपदेचे महत्त्व किती मोठे आहे, हे नमूद करून ठेवले आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे द्रष्टे पुरुष होते. त्यांच्या स्वराज्य निर्मितीच्या प्रयत्नांना मावळ्यांसोबतच सह्याद्रीतील घनदाट अरण्ये, डोंगर, नद्या या नैसर्गिक संपदेचा किती मोठा हातभार लागला हे आपण सारेच जाणतो. प्रगती आणि विकासाची उंच भरारी घ्यायची असेल तर निसर्गाचे पाठबळ हवेच, हे त्या द्रष्ट्या पुरुषाने ओळखले होते. त्यांचाच आदर्श ठेवून आजच्या काळात वनसंपदेला जुने वैभव मिळवून देणे हे आपले कर्तव्य ठरते.

वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे। पक्षीही सुस्वरे आळविती।।

या संत तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे वनांचे संगोपन आणि ईश्वराची आराधना या बाबी मानवाला सुखाकडे नेणाऱ्या ठरतील. आपल्या संस्कृतीने जोपासलेला हा विश्वास वनसंपदेच्या वृद्धीने सार्थ ठरवू या.


**प्रमोद त्र्यं. नलावडे**

मुख्य संपादक तथा महासंचालक

(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)

संपर्क : ०२२-२२०४१५८५/२२०२७९५६

dg@dgipr.maharashtra.gov.in

# वारसा जपूया



महाराष्ट्रातील जंगले जैववैविध्य आणि विपुल पक्षी व प्राणीसंपदेने समृद्ध आहेत. राज्य शासनाचा वन विभाग याचे संरक्षण करण्यासाठी कटिबद्ध आहे. मात्र वनांचे संरक्षण आणि संवर्धन हे केवळ वनखात्याचे काम नाही. वने हा आपला सर्वांचा वारसा आहे. तो जपणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. वने, पर्यावरण राहिले तरच आपण राहणार आहोत, हे वैश्विक सत्य आहे. एकप्रकारे ही आपल्याच अस्तित्वाची लढाई आहे. आपण ती जिंकू या. सांगताहेत मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण...

एकंदरच पृथ्वी, इथले सर्व सजीव, पर्यावरण, वातावरण या सर्वांच्याच दृष्टीने जंगलांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. जंगले जेवढी सुरक्षित राहतील, तेवढे आपण सारे सुरक्षित राहणार आहोत. ''वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरें...'' या अभंगातून संत तुकारामांनी वनांचे महत्त्व सांगितले आहे, ''सुखालागि आरण्य सेवित जावे'' असे समर्थ रामदास सांगतात. भारतीय संस्कृतीमध्ये वैदिक काळापासून वृक्षसंवर्धनाला पुष्कळ महत्त्व दिले गेले आहे. प्राचीन साहित्यामध्ये याचे अनेक दाखले मिळतात. आयुर्वेद ही भारतीयांनी जगाला दिलेली देणगी याचेच प्रतीक आहे. एकूणच जंगले हे आपल्या सर्वांच्या अस्तित्वाचे कारण आहे.

आपल्या राज्याचे एकूण क्षेत्रफळ ३ लाख ७हजार ६९० चौ.कि.मी. आहे आणि त्यापैकी ६१ हजार ९३९ चौ.कि.मी. क्षेत्र वनांचे आहे. १९८८ च्या राष्ट्रीय वननीतीनुसार एकूण भूभागाच्या किमान ३३ टक्के एवढे क्षेत्र वन आच्छादनाखाली असणे आवश्यक आहे. मात्र महाराष्ट्रातील वनआच्छादनाचे प्रमाण सुमारे १६ ते १७ टक्के इतके आहे. राष्ट्रीय वननीतीनुसारचे उद्दिष्ट गाठण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करणे ही गरज बनली आहे. जागतिक तापमानवाढीचे प्रमाण व त्यापासून निर्माण होत असलेल्या धोक्यांचा साकल्याने विचार करून आम्ही २०१२, २०१३ या दोन वर्षात राज्यात १०० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम राबविण्याबाबत निर्णय घेतला आहे.

### महत्त्वाकांक्षी उपक्रम

हा उपक्रम महत्त्वाकांक्षी आहे. तो पार पाडण्यासाठी शासनाच्या कृषि, वन, ग्राम विकास, शालेय शिक्षण विभाग, तसेच सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी व क्षेत्रीय वन अधिकाऱ्यांमध्ये समन्वय साधून कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. राज्याच्या मुख्य सचिवांवर या मोहिमेच्या संनियंत्रणाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. मागील वर्षात वन विभागाने केलेल्या ३ कोटी वृक्ष लागवडीच्या तुलनेत यावर्षी सुमारे ८ कोटी वृक्ष लागवड करण्यात आली आहे. लावण्यात आलेल्या वृक्षांची जोपासना, जतन व संरक्षण करणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. यासाठी जीपीएससारखी आधुनिक प्रणाली वापरून संनियंत्रण ठेवण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

### वनरक्षक भरती

वनांचे संरक्षण करण्याची जबाबदारी क्षेत्रीय पातळीवर वनरक्षकांची असते. मागील काही वर्षात वनरक्षकांची भरती प्रक्रिया काही ना काही कारणामुळे थांबली होती. यामुळे झालेली अडचण लक्षात घेऊन आम्ही यावर्षी विशेष मोहीम राबवली आणि वनरक्षकांची ११७२ पदे भरण्यात आली. दुर्गम भागातील वनसंरक्षणासाठी शारीरिकदृष्ट्या अधिक सक्षम असलेले अदिवासी प्रवर्गातील उमेदवार निवडले जातील, या दृष्टीने भरती प्रक्रिया अवलंबविण्यात आली. यामुळे त्याना रोजगार उपलब्ध होण्याबरोबरच जंगलांची माहिती असलेले, जंगलांविषयी आस्था असलेले सक्षम वनरक्षक विभागाला मिळाले.

### संयुक्त वन व्यवस्थापन

संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रम हा मागील २० वर्षापासून संपूर्ण देशात राबविण्यात येत आहे. त्यांअंतर्गत वनांलगत असलेल्या गावात वनसंरक्षणार्थ संयुक्त वन व्यवस्थापन समित्या स्थापन करण्याची तरतूद आहे. महाराष्ट्रात सध्या सुमारे १५ हजार संयुक्त वन व्यवस्थापन समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. तथापि, आतापर्यंत त्यांना वैधानिक आधार नव्हता. मात्र ५ ऑक्टोबर २०११च्या शासन निर्णयानुसार संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ अंतर्गत ग्राम पंचायतीचा एक भाग म्हणून निश्चित करण्यात आले आहे. संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना कायदेशीर आधार प्रदान केल्यामुळे त्यांना अधिक सक्षमपणे वनसंरक्षणार्थ प्रवृत्त करता येईल.

नागपूरजवळच्या गोरेवाडा येथील जंगलाचे संरक्षण करून तेथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्राणीसंग्रहालय स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. प्राणी संग्रहालयाच्या अंमलबजावणीचे काम महाराष्ट्र वन विकास महामंडळामार्फत सुरू आहे. प्राणी संग्रहालयांतर्गत बचाव केंद्राच्या (Rescue Centre) परवानगीसाठी सर्वोच्च न्यायालयाला विनंती करण्यात आली आहे.

### शिरपेच

महाराष्ट्रातील जंगले जैववैविध्य आणि विपुल पक्षी व प्राणीसंपदेने समृद्ध आहेत. राज्य शासनाचा वन विभाग याचे संरक्षण करण्यासाठी कटिबद्ध आहे. वाघ या रुबाबदार प्राण्याला शिरपेचाईतके महत्त्व आहे. कारण वाघाचे अस्तित्व हा समृद्ध जंगले आणि जैवविविधतेच्या परिपूर्णतेचा पुरावा आहे. या सर्वांचे संरक्षण करण्यासाठी राज्यात ६ राष्ट्रीय उद्यानांची आणि ३६ अभयारण्यांची स्थापना करण्यात आली आहे. वन आणि वन्यजीव विभागातर्फे यांचे व्यवस्थापन उत्तम प्रकारे करण्यात येते.

ताडोबा व्याघ्र प्रकल्प हा राज्यात नव्हे तर संपूर्ण देशात वाघांसाठी उत्कृष्ट अधिवास आहे. व्याघ्र संवर्धनाचे महत्त्व विचारात घेता, संपूर्ण ताडोबा व्याघ्र प्रकल्पास आता एकात्मिक प्रशासनाखाली आणण्यात आले आहे. वन्यप्राण्यांच्या अवैध शिकारीला आळा घालण्यासाठी विशेष व्याघ्र संरक्षण दलाची स्थापना करण्यात आली आहे. वन विभागाच्या अथक प्रयत्नामुळे २००९ पासून आतापर्यंत ताडोबा राष्ट्रीय उद्यानात वाघांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. नागपूर ही देशाची

व्याघ्र राजधानी आहे. मेळघाट, ताडोबा-अंधारी आणि पेंच या व्याघ्र प्रकल्पातील वाघांची संख्या वाढते आहे. याचबरोबर सह्याद्री हा नवीन राष्ट्रीय प्रकल्पही जाहीर करण्यात आला आहे.

**माळढोक पक्षी अभयारण्य**

माळढोक पक्षी अभयारण्याचे अधिसूचित क्षेत्र ८४९६.४४ चौ.कि.मी. इतके होते. निसर्ग संवर्धनाच्या दृष्टीने माळढोक पक्षी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. तथापि, या पक्ष्यांचे संवर्धन, संगोपन होण्याबरोबरच या परिसरातील विकासात्मक कामे सुरळीतपणे पार पाडली जातील, या दृष्टीने माळढोक पक्षी अभयारण्याचे क्षेत्र पुनर्गठित करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि इतर संस्थेकडून दीर्घ काळापासून सातत्याने मागणी होत होती. आता माळढोक अभयारण्याचे क्षेत्र पुनर्गठित करून १२२९.२४ चौ.कि.मी. एवढे करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र राज्याला ७२० कि.मी.चा समुद्रकिनारा लाभलेला आहे. तथापि या भागाला चक्रीवादळासारख्या नैसर्गिक आपत्तीला नेहमी सामोरे जावे लागते. अशा नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी किनारपट्टी भागातील कांदळवनांचे संरक्षण व संगोपन होणे अपरिहार्य आहे. त्यासाठी राज्यातील कांदळवनाखालील संपूर्ण क्षेत्र शासकीय तसेच खाजगी अधिसूचित करण्याची कार्यवाही सुरू आहे. राज्यात स्वतंत्र कांदळवन कक्षाची स्थापना करण्यात आली असून त्यासाठी मुख्य वनसंरक्षक (मँग्रोव्ह) यांच्या प्रशासकीय नेतृत्वाखाली ३७ नवीन पदे निर्माण करण्यात आली आहेत. शासन अधिसूचना २० सप्टेंबर २०१२ अन्वये संरक्षित वनक्षेत्रात मँग्रोव्ह प्रजातींच्या वृक्षांना 'राखीव' म्हणून अधिसूचित करून त्यांना वैधानिक संरक्षण प्रदान करण्यात आले आहे.

**संरक्षण आणि संनियंत्रण**

सुदूर व दुर्गम भागात व्यापलेल्या वनक्षेत्राचे प्रभावी व्यवस्थापन, संरक्षण आणि संनियंत्रण करण्याच्या दृष्टीने संगणक प्रणालीचा वापर करून क्षेत्रीय पातळीपर्यंत नेटवर्क स्थापन करण्यासाठी पावले उचलण्यात आली आहेत. क्षेत्रीय वन अधिकाऱ्यांमार्फत होणारी गस्त, वनसंरक्षणार्थ त्यांनी केलेले प्रयत्न तसेच वन्यप्राणी व्यवस्थापनासाठी क्षेत्रीय पातळीवर करण्यात आलेल्या कार्यवाहीवर या प्रणालीद्वारे मुख्यालय स्तरावरून संनियंत्रण ठेवता येईल. वनसंरक्षणार्थ क्षेत्रीय अधिकाऱ्यांना वरिष्ठ पातळीवरून तसेच मुख्यालय स्तरावरून मार्गदर्शन करता येईल.




ताडोबा जंगलात मुख्यमंत्र्यांची भ्रमंती

**ऐतिहासिक वारसा**

राज्याला ऐतिहासिक गड, किल्ले यांचा वारसा लाभलेला आहे. बहुतांश किल्ले हे वनक्षेत्रात आहेत किंवा किल्ल्यांपर्यंत पोहोचण्याकरिता वनांतून जावे लागते. या किल्ल्यांना भेटी देणाऱ्या पर्यटकांमुळे या भागात कचऱ्याचे प्रमाण वाढू लागले आणि त्याचा विपरित परिणाम पर्यावरणावर आणि जैवविविधतेवर होऊ लागला. त्यावर मात करण्यासाठी व ऐतिहासिक किल्ल्यांचे जतन करण्यासाठी संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना सहभागी करण्याबाबत शासनाने नुकताच निर्णय घेतलेला आहे. किल्ल्यांचे जतन करण्यासाठी पर्यटकांकडून उपद्रव प्रतिबंधात्मक प्रवेश शुल्क व चित्रीकरण शुल्क घेण्यासाठी संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

वननिवासींचे वनांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना आणि ग्रामस्थांना सवलतीच्या दराने (७५ टक्के अनुदान) बायोगॅस, स्वयंपाकाचा गॅस पुरवठा, दुभत्या जनावरांसाठी अनुदान व वृक्षलागवडीच्या संवर्धन व संरक्षणासाठी प्रोत्साहन देण्याबाबतची योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. या योजनेचा लाभ राज्यभरातील १८०३६ कुटुंबांना होणार आहे.

नागपूर वन विभागातील कुही व भिवापूर वनपरिक्षेत्र तथा भंडारा वन विभागातील पवनी वनपरिक्षेत्रात येणा-या एकंदरीत १८९.२९ चौ.कि.मी. क्षेत्रावर वन्यजीव, विशेषत: वाघांची संख्या विचारात घेता उमरेड करांडला अभयारण्य अस्तित्वात असून २९ जून, २०१२ च्या अधिसूचनेनुसार अभयारण्य घोषित करण्यात आले आहे. मध्य भारतातील ६ व्याघ्र प्रकल्पांशी याची संलग्नता आहे.

छत्तीसगडमधील इंद्रावती राष्ट्रीय उद्यानालगतचे क्षेत्र गडचिरोली जिल्हयाच्या सिरोंचा वन विभागात समाविष्ट केले असून या कोलामार्का भागात भारतीय रानम्हैस आढळते. भारतात फक्त हे एकच ठिकाण शिल्लक आहे, जिथे अत्यंत दुर्मीळ व नामशेष होण्याच्या मार्गावर असलेली भारतीय रानम्हैस अस्तित्वात आहे. या प्रजातीचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने ८ जानेवारी, २०१३ पासून कोलामार्का क्षेत्र राखीव घोषित करण्यात आले आहे.

वनांचे संरक्षण आणि संवर्धन हे केवळ वनखात्याचे काम नाही. वने हा आपला सर्वांचा वारसा आहे. तो जपणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. यासाठी प्रत्येकाला आपापल्या परीने वाटा उचलणेही शक्य आहे. जंगलांचे अस्तित्व कायम राखण्यासाठी सरकारने केलेले नियम पाळले तरी मोठे काम केल्यासारखे होईल. शेवटी वने, पर्यावरण राहिले तरच आपण राहणार आहोत, हे वैश्विक सत्य आहे. एकप्रकारे ही आपल्याच अस्तित्वाची लढाई आहे. सर्वांच्या सहकार्याने ही लढाई जिंकता येणे सहज शक्य आहे.

**(शब्दांकन : सतीश लळीत,**
मुख्यमंत्र्यांचे मुख्य जनसंपर्क अधिकारी)
संपर्क : ९४२२४१३८००

# संवर्धन आणि संस्कृती

महाराष्ट्र हे वने आणि वन्यजीवांसारख्या निसर्गसंपदेनं अतिशय समृद्ध असं राज्य आहे. ही समृद्धता पूर्वापार चालत आली आहे. महाराष्ट्राचा आजवरचा इतिहास शौर्याचा, पराक्रमाचा आणि विकासाचा आहे, असं जेव्हा आपण नेहमी म्हणतो, त्यावेळी हा इतिहास इथल्या जंगलात आणि दऱ्याखोऱ्यात घडला याचीही विशेष नोंद आपण घेतली पाहिजे. छत्रपती शिवाजीमहाराज आणि त्यांचे मावळे सह्याद्रीच्या याच जंगलात राहत होते. मुघलांशी गनिमीकाव्याने लढत होते आणि इथला निसर्ग त्यांना साथ देत होता, हे देखील आपण लक्षात ठेवलं पाहिजे.

महाराष्ट्राची आजवरची जडणघडण ही प्रामुख्यानं इथला निसर्ग, गडकिल्ले, कडेकपारी, डोंगरदऱ्या, घनदाट जंगलं, वनौषधी, वन्यप्राणी तसंच वनपूजक लोकांशी आणि त्यांच्या निसर्गपूरक संस्कृतीशी निगडित असल्याचं आपल्या लक्षात येतं. निसर्गाचं, वनांचं आणि वन्यजीवांचं संरक्षण आणि संवर्धन ही महाराष्ट्राची प्राचीन संस्कृती असून आपण सर्वांनी ती आजवर जपली आहे, याचा आपल्याला निश्चितच आनंद आणि अभिमान आहे.

महाराष्ट्रात आजमितीस सुमारे ६२ हजार चौरस किलोमीटर म्हणजे राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी २१ टक्के क्षेत्र वनांखाली आहे. निसर्ग आणि वातावरणाचा समतोल राखण्यासाठी हे क्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्याचं आपलं उद्दीष्ट आणि प्रयत्न आहे. या प्रयत्नांमध्ये वाढत्या औद्योगिकीकरण आणि नागरिकीकरणामुळे काही अडचणी येत आहेत. परंतु, त्या दूर करून भविष्यात अधिक वेगाने आपल्याला वाटचाल करायची आहे.

वनविकासाच्या कार्यक्रमात जनजागृती आणि लोकसहभाग सर्वात महत्त्वाचा ठरणार आहे. मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड हा या कार्यक्रमाचा पहिला आणि महत्त्वाचा टप्पा आहे. मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून वनविकासाच्या कार्यक्रमाला गती देण्यात येत आहे. वनांचा विकास हा केवळ वनक्षेत्रात वाढ करून होणार नाही, तर ही वाढ गुणात्मक असली पाहिजे. त्यासाठी शोभेच्या आणि निरुपयोगी झाडांऐवजी आंबा, फणस, वड, पिंपळ अशी मोठी, उपयोगी आणि दीर्घकाळ टिकणारी झाडे लावली पाहिजेत. वनांची विविधता, घनता आणि दर्जा वाढविण्याकडे लक्ष दिलं पाहिजे. वनविभागाने यावर्षी कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर या सहा विभागांमध्ये प्रत्येकी सुमारे ३ ते ४ कोटी झाडे लावण्याचं उद्दिष्ट ठेवलं आहे. या प्रयत्नांमधूनच राज्यातल्या वनांचं संवर्धन होण्यास मदत होणार आहे.



**देशातील आणि जगातील सर्वाधिक प्रगतशील आणि आघाडीचं राज्य म्हणून महाराष्ट्राचा लौकिक आहे. वाढत्या औद्योगिकिकरण आणि नागरिकीकरणामुळे राज्याच्या वनक्षेत्रात होत असलेली घट थांबविण्याबरोबरच वनक्षेत्रात वाढ करण्याचं एक मोठं आव्हान आपल्यासमोर आहे. ही वाढ केवळ संख्यात्मक असून चालणार नाही तर ती गुणात्मक असायला हवी. त्या दृष्टीनं आपली वाटचाल असली पाहिजे. सांगताहेत उपमुख्यमंत्री अजित पवार...**

वनविभागाच्या प्रयत्नांना शासनाच्या विविध विभागांनी, शाळा, महाविद्यालये, औद्योगिक संस्था, गृहनिर्माण संस्था, स्वयंसेवी संस्था, विविध क्षेत्रात कार्यरत सहकारी संस्था, तसंच वैयक्तिक पातळीवर मदत करु शकणाऱ्या आणि इच्छिणाऱ्या व्यक्ती, अशा सर्वांनीच हातभार लावण्याची गरज आहे. समाजातील अशा व्यक्ती आणि संस्थांनी वनक्षेत्रात झाडं लावण्यासाठी वनविभागाला मदत करण्याबरोबरच, आपापल्या कार्यक्षेत्राच्या परिसरात झाडं लावण्यासाठी पुढाकार घेण्याचीही गरज आहे.

वृक्षलागवडीचा कार्यक्रम शासनातर्फे आणि विविध संस्थांतर्फे दरवर्षी घेतला जातो. दरवर्षी लावलेली ही झाडं जातात कुठे हा प्रश्नदेखील माझ्यासकट सर्वसामान्यांच्या मनात दरवर्षी उपस्थित होतो. त्या पार्श्वभूमीवर वृक्षलागवडीबरोबरच ही झाडं जगवण्याकडेही लक्ष दिलं पाहिजे. किंबहुना याकडे अधिक लक्ष दिलं पाहिजे. वृक्षलागवडीच्या या कार्यक्रमात पारदर्शकता आणण्यासाठी राज्य शासनाने सॅटेलाईट इमेज मॉनिटरींग सिस्टीम सुरू केली आहे. तिचाही चांगला उपयोग होईल.

संयुक्त राष्ट्रसंघानं २०११ हे वर्ष 'जागतिक वन वर्ष' म्हणून जाहीर केलं आणि वनांचं संवर्धन, शाश्वत व्यवस्थापन आणि विकासाच्या अनुषंगाने; आपण त्यावर्षी राज्यात अनेक उपक्रम राबविले. लोकांसाठी वने ही त्या जागतिक वनवर्षाची संकल्पना त्यामागे होती. वनक्षेत्रात आणि वनक्षेत्राच्या परिघावर राहणाऱ्या स्थानिक नागरिकांना वनांच्या संरक्षण, संवर्धनाच्या कार्यात मोठ्या प्रमाणावर सहभागी करून वनक्षेत्र वाढविण्याचा आणि वने समृद्ध करण्याचा प्रयत्न जागतिक वनवर्षाच्या निमित्ताने आपण सर्वांनी केला. किंबहुना तो कार्यक्रम आपण आधीच सुरू केला होता, जागतिक वनवर्षाच्या निमित्ताने त्याला गती मिळाली. वनक्षेत्र समृद्ध करण्याच्या प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या स्थानिक नागरिकांना वनोपजांचा आर्थिक लाभ देण्याची प्रक्रियाही यानिमित्ताने आपण अधिक गतिमान केली.

महाराष्ट्राची संस्कृती ही निसर्गपूजक आहे.

निसर्गाला, वनांना, झाडांना, फळांना, फुलांना देव मानण्याची आपली संस्कृती आहे. ही संस्कृती महाराष्ट्राच्या गावखेड्यात राबणाऱ्या आणि गावांतून शहरात नोकरीसाठी आलेल्या प्रत्येकानं आपापल्यापरीनं जोपासण्याचा प्रयत्न केला. रानावनात राहणाऱ्या आदिवासी बांधवांनी तर ही वनसंस्कृती मनापासून जोपासली आणि वाढवली. त्यांनीच वनांची खऱ्या अर्थानं काळजी घेतली. झाडाची ओली फांदी न तोडणे, वनजमिनीला नांगर न लावणे, निसर्गाकडून गरजेपेक्षा अधिक न घेणे, अशा अनेक प्रथा त्यांनी आवर्जून पाळल्या. वनातून मिळणाऱ्या मर्यादित वनोपजांवर चरितार्थ चालवण्यात त्यांनी धन्यता मानली. वनांवर प्रेम करणाऱ्या, वनांची भाषा समजणाऱ्या या आदिवासी समाजाला वन संरक्षण आणि संवर्धनाच्या कार्यात सहभागी केलं तरच हा कार्यक्रम यशस्वी होईल, ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन राज्याचं वनधोरण आपण साधारणपणे ५ वर्षांपूर्वी तयार केलं.

या वनधोरणात वनक्षेत्रात आणि वनक्षेत्राच्या परिघावर राहणाऱ्या नागरिकांवर विशेष जबाबदारी सोपविण्यात आली. वनव्यवस्थापनासाठी या नागरिकांच्या समित्या स्थापन करण्यात आल्या. राज्यात आजमितीला साडे बारा हजार वनव्यवस्थापन समित्या कार्यरत असून २७ लाख हेक्टरहून अधिक वनक्षेत्राची जबाबदारी त्या सांभाळत आहेत. राज्याच्या वनक्षेत्रविकासाचे हेच खरे दूत आहेत, असं म्हटलं तर ते चुकीचं ठरणार नाही. या वनव्यवस्थापन समित्यांचं कार्य आणि महत्त्व लक्षात घेऊन यावर्षीच्या अर्थसंकल्पात मी साडे नऊ कोटी रुपयांची विशेष तरतूद केली आहे.

वृक्षतोडीला प्रतिबंध, वणव्यापासून वनांचं संरक्षण, वन्यजीवांची शिकार रोखणे अशा अनेक गोष्टींसह वनांच्या संरक्षणाची, वनांच्या संवर्धनाची तसंच इतरही अनेक आनुषंगिक जबाबदाऱ्या या समित्यांच्या माध्यमातून पार पाडल्या जात आहेत. वनं तुमची आणि वनांपासून मिळणारे फायदेही तुमचेच, अशी ही परस्परपूरक भूमिका असल्यानं आणि ती सर्वांच्याच फायद्याची असल्यानं येणाऱ्या भविष्यकाळात राज्याच्या वनक्षेत्रात वाढ झालेली आपल्याला निश्चितच पाहायला मिळेल, असा मला विश्वास आहे.

याच सहकार्याचं पुढचं पाऊल म्हणून ताडोबा-पेंच, बोर टिपेश्वर मेळघाट, भीमाशंकर सारख्या अनेक ठिकाणी गावकऱ्यांच्या माध्यमातून इको टुरिझम सेंटर सुरू करण्याचा कार्यक्रम वनविभागाकडून राबविण्यात येत आहे. या माध्यमातून स्थानिक तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध होत आहे. वनांच्या माध्यमातून एखाद्या परिसराच्या आर्थिक विकासाला कसा हातभार लागू शकतो याचं हे उदाहरण आहे.

संयुक्त राष्ट्र संघाने २०११ हे वर्ष 'जागतिक वन वर्ष' म्हणून जाहीर केले आहे. त्या माध्यमातून 'लोकांसाठी वने' ही संकल्पना राबविण्यात आली. खरं सांगायचं तर, 'लोकांसाठी वने' ही संकल्पना हजारो वर्षांपासून आपल्या संस्कृतीचा आणि लोकजीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे. तिचं पुन्हा एकदा अवलोकन करण्याची संधी 'जागतिक वन वर्षा'च्या निमित्ताने उपलब्ध झाली, एवढंच म्हणता येईल. शास्त्रोक्त पद्धतीनं वनव्यवस्थापनाची संकल्पना अधिकृतपणे १८६० पासून राज्यात अंमलात आली. या सगळ्या वस्तुस्थितीचा आणि यासंदर्भातील विविध बाबींचा विचार करता वने आणि वन्यजीवांच्या संरक्षण आणि संवर्धनाच्या संदर्भात महाराष्ट्र नेहमीच जागरूक आणि दक्ष असल्याचं आपल्या लक्षात येईल.

सुदैवानं देश आणि राज्य हे जैवविविधतेच्या संदर्भात जागतिक महत्त्वाचा प्रदेश आहे. जगात सर्वाधिक जैवविविधता असलेल्या १२ देशांमध्ये आपल्या देशाचा समावेश होतो. वनस्पती आणि प्राण्यांच्या सुमारे दीड लाख प्रजाती देशात आढळतात आणि त्यापैकी बहुतांश प्रजाती पश्चिम घाट क्षेत्रात आढळतात. विशेष म्हणजे जैवविविधतेच्या बाबतीत अत्यंत समृद्ध समजला जाणारा या पश्चिम घाट क्षेत्राचा ३३ टक्के भाग राज्यात असून सह्याद्रीच्या पर्वतरांगांमधल्या माथेरान, महाबळेश्वर, पांचगणीचाही त्यात समावेश होतो. ही महत्त्वाची, आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. त्याचबरोबरीनं या जैवविविधतेचं संरक्षण आणि संवर्धन करण्याची जबाबदारीही आपली आहे.

वने आणि वन्यजीवांच्या संरक्षण आणि संवर्धनात राष्ट्रीय उद्यान आणि अभयारण्यांचं महत्त्व अनन्यसाधारण आहे. राष्ट्रीय उद्यान आणि अभयारण्यांचं महत्त्व लक्षात घेऊन त्यांच्या परिसरातील गावांच्या पुनर्वसनाला प्राधान्य देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, ज्ञानगंगा, काटेपूर्णा, टिपेश्वर अभयारण्यातील गावांचे पुनर्वसन व माळढोक पक्षी अभयारण्यातील भूसंपादनासाठी सुमारे ११ कोटी रुपयांची तरतूद मी यावर्षीच्या अर्थसंकल्पात केली आहे. राज्यातील वनक्षेत्राच्या विकासासाठी याचा निश्चितच चांगला उपयोग होईल.

शब्दांकन :- (संजय देशमुख)
उपमुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी
संपर्क : ९८२१३६८२१०

❑ ❑



# महाराष्ट्र ते महा-वन-राष्ट्र

महाराष्ट्र ही संताची आणि शूरवीरांची भूमी आहे. इथल्या संतांनी निसर्ग संवर्धनाचे बीज आपल्या संत साहित्यातून पेरून ठेवले आहे. आपल्या सर्वांचे आराध्यदैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांनी वनसंवर्धनासाठी आज्ञावली काढल्या आहेत. प्रत्येकाने हिरवाई कशी वाढेल यासाठी प्रयत्न करावे. प्रत्येकाने किमान एक वृक्ष लागवड करून तो जोपासून मोठा करावा त्यातून हे राज्य 'महा-वन-राष्ट्र' होण्यास वेळ लागणार नाही. सांगताहेत **वनमंत्री पतंगराव कदम**



महाराष्ट्र हा भौगोलिक दृष्ट्या खूप समृध्द आहे. ७२० किलोमीटरचा सुंदर सागरी किनारा देवमासा, डोल्फ़िनसारखे सागराच्या महाकाय रूपाला शोभणाऱ्या जीवांसह . . सूक्ष्म जीवांना संरक्षण देणारे कांदळवन . . . जागतिक वारसा लाभलेला पश्चिम घाट, चार व्याघ्रप्रकल्प आणि वाघ, चित्ता, सांभर, बिबट्या, चारशिंगी, हरिण, लांडगे, कोल्हे यासारख्या महत्त्वाच्या ४१ जातींच्या प्राण्यांसह अनेक जीवांचे आधिवास असलेली ६ राष्ट्रीय अभयारण्ये या राज्यात आहेत. एवढ्या समृध्द निसर्गाची जोपासना करण्याचे काम शासनाच्या वतीने अनेकानेक योजना आखून केले जात आहे. मागच्या काही वर्षांमध्ये निसर्गाच्या समतोलासाठी सर्वात महत्त्वाचा घटक असलेल्या वाघांची संख्या आपल्या राज्यात वाढत आहे, हे सिध्द झाले आहे. वनमंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या धडक निर्णय घेण्याच्या पध्दतीमुळे वनविभाग कात टाकतो आहे. त्याबाबत त्यांनी दिलेल्या मुलाखतीतून या त्यांच्या धडाकेबाज कामाचे प्रतिबिंब दिसते.

**आज राज्यातील वनांची परिस्थिती कशी आहे ?**

आपल्या राज्याच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करता, अतिशय आशादायी चित्र आहे. मागच्या वर्षीच राज्यात येणारा पश्चिम घाटाचा मोठा पट्टा अतिशय समृध्द जैवविविधतेचा भाग म्हणून जागतिक वारसा म्हणून जाहीर करण्यात आला आहे. ही घटना राज्यातील समृध्द निसर्गाबद्दल अभिमान निर्माण करणारी आहे. तसेच नवनवीन योजनांच्या माध्यमातून वनसंवर्धन चळवळ व्यापक करायला मदत करणारी आहे.



हरोळी : राज्यपक्षी

आज राज्यातील लोकसंख्येची घनता पाहता आम्ही पाच नवीन संरक्षित क्षेत्र निर्माण केली आहेत. वन विभागात मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेऊन वनसुरक्षा रक्षक, रेंजर्स, अधिका-यांची भरती करत आहोत. मागच्या काही वर्षातील सुधारणांमुळे वनसंवर्धनाचे चांगले परिणाम समोर येताना दिसत आहेत. वनातला जैव साखळीतला सर्वात महत्त्वाचा घटक असलेल्या वाघांची संख्या वाढताना दिसत आहे, ही अतिशय दिलासा देणारी गोष्ट आहे. व्याघ्र संवर्धनासाठी ताडोबा-पेंचसाठी दोन विशेष बटालियन स्थापन करण्यात आल्या आहेत. राज्यातील वनाच्छादित भाग वाढविण्यासाठी वृक्ष लागवडीची योजना हाती घेतली आहे. गेल्यावर्षी ३ कोटी आणि या वर्षी ८ कोटी वृक्षांची लागवड करणार आहोत.



मोहरलेला आम्रवृक्ष : राज्यवृक्ष

**हवामान बदलाचा फटका जगात सर्वत्र बसताना दिसतो आहे, याचा राज्यातील वनावर काय परिणाम होतो आहे ?**

महाराष्ट्रातील बहुतांश नद्याचा उगम हा वनातून झाला आहे. त्यामुळे या वनांमधील पाण्याचे स्रोत उत्तम आहेत. महाराष्ट्रात या वर्षी पर्जन्यमान कमी झाले असले तरी वनाच्छादित भागात बरा पाऊस झाला आहे. झाडांचे प्रमाण ज्या ठिकाणी जास्त आहे, त्या ठिकाणी जमिनीची धूप कमी होते पर्यायाने बाष्पीभवन कमी होते. त्या ठिकाणच्या भूगर्भातील पाण्याची पातळीपण चांगली राहण्यास मदत होते. त्यामुळे वन्यजीवांना आवश्यक

असलेले पाणी बऱ्याच ठिकाणी उपलब्ध आहे. जिथे उपलब्ध होत नाही, तिथे आम्ही व्यवस्था केली आहे. हवामान बदलाचा फ़टका मानवी जीवनाला मोठ्या प्रमाणात बसत आहे, त्या तुलनेत वन्यजीवांना नाही पण भविष्यात वनांची घनता वाढवून जमिनीची धूप कमी करण्याचे काम हाती घेणे गरजेचे आहे. त्यादृष्टीनेच वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेतला आहे. राज्यात मोठ्या प्रमाणावर सागरीकिनारा आहे. सागरी किना-याच्या जवळ असलेली जैवविविधता कांदळवनांमुळे शाबूत आहे. त्या कांदळवनाचे रक्षण करण्याचे कामही आम्ही हाती घेतले आहे.

**राज्यातील वनाच्छादनाचे प्रमाण वाढविण्यासाठीची योजना काय आहे?**

राज्यातील वनांचे प्रमाण येत्या काही वर्षामध्ये ३३ टक्क्यांवर नेण्यासाठी आम्ही अनेक उपाययोजना केल्या आहेत. येत्या पाच वर्षात १०० कोटी वृक्ष लागवडीची महत्त्वाकांक्षी योजना हाती घेतली आहे. या योजनेंतर्गतच २०१२ मध्ये १५ कोटी रोपांची लागवड केली आहे तर २०१३ या वर्षात २० कोटी रोपांची लागवड करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. लावलेल्या रोपांची देखभाल करून ती वाढविण्यासाठी योग्य त्या उपाययोजना केल्या जात आहेत. त्यामुळे येत्या काही वर्षात वनांची घनता वाढेल. वनाच्छादित भाग वाढला तर वन्यजीवांबरोबर निसर्गसंपदा वाढीसही हातभार लागणार आहे.

**वनक्षेत्रात राहणाऱ्या वननिवासींना त्यांचे जीवन अधिक सुखकर करण्यासाठी आणि वनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी कोणते निर्णय घेण्यात आले आहेत ?**

वननिवासींचे वनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या सदस्यांना तसेच ग्रामस्थांना ७५ टक्के एवढ्या अनुदानातून बायोगॅस, स्वयंपाक गॅस



शेकरू : राज्यप्राणी

पुरवठा, दुभत्या जनावरांसाठी अनुदान व वृक्षलागवडीच्या संवर्धन व संरक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ देण्याकरिता २५ कोटी इतका निधी आदिवासींसाठी तर इतर अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांसाठी १०० कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यातून स्वयंपाकासाठी लागणारे इंधन म्हणून झाडं तोडण्याचे प्रमाण कमी व्हावे तसे हिरवाईला प्रोत्साहन मिळावे हा या योजनेमागचा उद्देश आहे.

**राज्यात वनहक्क कायद्याची अंमलबजावणी कशा प्रकारे होत आहे?**

गेली शेकडो वर्षे विकासाच्या प्रवाहापासून दूर राहिलेल्या आदिवासींना विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी केंद्रसरकार आणि राज्य शासनांनी अनेकानेक योजना कार्यान्वित केल्या. या योजनांचा फायदा हजारो आदिवासींना झाला आहे. अनेक आदिवासी आता विकासाच्या प्रवाहात आले आहेत आणि काहीजण येत आहेत. जे आदिवासी आपला उदरनिर्वाह शेतीवर करतात, या जमिनी वर्षानुवर्ष कसतायत त्यांना त्यांच्या जमिनी सरकार दप्तरी नोंदी करुन ७/१२ त्यांच्या नावावर करून देण्याचा एक कायदा केंद्र सरकारने २००६ मध्ये आणला. राज्यात त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू असून ४७७३३६ हजार एकर वन जमिनीवर १५७१ अधिकारपत्रे तसेच गडचिरोली, गोंदिया व अमरावती या जिल्ह्यांव्यतिरिक्त २५१७२ एकर जमिनीवर ३०१ अधिकारपत्रांचे वाटप करण्यात आले आहे.

**वनक्षेत्रातील वृक्षतोड, अतिक्रमणे, वन्यजीव तस्करी रोखण्यासाठी कोणते उपाय केले आहेत?**

वनविभागात मागच्या वर्षापासून सुरक्षा रक्षकांची भरती करण्याचे काम हाती घेतले असून, सुरक्षा रक्षक आणि इतर मनुष्यबळ वाढवून वनविभाग अधिक सक्षम करण्याचे कामही हाती घेतले आहे. सुरक्षेसाठी लागणा-या साधनांची उपलब्धता करून देण्यात येत आहेत. त्याचबरोबर वनक्षेत्रातील अवैध वृक्षतोड, अतिक्रमण, वन्यजीव तस्करी या स्वरूपाचे गुन्हे यामुळे कमी होण्यास मदत होईल. या गुन्ह्यांची माहिती देण्यासाठी खबऱ्यांचे जाळेही अधिक मजबूत करण्याचे निश्चित केले असून त्यासाठी ५० लाख रुपयांचा गुप्तसेवा निधी मंजूर करण्यात आला

जारूळ : राज्यफूल



आहे. त्यामुळे इथून पुढे अशा प्रकारच्या गुन्ह्यांची संख्या झपाट्याने कमी होण्यास मदत मिळणार आहे.

**अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने आणि अन्य वन प्रकल्पामुळे बाधित झालेल्यांसाठीच्या पुनर्वसनाबाबत ?**

राज्यातील अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने आणि अन्य वन प्रकल्पामुळे बाधित झालेल्यांचे पुनर्वसन करण्याचे काम चालू आहे. पण त्याला म्हणावा तेवढा वेग येत नव्हता. आता मात्र यांच्या पुनर्वसनासाठी धोरण जाहीर करण्यात आले आहे. या नवीन धोरणानुसार प्रती कुटुंब संपूर्ण पुनर्वसनाकरिता एक रकमी १० लाख रुपये एवढी रक्कम देण्यात येणार असून ही संपूर्ण प्रक्रिया केंद्र सरकारच्या प्रकल्प बाधित धोरणाशी सुसंगत आहे.

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यटनाला चालना देण्यासाठी सागरी किना-यावर प्रकल्प उभारला जातो आहे, त्याचा सागरी किना-यावरील जैवविविधतेवर कोणता परिणाम होईल ?**

संयुक्त राष्ट्रीय विकास कार्यक्रम प्रणीत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील या प्रकल्पामुळे समुद्र व समुद्र किनाऱ्यावरील जैवविविधतेला कोणत्याही प्रकारचा धोका होणार नसून उलट संवर्धनसाठी या प्रकल्पाचा उपयोग होईल. सागरी किनाऱ्यालगतच्या लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी हा प्रकल्प अतिशय महत्त्वाची भूमिका बजावेल. हा उपक्रम देशातील फ़क्त दोन मोठ्या उपक्रमांपैकी एक असून ह्या उपक्रमामुळे सागरी पर्यटनाला चालना मिळणार आहे.

**(शब्दांकन : युवराज पाटील)**

संपर्क : ८८८८१६४८३४

# जैवविविधतेचे जतन

**जंगले ही जैवविविधतेचे अविभाज्य घटक असून जंगलात विविध प्रकारच्या वनस्पती आढळून येतात. वनस्पती,कीटक, प्राणी, पक्षी, साप हे सर्व जंगलात आढळून येतात. त्यामुळे जंगल वाचवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मनुष्याने कितीही पैसे खर्च केले तरी त्याला जंगलातील जैवविविधता मिळू शकत नाही. माणूस हा सुध्दा जैवविविधतेचा एक घटक असून, तिचे संरक्षण करणे हे त्याचे प्रमुख कर्तव्य आहे. सांगताहेत वन राज्यमंत्री भास्कर जाधव...**



जागतिक तापमान वाढ आणि पर्यावरणाचे असंतुलन यामुळे मानवी जीवनावर होणारे परिणाम ही आजची ज्वलंत समस्या आहे. पर्यावरणाच्या संतुलनात वनांचे अपरिमित आणि अमूल्य असे योगदान आहे. लोकांसाठी व उद्योगांसाठी वने जीवनाधार ठरली आहेत. तथापि वनाच्छादनात घट होत असल्यामुळे ग्लोबल वॉर्मिंगसारख्या समस्यांना आपल्याला सामोरे जावे लागत आहे.

महाराष्ट्रात वनाच्छादनाचे प्रमाण सुमारे १६ टक्के आहे. हे वाढविण्याचे प्रयत्न शासनातर्फे करण्यात येत आहेत. जीवसृष्टीचा आधार असलेल्या वनांना जनाधार देण्याची नितांत आवश्यकता आहे. त्या दृष्टीने वनसंवर्धनाच्या कार्यात सर्व नागरिकांनी सक्रिय सहभागी होण्याची गरज आहे. जीवसृष्टीच्या आधाराचे जतन आणि पुनर्वसन करण्यासाठी वन विभाग कटिबद्ध आहे. शासनाच्या महत्त्वाकांक्षी वृक्ष लागवड अभियानात वनविभाग आपली जबाबदारी समर्थपणे पेलत आहे. वन्यप्राण्यांचे अधिवास सुरक्षित ठेवण्यासाठी राज्यातील सुरक्षित क्षेत्रात वाढ करण्यात आली आहे.



याशिवाय गावाच्या प्रगतिशील पुनर्वसनाच्या कामाला गती देण्यात आली आहे. लोकसहभागाची गरज ओळखून अशा योजनांची जडणघडण, लोकहित तसेच निसर्ग केंद्रित ठेवून करण्यात आली आहे.

शासनाने पुढील २ वर्षात १०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवले असून दुष्काळी परिस्थितीतही मागील वर्षात १६ कोटी झाडे लावली आहेत. या झाडांच्या संवर्धनाची जबाबदारी स्थानिक लोकांवर असेल. कु-हाड बंदी, चराईबंदी आणि अवैध वृक्षतोडबंदीचा ठराव करणा-या गावक-यांना ७५ टक्के अनुदान तत्वावर गॅस शेगडी देण्याचा निर्णय शासनाने नुकताच घेतला आहे. त्यामुळे ३० हजार आदिवासी कुटुबांना चुलीऐवजी गॅस मिळाला आहे. प्रत्येक आदिवासीचे पुढील दोन वर्षांचे अनुदान संयुक्त वनसमितीच्या खात्यात जमा करण्यात आले आहे. त्यामुळे वनांवर अवलंबून राहणा-यांचे लाकडांसाठी जंगलात जाणे थांबणार आहे. जंगलांच्या संरक्षणासाठी स्थानिक जनतेची जास्तीत-जास्त मदत घेण्यात येत आहे. कु-हाड बंदी, चराईबंदी आणि अवैध वृक्षतोडबंदी या तीन अटींचे पालन करीत गावक-यांनी जंगल वाढवायचे आणि जंगलातून मिळणारे फायदेदेखील त्यांनीच घ्यायचे अशी राज्य शासनाची भूमिका आहे.

वृक्षारोपण कार्यक्रमात पारदर्शीपणा आणण्यासाठी राज्य शासनाने आता सॅटेलाईट इमेज मॉनिटरींग सिस्टीम सुरू केली आहे. या माध्यमातून वन विभागाच्या www.mahaforest.nic.in या वेबसाइटवर लावलेल्या प्रत्येक झाडाची माहिती कोणालाही ऑनलाइन मिळणार आहे.

वन विभागाने स्वीकारलेल्या संयुक्त वन व्यवस्थापन आणि निसर्ग पर्यटन योजनेंतर्गत पर्यावरणपूरक लोकसहभागाला विशेष स्थान देण्यात आले आहे. वनाधारित गरजांसाठी प्रामुख्याने वनांवर अवलंबून असलेल्या गावांच्या विकासाला वनेच महत्त्वाचा आधार ठरत आहेत.

जंगलातील प्राणी, पक्षी, वनस्पती आणि निसर्गदर्शन होण्यासाठी नाशिक दर्शन सारख्या योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सहकार्याने निसर्ग पर्यटनासाठी बससेवा सुरू करण्यात येणार आहे. सध्या गिर्यारोहण तसेच जंगली प्राणी-पक्षी, औषधी वनस्पती यांच्या अभ्यास करणा-या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. त्यासाठी कळसुबाई शिखर, भंडारदरा पर्यटन विकसित करण्याची योजना आहे.

निसर्गाच्या सान्निध्यात राहण्याची मुळातच आवड असणा-या निसर्ग आणि पर्यावरणप्रेमींसाठी ही आवड जोपासण्याबरोबरच तेथे राहून करिअर करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे वनसंवर्धन आणि वन्य जीवांचे संरक्षण करण्याचे शास्त्र अर्थात ' फॉरेस्ट्री अँड वाइल्ड लाइफ कन्झर्वेशन ' या क्षेत्रात साहसी तरुणांसाठी केवळ भारतातच नव्हे तर परदेशातही मोठया प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत. दिवसेंदिवस होत चाललेल्या पर्यावरणाचा -हास भविष्यातील नैसर्गिक आपत्तींची चाहूल देत आहे. जागतिक तापमान वाढीबरोबरच अतिवृष्टी, पूर, दुष्काळ, भूकंप, त्सुनामीसारख्या सर्व नैसर्गिक विनाशकारी बाबींच्या वाढत्या प्रभावामुळे आज पर्यावरणविषयक जागृती निर्माण होण्याची फार मोठी गरज आहे. पर्यावरण जागरूकतेची गरज वाढली आहे. वनसंवर्धन, वन्यजीव संवर्धन, नैसर्गिक स्रोतांचे संवर्धन करणे अत्यावश्यक झाले आहे. त्याचबरोबर या क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञांची मागणीही वाढत आहे. साहसी आणि पर्यावरणप्रेमी तरुण, वनसंवर्धन आणि वन्य जीवांचे संरक्षण करण्याचे शास्त्र या विषयातील शिक्षण घेऊन वनांच्या संरक्षणाची जबाबदारी स्वीकारू शकतात.

वनांमध्ये ज्या ठिकाणी वन्य जीवांसाठी पाण्याची टंचाई जाणवत आहे, अशा ठिकाणी पाणवठयांना टँकरने पाणी पुरवठा करण्याचा शासनाचा मानस आहे. त्यामुळे जंगलातील प्राणी आणि पक्षी यांना पिण्यासाठी पाण्याची टंचाई जाणवणार नाही.

निसर्ग आणि मनुष्यप्राणी यांचा अत्यंत निकटचा संबंध आहे. आपले जीवन सर्वस्वी निसर्गावर आणि वनसंपदेवर अवलंबून आहे. वनसंवर्धनावर अधिकाधिक भर दिल्यास पाणीटंचाईची समस्या आपल्याला भेडसावणार नाही. म्हणून वनसंवर्धनाच्या कार्यात शालेय विद्यार्थी, युवक तसेच सर्व स्तरातील नागरिक या सर्वांचा सहभाग अत्यंत आवश्यक आहे.

**(शब्दांकन : डॉ. आनंद साधले)**

# सहअस्तित्वाचा विश्वास

ही १९९६ सालची गोष्ट. साधारणत: पहाटेचे चार वाजले असावेत. सूर्य हळूहळू वर येऊ लागताच गुलाबी आभेने पूर्व दिशा उजळून निघाली. त्याचवेळी मृदू आवाजाने हा आसमंत भारून निघाला. प्रणयाराधनासाठी इच्छुक असलेला नर माळढोक आपली इच्छा प्रदर्शित करीत होता. त्याने डोकं मागे नेलं होतं. छाती समोर झाली होती. शेपटी सरळ झाली होती. नंतर काही मादी माळढोक त्या गवताळ भागात दिसू लागल्या. ताज्या लुसलुशीत गवतावर असलेल्या कीटकांचा त्या आस्वाद घेऊ लागल्या.

नानज-मार्डीच्या पठारावर अनेक शतकांपासून वास्तव्यास असलेल्या या माळढोक आणि त्याच्या असंख्य पूर्वजांचे दर्शन आमच्या मुलांना २० वर्षांनंतर होईल की नाही याची शाश्वती देता येत नाही. हे माळढोक अभयारण्य शेकडो खाजगी शेतांमध्ये पसरले आहे. माळढोक पक्षाच्या पुनरुत्पादनासाठी केवळ २०० किलोमीटर वनक्षेत्र आहे. अनेक


माळढोक पक्षी

लोकांना माळढोक पक्षी हा शत्रूवत वाटतो कारण त्यांच्या मते ८,२०० किलोमीटर वनक्षेत्र व्यापलेल्या माळढोक अभयारण्यामुळे चारपदरी महामार्ग, कालवे, बांधणीस अडथळा निर्माण होत आहे. त्यांच्या या निकृष्ट क्षेत्राचे अकृषिक वापरासाठी रूपांतर करण्यासही अडथळा

> संवर्धन आणि जगण्याची साधनं यांच्यामधील द्विधा अवस्था मिटल्याशिवाय वन्यजीव आणि लोक दोघांचेही समाधान होऊ शकत नाही. आपणांस सर्वसमावेशक अशा वन संवर्धनाची व्यूहनीती स्थानिक लोकांच्या सक्रिय सहकार्याने आखावी लागेल. स्थानिक लोकांचा संवर्धनामध्ये थेट फायद्यात समावेश करावा लागेल. प्रत्येक क्षेत्रातील स्थानिक गरजांची पूर्ती आणि मानवी अवलंबिततेचाही यामध्ये समावेश करावा लागेल. स्थानिक समुदायांना त्यांच्या वनाचे आणि जैविक संसाधनांचे व्यवस्थापन करण्यासाठी वनक्षेत्रनिहाय सक्षमीकरण करणे आवश्यक ठरते.

निर्माण झाला आहे. माळढोक सकाळी संरक्षित पट्ट्यात असतात तर रात्री शेजारच्या ज्वारी आणि भुईमुगाच्या शेतात जाऊन बसतात. माळढोक, काळवीट आणि या भागातील शेतकरी सहजीवन व्यतीत करू शकेल असा काही सुवर्णमध्य निघू शकणार नाही का?

### मेळघाट

मी मेळघाटला पहिल्यांदा १९७९ मध्ये भेट दिली. तेव्हा व्याघ्र प्रकल्प नुकताच घोषित करण्यात आला होता. रात्री वनातून जात असताना गौर, सांबर हे प्राणी आमच्या समोरून गेले. सकाळी आम्हाला गायी, म्हैस दिसल्या. एकही जंगली श्वापद दिसलं नाही. एका दशकानंतर मी जेव्हा अमरावती जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून रुजू झालो तेव्हा मला जाणीव झाली की कोरकूंचे दैनंदिन जीवन सुरक्षित करणे हे एक आव्हान आहे. जमिनीची मशागत करून कोडो आणि कुटकी सारख्या जंगली बियाणांवर कोरकू अधिकाधिक अवलंबून असतात.

यापैकी अर्धे पीक हे दरवर्षी हरणं आणि जंगली डुकरांमुळे पायदळी तुडवले जाऊन नष्ट होते. अभयारण्याच्या नियमांनुसार या क्षेत्रात रस्त्यांचे डांबरीकरण, अभियांत्रिकी महाविद्यालयांची उभारणी, सिंचनासाठी नवी धरणे, दाल मिल किंवा कापूस जिनिंग मिलची उभारणी करता येत नाही. मात्र या वन्यजीव अभयारण्याच्या बाहेर काही किलोमीटर अंतरावर वरील सर्व बाबी करणे शक्य होते.



**प्रवीण परदेशी**
(प्रधान सचिव, वने)

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र १५०० किलोमीटर आहे. या भागात १६ हजार लोकसंख्या असलेली २८ खेडी आहेत आणि गुरांची संख्या ११ हजार आहे. शाकाहारी प्राणी फक्त ३,५०० आहेत. पावसाळ्यात वाघांना आपल्या खाद्यासाठी गुरांवर हल्ला करावा लागतो. वन्यप्राणी शेतात घुसून चरत असल्याने सातत्याने होणाऱ्या पिकांची नासाडी होते. तसेच रानटी डुकरांच्या हल्ल्यामुळे गुरांनाही जीव गमवावा लागतो. त्यामुळे कोरकू आणि शेतकरी दोघेही नाखूश आहेत.

### विदर्भातील विस्तृत वनक्षेत्र

सातपुडा आणि ताडोबा हे महाराष्ट्रातील शिल्लक असलेली दोन विस्तृत वनक्षेत्र होय. हे क्षेत्र वाघ, गौर, चितळ, सांबर, रानपिंगळा या सारख्या वन्य पशुपक्षी यांचे वसतिस्थान आहे. मेळघाट टेकड्यांमधील राखीव वनक्षेत्रातील अत्यल्प शाकाहारी प्राणी आणि वाघ वास्तव्यास आहेत. तर ताडोबा, करंडला, बोर आणि नागझिरा या सपाट प्रदेशात मोठ्या संख्येने शाकाहारी प्राणी आणि वाघांची संख्या जास्त आहे. वरील स्थिती लक्षात घेता गेल्या २ वर्षात जैविक वैविधतेचे संवर्धन आणि स्थानिक समुदायांच्या गरजा भागविण्यासाठी सर्वसमावेशक अशी व्यूहनीती विकसित करण्यात आली आहे. ताडोबाच्या गाभा क्षेत्रातील (core area) गावांचे पुनर्वसन करून तिथे वाघांचे निवासस्थान संरक्षित करणे यावर भर देण्यात आला आहे. मेळघाटात १५ ते २८ खेड्यांना गाभा क्षेत्रात कायम ठेवून सहअस्तित्व वाढीस प्रोत्साहन देण्यात येत आहे. चारा, जळण यांची पर्यायी व्यवस्था आणि पर्यावरण आधारित पर्यटनाद्वारे जीवन जगण्याची साधने

उपलब्ध केली जात आहेत.

**पर्यावरणीय विकासाची व्यूहनीती**

मेळघाटच्या बफर झोनमधील जी खेडी स्वत:च पुनर्वसनास तयार आहेत, त्यांच्यासाठी पर्यावरणीय विकासाच्या व्यूहनीतीची अंमलबजावणी करण्यात येत आहे. मूळ २८ खेड्यांपैकी ज्या ६ खेड्यांनी ग्रामसभा आणि ग्रामपंचायतीमध्ये पुनर्वसनाचा ठराव केला त्यांचे पुनर्वसन व्याघ्र प्रकल्पाबाहेर करण्यात येईल. प्रत्येक खेड्याच्या गरजा लक्षात घेऊन पुनर्वसन पॅकेज तयार करण्यात आले.

चुर्नी, वैराट या खेड्यांनी जमिनीच्या बदल्यात जमिनींची मागणी केली. त्यामुळे मेळघाट व्याघ्र संरक्षित क्षेत्राला लागून असलेली जमीन प्रत्येक जमीनधारकाला देण्यात आली तसेच भूमिहीनांना एक हेक्टर वनक्षेत्र मंजूर करण्यात आले.

नव्या गावठाणामध्ये पाणीपुरवठा, विद्युत, डांबरी रस्ते यांची व्यवस्था करण्यात आली. तसेच नजीकच्या उत्कृष्ट शाळांमध्ये जाण्यासाठीही सोय केली गेली. राज्य शासनाच्या आणि रोजगार हमी योजनेच्या विविध योजनांतर्गत सिंचनाच्या सोई उपलब्ध करून देण्यात आल्या. नव्या खेड्यांमध्ये वनातील मुक्त चराई क्षेत्राच्याऐवजी गायींना विशिष्ट चराई क्षेत्र (स्टॉल) उपलब्ध करून दिले गेले. स्वयंपाकासाठी बायोगॅस असलेली घरे ग्रामस्थांना देण्यात आली.

अमोना, नगरतास, धारगड या खेड्यांनी ठराव करून राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन पॅकेजचा स्वीकार केला. त्यानुसार प्रत्येक कुटुंब १० लाख रुपये मिळण्यास पात्र ठरले. प्रत्येक कुटुंबाने रोख रक्कमेचा पर्याय स्वीकारला असला तरी वनविभाग आणि जिल्हा प्रशासन यांनी संपूर्ण रक्कम रोखीने देण्याऐवजी वेगळा मार्ग स्वीकारला. प्रारंभी २ लाख रुपये घर बांधणीसाठी आणि रिलोकेशनसाठी देण्यात आले. घरबांधणी पूर्ण झाल्यावर ७ लाख रुपये दीर्घ मुदतीच्या मासिक व्याज देणाऱ्या वार्षिक योजनेत गुंतवण्यात आले. जिल्हाधिकारी आणि उपवनसंरक्षक यांच्या पूर्व परवानगीशिवाय ही रक्कम काढता येणार नव्हती. यामुळे प्रत्येक कुटुंबाला दरमहा ६,५०० रुपये उत्पन्न मिळणे शक्य झाले.

रोख रकमेच्या पॅकेजमध्ये नव्या गावठाणाचा विकास ही बाब अंतर्भूत नव्हती. तरीसुद्धा जिल्हा प्रशासन, वन विभाग आणि टायगर फाऊंडेशन यांनी नव्या गावठाण्यात संयुक्तरित्या पिण्याचे पाणी, विद्युत, अंतर्गत रस्ते आणि गरज असेल त्या ठिकाणी जोडरस्ते उपलब्ध करून दिले. या चारही नव्या गावठाणांनी नजीकच्या विकसित गावठाणाच्या एखाद्या भागाजवळच्या जागा निवडल्या. त्यामुळे त्यांना या विकसित गावठाणातील शाळा, इतर पायाभूत सुविधा आणि मोठ्या शहरांशी असलेल्या दळणवळण व्यवस्थेचा लाभ घेणे शक्य झाले.

राष्ट्रीय वन्य जीव मंडळाचे सदस्य किशोर रिठे यांच्या नेतृत्वाखालील सातपुडा फाऊंडेशन आणि श्रीनिवास रेड्डी यांचे सक्रिय नेतृत्व यांच्यामुळे हे साध्य होऊ शकलं. या यशस्वी पुनर्वसनाचा परिणाम असा झाला की, सेमडोह, सोमठाणा, तलाई, रोरा, गुल्हागढ या खेड्यांनी पुनर्वसनाचे हेच पॅकेज मागायला सुरुवात केली. या चारही गावांचा पुनर्वसन पॅकेजमध्ये समावेश नव्हता. पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने जिल्हा प्रशासनाला ही मागणी मान्य करता येणे शक्य नव्हते. अमरावती विद्यापीठाने स्वतंत्रपणे केलेल्या अभ्यासानुसार जी खेडी शिफ्ट झाली नाहीत त्यांच्यापेक्षा पुनर्वसित खेड्यांमध्ये दरडोई उत्पन्नामध्ये १० पट वृद्धी झाली.

२८ खेड्यांपैकी अद्यापही १५ ते १८ खेडी मेळघाटात आहे. बफर झोनमध्ये ५४ खेडी आहेत. याठिकाणी सहअस्तित्वाचा मार्ग अधोरेखित करण्यात आला आहे. याठिकाणी राज्य शासनाने संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांच्या बळकटीकरणास चालना दिली. संरक्षित क्षेत्रात मोठा साग पडल्यास त्यातील ५० टक्के भाग स्थानिक खेड्याला आणि पर्यावरण विकास समितीला देण्याचा निर्णय घेण्यात आला.

व्यवस्थापन प्रकल्प निधी आणि कॉम्पेनसेटरी वनीकरणाचा वापर करून मेळघाट, ताडोबा आणि इतर संरक्षित क्षेत्रातील १०० खेड्यांना १० लाख रुपये देण्यात येऊन ग्रामसभेने विकसित केलेली सूक्ष्म योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. ही योजना जिल्हा परिषद, पशुसंवर्धन, कृषी, वन विभाग यांच्या सहकार्याने तयार करण्यात आली. त्यामध्ये विकासाच्या सर्व योजनांचे एकत्रीकरण करण्यात आले. वन आणि वन्यजीवांवरील जैविक दबाव कमी करण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरली. या सूक्ष्म योजनेमुळे १०००



कुटुंबे जाळणासाठी लाकडाचा वापर करण्याऐवजी बायोगॅस आणि एलपीजीचा वापर करण्यास प्रवृत्त झाली. या गावांना पर्यटन सुविधा हाताळण्यासाठी सक्षम करण्यात आले. सेमाडोह वननिवासातील खानपान व्यवस्था, नरनाळा किल्ल्याच्या पायथ्याशी शहानूर खेड्यातील पर्यटन सुविधा पुरविण्याचे काम त्यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. त्यामुळे पर्यटकांकडून त्यांना थेट उत्पन्न मिळत आहे. त्याचबरोबर संवर्धनात त्यांचा सहभागही वाढला आहे. सरकारने आदिवासी उपयोजना, विशेष साहाय्यता योजना, जिल्हा परिषद वन ७ टक्के सेस या योजनांचे एकत्रीकरण करून पर्यावरणपूरक खेड्यांतील बायोगॅस, मुक्त चराई क्षेत्राऐवजी गुरांसाठी चराई स्टॉल्स, उच्च उत्पादन देणारी गुरे, व्यक्तिगतरीत्या वृक्षारोपण करणे या योजनांसाठी ७५ टक्के सूट देण्यात येत आहे.

## ताडोबा


ताडोबामध्ये साधारणत: १०० वाघ असण्याची शक्यता असून या ठिकाणी इतर शाकाहारी प्राणी मोठ्या संख्येने आढळतात. मात्र, प्रत्येक वर्षी १० ते २० वाघिणींची पिल्ले गाभा क्षेत्रातून बफरझोनमध्ये जातात आणि तिथून भिवापूर, नवेगाव, बोरकडे जाणाऱ्या मार्गांवर येतात. नागझिरा किंवा ताडोबात येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाला वाघांचे दर्शन होते. मात्र जामनी खेड्यासाठी हे एक आव्हान झाले आहे. या खेड्यातील माझ्या पहिल्या भेटीच्या वेळी एक ग्रामस्थ सारखा विचारत होता की वाघ दररोज आमच्याच गावात का येतो? सहअस्तित्वाची संकल्पना त्यास अद्याप समजलेली नाही, असेच म्हणावे लागेल.

ताडोबा, जामनी आणि नवेगावातील महत्त्वाच्या व्याघ्र ठिकाणाच्या आसपास चार-पाच खेडी अद्याप आहेत. कोळसा येथील उर्वरित कुटुंबांनी स्वयंस्फूर्तीने या वनक्षेत्राच्या बाहेर स्वत:चे पुनर्वसन करण्याचा निर्णय घेतला. खूप उशीर झालेल्या पुनर्वसनाच्या कार्यास ३२ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाल्यावर गती मिळाली. नवेगाव आणि जामनी यांचे पुनर्वसन मूल-नागपूर रस्त्यावरील आमडी आणि खडसंगी येथे करण्यात येत आहे. जामनी आणि नवेगावच्या लोकांनी निवडलेली वनजमीन प्रत्येक कुटुंबाने नव्याने निर्मिती केलेल्या सिंचन व्यवस्थेमुळे उत्तमरीत्या विकसित केली. या गावठाणांना वीज आणि पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात आला. हे पुनर्वसन डिसेंबरमध्ये पूर्ण होईल. तेव्हा सध्याचे पीक पूर्ण घेऊन झालेले असेल आणि लोक नव्या जागी वास्तव्यास गेलेले असतील.

कोळसा येथे पुनर्वसनासाठी पुरेसा निधी उपलब्ध करूनसुद्धा लोक असमाधानी होते. मात्र आता बंडू धोत्रे व इतर यांच्या सहकार्याने कोळसा ग्रामस्थांशी पुन्हा विस्तृत चर्चा करण्यात आली. त्यामुळे आणखी ३० कुटुंबांनी ताडोबाच्या बाहेर पुनर्वसन करण्याचा स्वत:च निर्णय घेतला. सध्या केवळ ६७ कुटुंबे कोळशात आहेत.

वाघांच्या शिकारीचे एकही प्रकरण वाघांच्या गाभा क्षेत्रात घडलेले नाही. सर्व शिकारी बफर झोन किंवा त्याबाहेरील प्रदेशात घडल्या आहेत. बफरझोन क्षेत्रात असणाऱ्या ग्रामस्थांचा तसेच ग्रामस्थांना गाईड पुरविले जातात. बफर क्षेत्रातील अशा १५ मार्गांचे नियोजन करण्यात आले आहे. संवर्धनावर आधारित पर्यावरणपूरक पर्यटन व्यवसायात थेट सहभाग मिळत असल्याने स्थानिक ग्रामस्थ वाघ संरक्षणात सक्रिय सहभाग घेऊ शकतील. या पाठिंबा व सहभागातून त्यांना शाश्वत स्वरूपाचे जीवनमान मिळेल.

ताडोबातील वाघिणींच्या वाढत्या जननदरामुळे बाहेलिया संघटित टोळ्यांच्या कारवाया बोर, नागझिरा आणि ताडोबाच्या आजूबाजूला वाढल्या आहेत. कटनीतील या टोळ्यांना नेपाळातील चिनी व्यापाऱ्यांकडून आगाऊ रक्कम दिली जाते. एप्रिल आणि मेमध्ये पाणवठ्यावर येणाऱ्या वाघांना स्टीलच्या सळ्यांनी जेरबंद केले जाते.



वाघ संवर्धनात सहभाग वाढावा म्हणून वेगळी व्युहनीती आखणे गरजेचे आहे. त्याचबरोबर शिकार रोखण्यासाठी काही स्मार्ट उपाययोजना करणे आवश्यक आहे.

ताडोबाला भेट देणाऱ्या पर्यटकांमुळे दरवर्षी ४५ लाख रुपये मिळतात. हा पैसा ताडोबा टायगर फाऊंडेशनकडे जातो. यावर्षी बफर झोनमधील ५३ खेड्यांना प्रत्येकी ५१ हजार रुपये देण्यात आले. गाभा क्षेत्राच्या लगेच बाहेर असणाऱ्या जुनोना, मेवाडा खेड्यांना पर्यटकांकडून फी वसूल करण्यासाठी प्रवेशद्वार उभारण्याचा अधिकार दिला गेला. दर दिवशी ताडोबाच्या गाभाक्षेत्रात ५१ वाहनांनाच प्रवेश दिला जातो. ज्यांना प्रवेश मिळत नाही त्यांना देवाडामार्गे बफर झोन मध्ये प्रवेश दिला जातो. या ठिकाणी पर्यावरण पूरक विकास समितीमार्फत प्रवेशाचे व्यवस्थापन केले जाते.

महाराष्ट्र सरकारने नॅशनल टायगर कंझर्वेशन अथॉरिटीला वाघ संरक्षणासाठी पुरेसा निधी देण्याबाबत आश्वस्त केले आहे. विशेष व्याघ्र संरक्षण दलाच्या दोन बटालियन उभारण्यात येणार असून त्यात स्थानिक आदिवासी युवकांचा समावेश केला जाणार आहे. पेंच आणि ताडोबा येथे हा दल उभारण्यात आला आहे.

शासनाने एका गुप्त निधीची स्थापना करण्यास मान्यता दिली असून वन पाटलांना मानधन दिले जाईल. हे वन पाटील शिकारी टोळ्यांची माहिती पुरवतील.

नागपूर-मूल रोडवरील भिवापूर-उमरेड कांडाला परिसरातील वनक्षेत्रात वाघांची संख्या वाढल्याने वाघ या परिसरातून बाहेर पडून रेल्वे


लाईन्स, राष्ट्रीय महामार्ग, ताडोबा आणि नागझिऱ्यातील शेती, बोर आणि या क्षेत्रातील विस्तृत वनपट्ट्यांमध्ये जात आहेत. बोर अभयारण्य ६० चौ.कि.मी. तर नागझिरा १५० चौ.कि.मी. आहे. ही दोन्ही क्षेत्र वाघ आणि शाकाहारी प्राण्यांच्या वाढत्या संख्येला सामावून घेण्यासाठी पुरेशी नाहीत.

संरक्षित क्षेत्राचे रॅशनलायझिंग या विषयावरील वाईल्ड लाइफ इन्स्टिट्यूटचा अहवाल आणि महाराष्ट्रातील अभयारण्ये यावरील काही संस्थांच्या अहवालाचा अभ्यास केल्यानंतर महाराष्ट्र सरकारने १५० चौ.कि.मी. चे अतिरिक्त क्षेत्र नागझिरा अभयारण्याचे विस्तारित क्षेत्र म्हणून घोषित केले. १३० चौ.कि.मी. अतिरिक्त क्षेत्र नवेगाव अभयारण्याचे विस्तारित क्षेत्र म्हणून घोषित केले आणि ६० चौ.कि.मी.चे अतिरिक्त क्षेत्र बोर अभयारण्याचे विस्तारित क्षेत्र म्हणून घोषित केले. परिणामी संरक्षित क्षेत्र दुप्पट झाले. त्यामुळे वाढलेल्या शाकाहारी प्राणी आणि वाघांना पुरेसे क्षेत्र उपलब्ध झाले. शिवाय सीमारेषेबाहेरील खेडी आणि शेतीवर कोणताही परिणाम झाला नाही.

ताडोबा तलावाच्या परिसरातील मोठे व्याघ्र प्रजोत्पादन क्षेत्र २ वर्षांपासून भिवापूर आणि कारंडला परिसराकडे सरकले आहे. हे १९० चौ.कि.मी. राखीव आणि संरक्षित क्षेत्र आहे. या क्षेत्राला संरक्षित क्षेत्राचा अधिकृत दर्जा मिळालेला नाही तरी रोहीत कारुसारखे वन्यजीव संरक्षक स्वयंप्रेरणेने प्रत्येक वाघांवर लक्ष ठेवून आहेत. अभयारण्याच्या बाहेर त्यांनी २१ वाघांची नोंद केली आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने हे क्षेत्र आता ४१ वे अभयारण्य म्हणून घोषित झाले आहे.

मात्र आपणास नकाशावरून लक्षात येते की, विदर्भातील व्याघ्र परिसर हा महामार्ग, कालवे, रेल्वे, वीजखांब यामुळे तुकड्यांमध्ये दुभंगलेला आहे. काही दिवसांपूर्वी बिबट आणि त्यांच्या पिल्लांना विजेचा धक्का बसून झालेला मृत्यू तसेच रेल्वे रुळांवर झालेला बिबटाचा मृत्यू या बाबी तुकड्यांमध्ये विभाजित झालेल्या क्षेत्राचा पुरावाच देतात. या विभाजित क्षेत्रामुळे वाघांच्या उत्तम प्रजननावर मर्यादा आल्या आहेत. सलग विस्तृत क्षेत्रातच वाघांचा अधिकाधिक संपर्क येणे शक्य आहे. विभाजित प्रदेशामुळे यावर मर्यादा आल्या आहेत.





रानपिंगळा

नुकत्याच झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी जलसंपदा विभाग, ऊर्जा वितरण विभाग आणि महामार्ग प्रकल्प यांना निर्देशित केले की, त्यांनी कालव्यांवरून पुलांची बांधणी करावी. तसेच वनक्षेत्र जोडणारे अंतर्गत रस्ते तयार करावेत. यांमुळे वाघांचा परस्परसंबंध येण्यास साहाय्य होऊ शकेल.

**सह्याद्री परिसर**

कोयना परिसरातील दिचौली, पुनवली, आम्बेघर आणि नहिमे यांच्यावर दुहेरी दबाव आहे. एक कोयना धरणाचा आणि दुसरा कोयना अभयारण्याचा. कोयना धराणामुळे या खेड्यांना कराड, सातारापासून सामान्य आर्थिक व्यवहार करणे अशक्य होऊन बसले आहे. कोयना अभयारण्याची घोषणा झाल्यावर या खेड्यांच्या पायाभूत विकासासाठी आवश्यक असलेल्या दळणवळण व्यवस्था, वीज पुरवठा यावर बंधने आली आहेत. त्यांच्या पुनर्वसनाच्या मागणीला केराची टोपली दाखवण्यात आली. गेल्या वर्षीपासून वनविभागाने काही निधी बाजूला काढून ठेवण्यास सुरुवात केली. यामधून पुलूस आणि बाबरमाची या खेड्यांमध्ये संपूर्ण पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येत आहेत. २०० कुटुंबे नव्याने विकसित केलेल्या जागेवर राहायला गेली आहेत. याठिकाणी सर्वांना शेतजमीन देण्यात आली. या शेतात जंगली डुक्कर आणि सांबाराचा उच्छाद थांबला. त्यामुळे पिकांचे नुकसान थांबले. कोयनेच्या अवतीभोवतीच्या बफर झोनमध्ये संयुक्त वनव्यवस्थापन समित्या सक्रिय झाल्या आणि त्यांनी पुणे आणि भारतातील इतर भागातून येणाऱ्या इच्छुक ट्रेकर्ससाठी ट्रेकिंग मार्गांचा विकास करणे सुरू केले. या ट्रेकर्सचे सामान सोबत घेणे आणि गाईड करण्यासाठी स्थानिक व्यक्ती देण्यात येऊ लागल्या. यामुळे वन्यजीव संरक्षणाचा हेतू साध्य होऊ लागला. या ट्रेकर्समुळे अवैध शिकार करणाऱ्यांवर देखरेख ठेवणारी व संनियंत्रण करणारी एक अतिरिक्त यंत्रणा गाभा क्षेत्रात तयार झाली. पावसाळ्यात या क्षेत्राची वनसुरक्षा व देखरेख अत्यल्प गार्डमुळे शक्य नव्हती.

कुसूमताई कर्णिक आणि इतर गटाच्या पाठिंब्यामुळे भीमाशंकर अभयारण्य क्षेत्रात बहुतांश खेड्यांनी राहण्याचे ठरविले, वन विभागाने त्यांना पाठिंबा दिला. कालवली या गावात स्थानिक पर्यावरण विकास समितीमार्फत ऊर्जापूरक स्टोव्ह पुरवण्यात आले. ट्रेकर्स आणि पर्यटकांसाठी घरगुती राहण्याची व्यवस्था केली गेली. भिमाशंकर मधील अनेक खेडी या अभयारण्यातील प्रवेशासाठी फी आकारत आहेत. या पैशाचा उपयोग वनातील प्लॅस्टिक गोळा करून तो रिसायकलिंग करून शहरात पाठवण्यासाठी करण्यात येत आहे.

**माळढोक आणि काळवीट**

आता माळढोक पक्षी अभयारण्याची सीमा रॅशनालाईज्ड करण्यात येऊन ती ८२०० चौ.कि.मी. पासून १२०० चौ.कि.मी. पर्यंत मर्यादित करण्यात आली आहे. काल्पनिक अशा सीमेमधून सोलापूर महापालिका क्षेत्र, मोहोळ, कर्माळा शहरे, राष्ट्रीय महामार्ग वगळण्यात येऊन केवळ राखीव वनक्षेत्र आणि शासकीय माळरान क्षेत्रच ठेवण्यात आले. पूर्वी या अभयारण्यात समाविष्ट करण्यात न आलेला जंगेवाडी गवताळ प्रदेश नवे अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले. या जंगेवाडीमध्ये माळढोक नियमितपणे प्रजोत्पादन करीत असत. नजिकच्या अभयारण्याला लागून असलेल्या शेतात सेंद्रीय शेती करावी यासाठी स्थानिक शेतकऱ्यांचे मन वळवावे यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. त्यामुळे माळढोक पक्ष्यांना कीटकांचे खाद्यान्न मिळू शकेल. रासायनिक खत आणि कीटकनाशकांमुळे यांचा नाश झाला असता. १९९५-९७ या काळात सोलापूरचा जिल्हाधिकारी म्हणून मी कार्यरत असताना नानजच्या प्रत्येक भेटीच्या वेळी मी माळढोक बघितले आहे. मात्र सध्याच्या माझ्या भेटीच्या दरम्यान मला त्यांच्या आवडत्या टेकडीवर माळढोक दिसले नाहीत. माळढोकला वाचवण्यासाठीचा लढा आपण हरतोय की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. उजनी धरणातील पाण्यामुळे ज्वारी पिकवणारे अधिकाधिक शेतकरी ऊस पिकाकडे वळत आहेत किंवा डाळींब शेतीकडे वळत आहे. त्यामुळे माळढोक, काळवीट, कोल्हे, गवताळ प्रदेशातील इतर प्रजाती यांचे भविष्य अंधकारमय झाले आहे. □□



# व्याघ्रप्रकल्पांच्या वाटेवर...

**भारताच्या माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांनी वाघ आणि वन्यजीवांच्या संरक्षणाकरिता महत्त्वाचे निर्णय घेतले. व्याघ्र प्रकल्पाची स्थापना व वन्यजीव संवर्धन कायदा १९७२, हा त्यांच्याच कार्यकाळात करण्यात आला. भारतातील वन्यजीव व्यवस्थापनावर दूरगामी परिणाम करणारा हा कायदा ठरला. विसाव्या शतकाच्या प्रारंभी भारतातील जंगलात ४०,००० वाघ होते. परंतु १९६९ मध्ये ही संख्या १२०० वर आली. याची प्रमुख कारणे व्यापारी तत्त्वावर करण्यात येणारी शिकार, वाघाची शिकार केल्यामुळे प्रतिष्ठा वाढते, अशी उच्चभ्रू लोकांमध्ये असलेली प्रतिष्ठेची समजूत, लोकसंख्येची वाढ, शेतीसाठी जमिनीचा वाढता वापर या बाबींमुळे वाघ भारतातून नष्ट होईल अशी भीती व्यक्त होत होती. त्यामुळे वाघांचे अस्तित्व राखण्यासाठी सन १९७३ या वर्षामध्ये भारत सरकारने व्याघ्र प्रकल्प योजना कार्यान्वित केली.**

ए. के. मिश्रा,
एच. व्ही. माडभुषी

जैविक अन्नसाखळीचा परमोच्च बिंदू वाघ आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वाघाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवाचे अस्तित्व हे सुद्ध जैविक अन्न साखळीवर अवलंबून असते. यामुळे वाघांचे अस्तित्व फार महत्त्वाचे आहे. वन्यजीव व्यवस्थापनामध्ये वन्यजीवांच्या संवर्धनास प्राधान्य देण्यात येत आहे. वाघांचे संवर्धन केल्यामुळे माती, पाणी, गवत, झुडपे, मोठी झाडे, कीटक, छोटे प्राणी, शाकाहारी प्राणी, मांसाहारी प्राणी, पक्षी, सरपटणारे प्राणी इत्यादींचे संवर्धन आपसूकच होते.

१९७३ मध्ये व्याघ्र प्रकल्प देशातील ९ ठिकाणी सुरू करण्यात आला. प्रथमच सुरू झालेल्या ९ प्रकल्पांमध्ये महाराष्ट्रातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचा समावेश होता. ज्या संरक्षित क्षेत्रामध्ये वाघांची संख्या जगण्याजोगी आहे त्या ठिकाणी व्याघ्र प्रकल्प स्थापन करण्यात येतो. वन्यजीव संवर्धन अधिनियम १९७२ ( सुधारणा २००६) मधील कलम ३८ व्ही अन्वये राज्य शासन राष्ट्रीय संवर्धन प्राधिकरणाच्या शिफारसीनुसार व्याघ्र प्रकल्प घोषित करू शकते. व्याघ्र प्रकल्प हा केंद्रीय योजनेचा भाग असून केंद्र शासन राज्यांना तांत्रिक सल्ला व आर्थिक मदत देते.

**पेंच व्याघ्र प्रकल्प**

वाघ हा प्राणी स्वत:चे क्षेत्र निश्चित करीत असतो. त्यामुळे वाघांची जगण्यायोग्य संख्या असण्याकरिता ८०० ते १२०० चौ.किमी चे जंगल आवश्यक आहे. पेंच व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र ७४१.२२ चौ.किमी असले तरी या व्याघ्र प्रकल्पालगत मध्यप्रदेशातील पेंच व्याघ्र प्रकल्प

असल्याने सदर व्याघ्र प्रकल्पामध्ये अधिवास पुरेसा असून वाघांची संख्या वाढत असल्याचे दिसून येते.

पूर्वी जंगल सलग असल्याने वाघांची संख्या जास्त होती. परंतु वाढती लोकसंख्या व शेतीसाठी जमिनीचा वाढता वापर यामुळे जंगल कमी होत आहे. सर्व व्याघ्र प्रकल्पांना एकमेकांशी जोडणे आवश्यक आहे. याकरिता कॉरिडॉरचा विकास तसेच संरक्षित क्षेत्रासभोवताली इको सेन्सिटिव्ह झोनची निर्मिती करून व्याघ्र प्रकल्प एकमेकांशी जोडण्याचा उद्देश काही प्रमाणात पूर्ण होईल.

**व्याघ्र प्रकल्प व्यवस्थापन**

व्याघ्र प्रकल्पाची विभागणी प्रामुख्याने कोअर व बफर क्षेत्रात केली जाते. कोअर क्षेत्र पूर्ण मानवी हस्तक्षेपापासून मुक्त ठेवणे अपेक्षित असून त्यामध्ये संरक्षण, आधारभूत सुविधांची वाढ, गावांचे पुर्नवसन, पर्यावरण संतुलित विकास ही कामे केली जातात. कोअर क्षेत्रात पर्यटकांवर पूर्णपणे बंदी असते. बफर क्षेत्रात वन्यप्राणी व मानव यांच्या सहअस्तित्त्वाची संकल्पना अपेक्षित असून, संवर्धनात्मक कामे केली जातात. तसेच या क्षेत्रांमध्ये परिस्थितीकीय ग्राम विकास समिती स्थापन केली जात असून वन व्यवस्थापनामध्ये ग्रामस्थांचा सहभागसुध्दा घेतला जातो. वन्यप्राण्यांकडून झालेल्या नुकसानीची भरपाई त्वरित करण्यात येते. बफर क्षेत्रात वन्यजीवांस बाधक ठरणार नाही अशी विकास कामे केली जातात. व्याघ्र प्रकल्पाच्या व्यवस्थापनामध्ये पुढील कामे राबविण्यात येतात.

**अधिवासाचे संरक्षण**

मानवी हस्तक्षेपामुळे वनांचे तसेच वन्यजीव अधिवासाचे झालेले नुकसान भरून काढणे व वन्यप्राण्यांसाठी एक उत्तम व सुयोग्य अधिवास तयार करण्याकरिता प्रामुख्याने खालील कामे केली जातात.

- पाणस्थळांचा विकास - (कृत्रिम वाटर होल तयार करणे, नैसर्गिक वाटर होलमधील गाळ काढणे, छोटे बंधारे, गॅबियन स्ट्रक्चर)
- कुरण विकास - (उत्तम प्रकारच्या गवताची लागवड, पुर्नवसनामुळे रिकाम्या झालेल्या जागेवर कुरण विकासाची कामे करणे.)
- फळझाडांची लागवड-(वन्यप्राण्यांना आवश्यक व स्थानिकरीत्या जंगलात उपलब्ध फळझाडांची लागवड)
- तण काढणे-(उदा. कारवी, लँटेना, चे उच्चाटन)
- संरक्षण-वन्यप्राण्यांना मुख्यत्वे आग व शिकार यापासून धोका असतो. वनांचे आगीपासून संरक्षण करण्याकरिता जाळरेषा काढल्या जातात. तसेच आगीच्या मोसमात आगसंरक्षण पथकाची स्थापना केली जाते. वाघाची शिकार मुख्यत्त्वे व्यापारी कारणांमुळे, अपघाती शिकार उदा. रानडुक्कर, हरीण यांच्या शिकारीकरिता लावलेल्या जाळ्यामध्ये वाघ सापडल्याने, बदल्याच्या भावनेने केली जाते. याकरिता उपाययोजना म्हणून गस्तीपथक, व्याघ्र संरक्षण दल, टायगर प्रोटेक्शन फोर्स तसेच वन्यप्राण्यांपासून झालेल्या नुकसानीची भरपाई देणे आदी उपाययोजना केल्या जातात.

वाघांचे संरक्षण हा सगळयांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. त्यामुळे शासनाच्या विविध विभागांमध्ये प्रामुख्याने पोलीस व वन विभागामध्ये सामंजस्यांची आवश्यकता असल्याने राज्य शासनाने जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर व्याघ्र कक्षाची स्थापना करण्यात केली आहे.



वरील सर्व प्रकारची कामे क्षेत्रीय स्तरावर करण्यात येत असली तरी ग्रामीणांच्या मागण्यांमुळे वाघांचा अधिवास मानवी हस्तक्षेपरहित राहत नाही. त्यामुळे या क्षेत्रातील गावांचे पुर्नवसन करणे आवश्यक ठरते. त्यामध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे. मागील तीन वर्षांत मेळघाट व्याघ्र प्रकल्प क्षेत्र व नवेगांव राष्ट्रीय उद्यान या क्षेत्रातील ९ गावे पुर्नवसित करण्यात आली आहेत. याशिवाय इतर गावे सुध्दा पुर्नवसनाच्या निरनिराळया टप्प्यांवर प्रगतिपथावर आहेत.

**पुर्नवसन**

वन्यजीव संवर्धन अधिनियम १९७२ चे तरतुदीनुसार संरक्षित क्षेत्र मानवविरहित करावयाचे असल्याने संरक्षित क्षेत्रातून महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुर्नवसन अधिनियम १९९९ तसेच राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार गावांचे ऐच्छिक पुर्नवसन केले जाते. याअंतर्गत एकरकमी १० लक्ष रुपये देऊन या कुटुंबांचे पुर्नवसन केले जाते. प्रचलित कायद्यानुसार पुर्नवसन करण्यात येते. पुर्नवसित होणाऱ्या कुटुंबांना वरील दोन पर्यायांपैकी एका पर्यायाची निवड करण्याची मुभा असते.

**वन्यप्राण्यांचे सनियंत्रण**

व्याघ्र प्रकल्पामध्ये वन्यप्राण्यांच्या सनियंत्रणाकरिता गणना केली जाते. वन्यप्राण्यांची गणना करण्याकरिता २००६ पर्यंत पारंपरिक पध्दतीने म्हणजेच पदचिन्ह तपासणी (पगमार्क) केले जात होते.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने सन २००९-१० मध्ये जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून double sampling पध्दतीने करण्यात येते. double sampling पध्दतीमध्ये Transet line व कॅमेरा ट्रॅप पध्दतीचा वापर केला जातो. वन्यप्राण्यांची प्रत्यक्ष गणना करणे अशक्य असल्याने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पुरावे उदा. प्रत्यक्ष प्राणी पाहणे, विष्टा, DNA sampling इत्यादी प्रकारची माहिती Transet line वर फिरून गोळा केली जाते व त्यानंतर या माहितीचे विश्लेषण करून सरासरी प्राण्यांची संख्या प्राप्त केली जाते. ही पध्दत प्रामुख्याने शाकाहारी प्राण्यांकरिता उपयोगात आणली जाते. कॅमेरा ट्रॅप पध्दतीमध्ये कॅमेरा ट्रॅपचा वापर करून वन्यप्राण्यांचे प्रत्यक्ष फोटो काढण्यात येतात. त्यानंतर त्यांच्या शरीरावरील पट्टयांचे विश्लेषण करून प्राण्यांची संख्या काढली जाते. ही पध्दत प्रामुख्याने वाघ व सहशिकारी प्राण्यांसाठी अवलंबली जाते.

**आधारभूत साधनसामग्रीचा विकास**

व्याघ्र प्रकल्पातील वन्यजीव संवर्धन व संरक्षणाकरिता आधारभूत साधनसामग्री उपलब्ध करून दिली जाते. जसे, वायरलेस यंत्रणा, क्षेत्रीय कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने, क्षेत्रीय कार्यालय, संरक्षण कुटी, वाहन, तपासणी नाके, बॅरिअर, मचाण इत्यादी.

**पारिस्थितीकीय विकास कामे**

वन, वन्यप्राणी व मानव यांचे अस्तित्व सहजीवनावर अवलंबून आहे. याकरिता गावांचे वनांवरील अवलंबित्व कमी करून, गावाचा विकास पर्यायाने ग्रामस्थांचे जीवनमान उंचावण्याकरिता पर्यावरणाशी निगडित पुढील विकास कामे (Eco-Development Works) केली जातात.

- रोजगार निर्मिती
- स्वयंरोजगार-प्रशिक्षण व साधनसामग्रीचा पुरवठा
- सरपणाचा वापर कमी करण्याकरिता

बायोगॅस व एलपीजी गॅसकरिता सबसिडी

- भाकड जनावरांची संख्या कमी करून दुधाळू जनावरांचा पुरवठा.
- अपारंपरिक ऊर्जेचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्याकरिता सोलर कूकर, सोलर दिवे, सोलर पंप इत्यादींचा पुरवठा.
- वन व्यवस्थापनामध्ये ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग येण्याकरिता ग्राम पर्यावरण विकास समितीची (Village Eco-Development Committee) स्थापना.

**जैवविविधतेचे आगार**

राज्यातील व्याघ्र प्रकल्प हे मोठ्या प्रमाणावर जैवविविधतेचे आगार आहे. तसेच तो आपला नैसर्गिक वारसा असून नितांतसुंदर अशा स्थळांनी युक्त आहे. यामुळे आपल्या देशाच्या नागरिकांनी व्याघ्र प्रकल्पांना भेटी देऊन त्याचा आनंद घ्यावा.

**मेळघाट व्याघ्र प्रकल्प**

ज्या ठिकाणी घाटांचा मेळ होतो तो मेळघाट. अमरावती जिल्ह्यातील सातपुडा-मैकाल पर्वतरांगांच्या पूर्वेस निसर्गरम्य ठिकाणे असलेला २०२९.०७ चौ. किमी परिसरात पसरलेला व्याघ्र प्रकल्प. मेळघाट व्याघ्र प्रकल्पात चिखलदरा थंड हवेचे ठिकाण व नरनाळा आणि गाविलगडसारखे ऐतिहासिक किल्ले आहेत. या क्षेत्रात प्रामुख्याने कोरकू, निहाल, बलिया व गवळी या जमाती राहतात. हे क्षेत्र जैवविविधतेच्या दृष्टीने समृध्द असून सिपना, खंडू, गडगा, तापी, वान, पुर्णा या नद्या आहेत. मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वाघांसोबत आपण बिबट, अस्वल, तरस, सांबर, रानगवे, शेकरू इत्यादी प्राणी, २६० प्रकारचे पक्षी आढळून येतात. दुर्मीळ असलेला रानपिंगळा (Forest Owlet) हा पक्षी मेळघाटातील चौराकुंड या ठिकाणी हमखास पाहता येतो.


सर्पगरूड

नागपूरपासून अंतर- २३० किमी

अमरावतीपासून अंतर-११० किमी.

जवळचे विमानतळ - नागपूर

जवळचे रेल्वे स्टेशन - अमरावती.

निवास व्यवस्था-चिखलदरा येथे खाजगी हॉटेल तसेच सेमाडोह, शहानूर व हरीसाल येथे पर्यटन संकुल. त्यामध्ये डॉर्मेटरी, युवक निवास, रेस्ट हाऊस इत्यादी.

संपर्क- मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.


गाविलगड किल्ल्याचे प्रवेशद्वार

फोन नंबर- ०७२१×२६६२७९२

ई-मेल आयडी- projecttigermel-ghat@gmail.com

**ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प**

औद्योगिक वसाहती, कोळश्याच्या खाणी, औष्णिक वीजप्रकल्प असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर शहरापासून ४० किमी अंतरावर हमखास वाघ पाहण्याचे ठिकाण म्हणजेच ६१९.७६ चौ.किमी. क्षेत्रात पसरलेले ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प. या ठिकाणी वाघांसोबत आपण पाहाल सांबर, चितळ, भेटकी, गवा, चौसिंगा, चांदिअस्वल तसेच २३० प्रकारचे पक्षी तसेच पौराणिक आख्यायिका असलेले व सध्या मगरींचे आश्रयस्थान असलेला ताडोबा तलाव, या ठिकाणी असलेले जंगल शुष्क, पानगळीचे आहे.

पर्यटकांची गर्दी व वाहनांच्या संख्यांवर असलेली मर्यादा पाहता या ठिकाणी वाहनांचे व



## चार व्याघ्र प्रकल्प

| अ. क्र. | व्याघ्र प्रकल्पाचे नाव | समाविष्ट संरक्षित क्षेत्राचे नांव | जिल्हा | भौगोलिक क्षेत्र | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कोअर | बफर | एकूण |
| १ | मेळघाट व्याघ्र प्रकल्प | गुगामल राष्ट्रीय उद्यान, मेळघाट अभयारण्य नरनाळा अभयारण्य वान अभयारण्य अंबाबरवा अभयारण्य | अमरावती बुलढाणा | १५००.४९ चौ.किमी. | १२६८.०३ चौ.किमी. | २७६८.५२ चौ.किमी. |
| २ | ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प | ताडोबा राष्ट्रीय उद्यान अंधारी अभयारण्य | चंद्रपूर | ६२५.८२ चौ.किमी. | ११०१.७७ चौ.किमी. | १७२७.५९ चौ.किमी. |
| ३ | पेंच व्याघ्र प्रकल्प | पेंच राष्ट्रीय उद्यान मानसिंगदेव अभयारण्य | नागपूर | २५७.२६ चौ.किमी. | ४८३.९६ चौ.किमी. | ७४१.२२ चौ.किमी. |
| ४ | सहयाद्री व्याघ्र प्रकल्प | कोयना अभयारण्य चांदोली राष्ट्रीय उद्यान | सातारा सांगली कोल्हापूर सावंतवाडी | ६००.१२ चौ.किमी. | ५६५.४५ चौ.किमी. | ११६५.५७ चौ.किमी. |

राहण्याचे आगाऊ आरक्षण करून जाणे योग्य. तसेच पावसाळ्यामध्ये पर्यटकांच्या मार्गावर निर्बंध आहेत.

जवळचे विमानतळ-नागपूर

जवळचे रेल्वे स्टेशन-चंद्रपूर.

निवास व्यवस्था-खाजगी हॉटेल तसेच मोहर्ली व कोलारा येथे पर्यटन संकूल. त्यामध्ये डॉर्मेटरी, युवक निवास, रेस्ट हाऊस इत्यादी.


गवा

संपर्क- मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक,

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.

फोन नंबर- ०७१७२×२५१४१४

ई-मेल आयडी- ccf_fdtatr@rediffmail.com

**पेंच व्याघ्र प्रकल्प**

विदर्भाच्या पूर्वेस नागपूर शहरापासून जवळ एकदिवसीय सहल आयोजित करण्याकरिता उत्तम. या व्याघ्र प्रकल्पाचे नाव या क्षेत्रातून जाणाऱ्या पेंच नदीच्या नावावरून ठेवण्यात आले. या व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र २५७.२७ चौ.किमी आहे. या व्याघ्र प्रकल्पाला लागून मध्य प्रदेशातील पेंच व्याघ्र प्रकल्प आहे. या व्याघ्र प्रकल्पाचे आत तोतलाडोह धरण आहे. या क्षेत्रातील जंगल शुष्क, पानझडीचे असून या ठिकाणी वाघांसोबत आपण बिबटे, अस्वल, तरस, सांबर, रानगवे, शेकरू इत्यादी प्राणी व २६० प्रकारचे पक्षी आढळून येतात.

नागपूर पासून अंतर- ६० किमी

जवळचे विमानतळ-नागपूर

जवळचे रेल्वे स्टेशन-नागपूर

निवास व्यवस्था- सिल्लारी येथे पर्यटन संकूल. त्यामध्ये डॉर्मेटरी, युवक निवास, रेस्ट हाऊस इत्यादी.

**संपर्क** : मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक,

पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर

फोन नंबर- ०७१२×२५६०७२७

ई-मेल आयडी - ccffd-pench@mahaforest.gov.in


तरस

**सह्याद्री व्याघ्र प्रकल्प**

पश्चिम घाटातील सदापर्णी जंगल व कोयना अभयारण्याचा समावेश, कोयना नदीवरील धरणामुळे शिवसागर तलाव व चांदोली धरण असलेले, निसर्गरम्य ठिकाणांचा समावेश असलेला याघ्र प्रकल्प म्हणजेच सहयाद्री व्याघ्र प्रकल्प. या व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र ७४१.२२ चौ.किमी असून या ठिकाणी असलेले जंगल southern tropical semievergreen, southern tropical moist deciduous, west coast tropical evergreen या ३ प्रकारचे आहे. या व्याघ्र प्रकल्पामध्ये वाघांसोबत बिबटे, रानगवे, शेकरू इत्यादी प्राणी आढळतात.

जवळचे विमानतळ - कोल्हापूर

जवळचे रेल्वे स्टेशन - कोल्हापूर



# बोर अभयारण्य

वर्धा जिल्ह्यातील बोर अभयारण्याकडे पर्यटक मोठ्या प्रमाणावर आकर्षित होत आहेत. तेथील समृद्ध वन्यजीवसृष्टी, पट्टेदार वाघांचे वास्तव्य, बोर प्रकल्पातील जलाशयाच्या बाजूचा निसर्ग, धाम प्रकल्पाचा परिसर, कोटेश्वर येथील वर्धा नदीचा किनारा, तेथील ऐतिहासिक पार्श्वभूमी, आष्टी तालुक्यातील अंतोरा गावची दासटेकडी, आर्वीचा सारंगपुरी तलाव परिसर, गिरड येथील बुनाफरिद टेकडी व ढगा येथील जंगलातील शिवमंदिर पर्यटकांना आकर्षित करतात.

अनिल गडेकर

जिल्ह्यात नवरगाव, गरमसूर, महाकाली, ढगा, बांगडापूर, गारपीट, शिवणफळ, ताडगाव, पोहणा हा परिसर निसर्गसौंदर्याने, समृद्ध आहे. वन्यप्राण्यांचे आकर्षण असणाऱ्यांसाठी बोरधरण म्हणजे वर्धा जिल्ह्यातील नंदनवनच आहे.

वर्धा-नागपूर मार्गावर असलेले सेलू तालुक्यातील हिंगणीजवळील हे अभयारण्य पेंच प्रकल्पामध्ये येते. दक्षिण सातपुड्याच्या पर्वतरांगांमध्ये वसलेले ६२ चौरस किलोमीटर क्षेत्र असलेले हे अभयारण्य सृष्टीसौंदर्याने नटलेले आहे. जंगलभ्रमंतीसाठी वाहन असल्यास परवानगी दिली जाते. प्रवासी वाहन, व्यक्ती आणि गाईड वनविभागाचा वनरक्षक यासाठी रितसर शुल्क भरून घेता येतो.



जंगलभ्रमंती करण्यासाठी उन्हाळा हा ऋतू आल्हाददायी असतो. मे-जून महिन्यात तर दुपारपासून सायंकाळपर्यंत वन्यप्राण्यांची पाणवठ्यावर ये-जा सुरू असते. येथे फिरताना बॅक वॉटरवर म्हणजेच धरणाच्या मागच्या बाजूला पर्यटकांना वन्यप्राण्यांचे दर्शन घडते. मानोली हट, भुलाई डोह, कारई टवीर येथेही प्राण्यसाठी कृत्रिम पाणवठे निर्माण करण्यात आल्यामुळे तहानलेले जीव दिसून येतात.



बोर धरण

बोरधरण हे चारही बाजूंनी टेकड्यांनी व्यापलेले आहे. या धरणाचे पाणलोट क्षेत्र ३७६.३२ कि.मी. आहे. धरणातील जलसाठा १३८.७५ द.ल.घ.मी. असून हे धरण १९७० साली पूर्ण झाले. या धरणाला यशवंत जलप्रकल्प म्हणूनही ओळखले जाते.

**या अभयारण्यात १८५ प्रकारच्या विविध पक्ष्यांची नोंद पक्षी निरीक्षक डॉ.सलीम अली आणि मारुती चित्तमपल्ली यांनीही केली आहे.**

या अभयारण्याची ओळख विपुल जैवविविधतेसाठी आहे. बोर नदीत मत्स्यजन्य प्राणी, जलचर, पक्षी व फुलांच्या वनस्पतीची रेलचेल दिसून येते. फूल आणि पक्षी यांना विशिष्ट ऋतूमध्ये आवश्यक असणारे नैसर्गिक खाद्य येथे विपुल प्रमाणात आहे. इथे उपयुक्त वनस्पतींमध्ये, कॉसिया, टोरा, टेतेला, कॅसिया टी कळटा, ट्रीबूलस टेरिटेरीज, फ्लेमेगिया, वनभेंडी, वेलची, वायोरी या वनस्पतींसह उपयुक्त पिळदार बांबू, सागाचे जंगलही आढळून येते.

या अभयारण्यात नुकतीच नागपूर व वर्धा जिल्ह्यातील ६१ चौरस किलोमीटरची भर पडली असून केंद्राने या अभयारण्याला वाघाचे आश्रयस्थान म्हणून घोषित केले आहे. इथे पट्टेदार वाघ, बिबटे याबरोबरच अनेक प्राणी या अभयारण्यात, मुक्तसंचार करताना दिसतात. अस्वली, रानडुक्कर, नीलगाय (रोही), सांभर, चितळ, भेडकी, लांडगे, कोल्हे, रानकुत्री, रानमांजर, खवले-मांजर, साळिंदर, मसण्या उद, उडती खार आणि मोरांसोबतच सर्व गरुड, तुर्रेवाले गरुड, बहिरी ससाणाही दिसतात.

अतिशय कमी क्षेत्र असलेल्या या बोर अभयारण्यात ८ वाघ आणि ११ बिबट्यांचे वास्तव्य असल्याने शासनाने या क्षेत्राला वाघांचे आश्रयस्थान संबोधले असावे. हमखास व्याघ्र दर्शनाचे स्थळ म्हणून याकडे पर्यटक आकर्षित होत आहेत.

धरणामुळे सर्वसामान्यांना हा परिसर परिचित आहे. परिसरातील विशाल स्तूपही येथे येणाऱ्यांना खुणावत असतो. परिसरालगतच खोरी खापा येथे शिवमंदिर, चौकी येथे देशातील एकमेव बृहस्पतीचे मंदिर आहे. या परिसरातील ५-२१ चौ.कि.मी. भागाला इको-टुरिझम झोन म्हणून घोषित केले आहे. या भागात करु वृक्षाचा डिंक प्रसिद्ध आहे. या डिंकाला भारत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चांगली मागणी आहे. अभयारण्यातील पर्यटकांना फिरण्यासाठी वनविभागाने चारचाकी वाहनांची व्यवस्था करणे गरजेचे आहे. धरणाच्या जलाशयात नौकाविहार करण्यासाठी बोटींची संख्या वाढविणे आवश्यक आहे. या किरकोळ बाबी सोडल्यास उत्कृष्ट पर्यटनस्थळ म्हणून बोर अभयारण्य उदयाला आले आहे.

# वनव्यवस्थापनात लोकसहभाग

भारतीय संस्कृतीचा जन्म अरण्यातच झाला. अरण्यांनी तिला समृध्दीचा मार्ग दाखविला. प्राचीन काळात अरण्यातील वृक्ष वनस्पती हा मानवी जीवनाचा मोठा आधार होता. जो सर्व काही देतो त्याला देव म्हणतात. म्हणून आपल्या ऋषिमुनींनी जीवन जगण्यासाठी सर्वकाही देणाऱ्या झाडांना देव मानले. पूजनीय मानले. जल, वायू, अग्नी, आकाश व पृथ्वी यावर जीवन अवलंबून आहे म्हणून पंचमहाभूतांनाही देव मानले. वेद, पुराण, उपनिषद, रामायण, महाभारत या सर्व प्राचीन ग्रंथात वृक्ष, वनस्पतींचे अक्षय महत्त्व

पोपटराव पवार

प्रतिपादन करण्यात आलं आहे. अरण्य हे पृथ्वीला आणि पृथ्वीवरील सर्व जीवांना तारणारी व पर्यावरण राखणारी देवता मानली जाते. यातून पुढे देवराया निर्माण झाल्या. देवराईतलं हिरंव झाड तोडणे महापाप समजलं जाऊ लागलं. त्यातून जंगलाचं संरक्षण झालं. आजही आपल्या राज्यात असंख्य देवराया आहेत.

पुढे ब्रिटिश आपल्या देशात व्यापारासाठी आले. त्यांचं लक्ष भारतीय जंगलाकडे गेलं. त्यांनी आपल्या यनदाट जंगलाचा व्यापारासाठी उपयोग केला. १८५५ सालात







**जल, अग्नी, वायू, पृथ्वी व आकाश यांचे पर्यावरण राखण्याचे काम वृक्ष करतात. त्यामुळे वृक्षसंपत्तीच्या रक्षणातच सर्वांचे कल्याण आहे. वनखाते हे वनाचे रक्षण करण्याचे व वृक्षसंवर्धनाचे काम करीत आहे. परंतु लोकसहभागाशिवाय त्यात यश येणार नाही. हे ओळखूनच १९८२ साली सामाजिक वनीकरण खाते शासनाने सुरू केले. लोकसहभागातून वनव्यवस्थापनाची चळवळ सुरू झाली. शासकीय जमिनीसह खाजगी जमिनीवर वनीकरणाचे काम सुरू झाले. वनखात्याची जमीन असलेल्या महाराष्ट्रात पंधरा हजार गावांपैकी १२ हजार ७६० गावांत संयुक्त वनव्यवस्थापन व वनसंरक्षण समित्या स्थापन करण्यात आल्या असून, महाराष्ट्राने देशात आघाडी घेतली आहे.**

लॉर्ड डलहौसीने जंगलाबाबतचे धोरण जाहीर केले. १८५६ साली खाजगी वने सोडून इतर अरण्ये सरकारी मालकीची झाली. त्यासाठी खास वनखाते निर्माण करण्यात आले. परंतु त्यात वनसंरक्षणाऐवजी वनांचा व्यापारी उपयोग करण्याचे उद्दिष्ट होते. त्यानुसार ब्रिटिशांनी भारतीय अरण्यांचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला. रेल्वेसाठी व इंग्लंडमधील कारखान्यांसाठी लागणाऱ्या कोळशासाठी वनांचा विनाश घडवून आणला. तेव्हापासूनच भारतीय वनांची विनाशाकडे वाटचाल सुरू झाली. हे लक्षात आल्यावर १९२७ साली ब्रिटिशांनी पहिला वनसंरक्षण कायदा केला. स्वातंत्र्यानंतर १९५२ व १९८८ सालात वनसंरक्षण कायद्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या. परंतु ब्रिटीशकाळात जेवढा वनविनाश झाला नाही, तेवढा वनविनाश विकासाच्या नावाखाली झाला. याला वाढती लोकसंख्या, वाढते औद्योगिकीकरण, वाढते नागरिकीकरण इत्यादी अनेक कारणे कारणीभूत आहेत.

ब्रिटिशकाळात भारताचा मोठा भूभाग वनाखाली होता. स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत त्यात मोठ्या प्रमाणात घट झाली. १९५२ च्या राष्ट्रीय वननीतीनुसार देशाच्या एकूण भूभागाच्या ३३ टक्के भूभागावर वन असावे, असे ठरविण्यात आले. परंतु २००७ च्या पाहणीनुसार भारताचा २१.०२ टक्केच भाग वनाखाली आहे (शासकीय अहवाल). महाराष्ट्राचे हे प्रमाण २०.१२ टक्के असल्याचे आढळून आले आहे. म्हणजेच महाराष्ट्राच्या एकूण ३ लाख ७ हजार ७१३ चौरस किलोमीटर क्षेत्रापैकी ६१ हजार ९३९ क्षेत्रच वनाखाली आहे. त्याच ४७.४७६ चौरस किलोमीटर क्षेत्रावर १५.४२ टक्के चांगले वनाखाली आहे. राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये मिळून १५ हजार ५३९ चौरस किलोमीटर क्षेत्राचा समावेश आहे.

विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात वृक्षतोड झाली. वन क्षेत्राचा संकोच झाला.

त्याचा पर्यावरणावर दुष्परिणाम झाला. वृक्ष म्हणजे कार्बनडायऑक्साईड प्राशन करून आपणांस प्राणवायू देणारे अमृतकुंभ आहेत. पावसाचे पाणी जमिनीवरून वाहतांना झाडाची मुळे माती घट्ट धरून ठेवतात. त्यामुळे माती ही आपली अन्नदाता आहे. मातीतूनच आपणांस सर्व काही मिळते. या एक इंच मातीचा थर निर्माण होण्यास २५० ते ७०० वर्षे लागतात. धरतीवर आज जी जीवनदायी माती आहे ती वाहून गेली तर भूभागाचे वाळवंट बनते. वृक्षवनस्पती वाळवंटीकरणाचा प्रतिबंध करतात. ढगांना आकर्षित करून पाऊस पाडायला मदत करतात. तसेच भूगर्भात पावसाचे पाणी मुरवून जलसाठे निर्माण करतात. हे झाडांचे आपल्यावर केवढे ऋण आहे. हे ऋण विसरून आपण वृक्षवनांची अमानुषपणे कत्तल केली. त्याचे परिणाम वायू प्रदूषण, जलटंचाई व जमिनीचे नापिकीकरणाचे रूपात भोगत आहेत. आज भासणारा जल दुष्काळ हा निसर्गाने आणलेला नाही, तर मानवाने केलेल्या निसर्ग विनाशामुळे तो ओढवलेला आहे.

संयुक्त व्यवस्थापन समित्या अधिक कार्यक्षम व बळकट होण्यासाठी वनखात्याचे प्रधान सचिव प्रविणसिंह परदेशी यांच्या पुढाकारातून काही निर्णय घेतले गेले आहेत. पूर्वी वनातील आदिवासी समाज, वनालगतचे गावकरी व वनांचे घनिष्ठ नाते होते. वनांसाठी माणूस व माणसांसाठी वन या भावनेने लोक वनसंरक्षण करायचे. ब्रिटिश काळात ही भावना नष्ट झाली. ब्रिटिशांनी वनांवर आपली संपूर्ण मालकी प्रस्थापित केली. त्यामुळे लोक वनांपासून दुरावले.

महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण शासन निर्णय १) दिनांक ५ ऑक्टो.२०११ २) ८ जानेवारी २०१२ ३) १० जुलै,२०१२ रोजी घेतले. शासनाच्या या निर्णयांमुळे वनाशी जोडण्याचे काम साधले गेले आहे. यात प्रधान सचिव प्रविणसिंह परदेशी यांचे मोठे योगदान लाभले आहे. ५ ऑक्टोबर २०११ च्या निर्णयानुसार संयुक्त वनव्यवस्थापन समितीत ५० टक्के महिलांचा समावेश करण्यात आला, ही चांगली गोष्ट झाली.

**वनव्यवस्थापन समित्यांचे अधिकार**

८ जानेवारी २०१२ आणि १० जुलै २०१२ च्या शासन निर्णयामुळे वनव्यवस्थापन समित्यांना अधिक अधिकार देण्यात आले आहेत. लोकांची एक स्वयंभू यंत्रणा म्हणून संयुक्त वन व्यवस्थापन



समितीस मान्यता मिळाली. शासनाच्या वरील निर्णयांमुळे शासकीय वन कर्मचारी व लोकांचा समन्वय साधला गेला. त्यामुळे ३३ टक्के वनक्षेत्र निर्माण होण्यास मदत होणार आहे. दरवर्षी वनउत्पानात वाढ होईल. वनात लागणाऱ्या वनवणव्यावर प्रतिबंध होईल. वनवणव्याने होणारा विनाश थांबेल.

**वनसंरक्षणासाठी अधिक निधी**

रोजगार हमी योजनेतून वनसंरक्षणासाठी अधिक निधी उपलब्ध होतो. परंतु राज्याच्या तिजोरीत कररूपाने जो पैसा जमा होतो, त्यातल्या ५ टक्के (पूर्वी रोजगार हमी योजनेनुसार) तरतूद वनव्यवस्थापनासाठी केली तर फार मोठे काम होईल. वनतळे, कंटुरबंडिंग इत्यादी कामे यंत्रांद्वारे झाले तर वनांबरोबर मृद व जलसंधारणाचे चांगले काम वनक्षेत्रात होईल. त्यांचा उपयोग लोकांना होईलच



**संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांचे बळकटीकरण व मार्गदर्शनास्तव वनविभागाचे प्रधान सचिव प्रवीणसिंह परदेशी यांनी ठाणे विभागात शहापूरला, नागपूर विभागात चंद्रपूरला व अमरावती विभाग येथे या समित्यांचे मेळावे व कार्यशाळा आयोजित केल्या. त्यामुळे शासन निर्णयाची माहिती लोकांपर्यंत पोहोचली. संयुक्त वनव्यवस्थापनाची लोकचळवळ बनण्यात व गतिमान होण्यास या मेळाव्यांची मोठी मदत झाली.**



शिवाय चारा-पाण्यासाठी वन्यजीवांना वनक्षेत्र सोडून मानवी वस्तीत जाण्याची गरज उरणार नाही. गावांना भासणारी जलटंचाई जाणवणार नाही. या कामाने मनुष्य व वन्यजीवांचा शाश्वत विकास होईल. तसे काम झाले तर राज्य देशाच्या वनविभागाला नवी दिशा देणारे राज्य ठरेल.

फार दूर अंतरावरील रोजगार हमीवरील कामासाठी गावांत मजूर जात नाहीत. वनक्षेत्रात मिळणारी मजुरी, जास्त अंतर व असुविधांमुळे वनात काम करण्यात तो इच्छुक नसतो. मजुरांना काम करताना सर्व सुविधा नॉनप्लॅन बजेटमधून मिळाल्या तर तो कामावर जाईल व चांगले काम करील.

या शासन निर्णयांमुळे वनविभागाचा समाजाला मोठा फायदा होणार आहे. त्याचे उदाहरणच द्यायचे झाले तर गडचिरोली जिल्हातील लेखामेंढा गावाचे देता येईल. या गावाच्या संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांना विक्रीतून आठ कोटी रुपयांचा फायदा झाला. त्यासाठी वनहक्क कायद्याचा उपयोग झाला. वनहक्क कायद्यामुळे वनव्यवस्थापन समित्या व वनातील समाजाला अधिक उत्पन्न लाभाची मोठी संधी आहे. भविष्यात वनव्यवस्थापन व वनहक्क समित्या अधिक प्रभावी झाल्यानंतर साधन-संपत्तीचा विकास होऊन गावे स्वयंपूर्ण व स्वावलंबी झाली तर महात्मा गांधींचे ग्रामस्वराज्याचे स्वप्न साकार होईल.

आज वनजमाती मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करण्याच्या मार्गावर होत्या. परंतु शासन निर्णयामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन समृद्धीकडे वाटचाल करणार आहेत. ५ ऑक्टोबर २०११ च्या निर्णयामुळे ग्रामसभा व ग्रामपंचायतींना अनेक अधिकार व हक्क मिळाले आहेत. परंतु भविष्यात दलाल व माफिया ग्रामसभांचा ताबा घेण्याचा धोका आहे. त्यामुळे ही चळवळ चुकीच्या दिशेने जाऊ शकते. हा धोका टाळण्यासाठी ग्रामसभा सक्षम होण्याची गरज आहे. तसेच ग्रामसभांत सर्वांनी सहभाग देण्याची गरज आहे. कामात सदैव कार्यक्षमता, सतर्कता व पारदर्शकता राखली पाहिजे. तसेच चार शासन निर्णयांची चांगल्याप्रकारे अंमलबजावणी झाली पाहीजे. वन कर्मचाऱ्यांनी व समित्यांनी प्रामाणिकपणे काम करावे त्याप्रमाणे वनसमितींना मार्गदर्शन होणे गरजेचे आहे. शासन निर्णय राज्यस्तरावरून निर्गमित झाला आहे. परंतु त्याची अंमलबजावणी तालुका, ग्रामस्तरावर होणार आहे. त्यासाठी मुख्यत्वे, समित्या, ग्रामसभा व ग्रामपंचायत यांचा समन्वय हवा. कामातला प्रामाणिकपणा महत्त्वाचा आहे. हे सर्व लक्षात घेऊन काम झाले तर या चळवळीस दिशा मिळून पर्यावरणाचा प्रश्न सुटेल. गावे स्वावलंबी होतील. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व वनमंत्री डॉ. पंतगराव कदम यांनी १०० कोटी वृक्ष लागवडीचा सोडलेला संकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी वनविभाग कार्यरत झाले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात वनखात्याची दिशा बदलत आहे.

प्रवीणसिंह परदेशी प्रशासनातले उत्साही सामाजिक कार्यकर्ते आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली वनव्यवस्थापन व वनसंवर्धनाची मोठी चळवळ उभी राहू शकते. त्यासाठी संयुक्त वनव्यवस्थापन समितीत चांगल्या, प्रामाणिक, अभ्यासू व गावाच्या कुटुंबत्वाचा विचार करणाऱ्या प्रतिनिधींचा समावेश व्हावा. शासन निर्णयामुळे जे वैयक्तिक लाभ मिळणार आहेत, ते योग्य व्यक्तीपर्यंत पोहचावेत. ते चुकीच्या व्यक्तींकडे गेले तर चळवळीचा तोटा होईल. समितीची कार्यक्षमता कमी होईल. प्रामाणिकपणे काम केल्यास मोठ्या प्रमाणात गावांना निधी मिळेल व गावाचे सामाजिक चित्र बदलून जाईल.

**'नगरेची रचावी जलाशये निर्मावी !**
**महावने लावावी नानाविधे!!'**

ही श्रीसंत ज्ञानेश्वरांची ओवी आणि,

**वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे !**
**पक्षीही सुस्वरे आळविती !!**

या संत तुकारामांच्या अभंगानुसार संयुक्त वनव्यवस्थापन समित्या वनसंवर्धन आणि वनांचे जतन उत्तमरीत्या करतील, असा विश्वास वाटतो.

**संपर्क : ९४२०७५२५२५**







जंगल भ्रमंती

# निसर्ग पर्यटनाचा आनंद

**संत ज्ञानेश्वरांनी गुरूकडे (संत निवृत्तीनाथ) 'प्रत्येक गाव हे सर्व इच्छा पूर्ण करणाऱ्या कल्पवृक्षांनी व्यापलेले, चेतना चिंतामणीसारखे म्हणजेच चिंता दूर करणारे असावे, गावाची वाणी अमृताप्रमाणे मधुर असावी' अशी मागणी ज्ञानेश्वरीत केली आहे. संत ज्ञानेश्वरांनी मागणी केल्याप्रमाणे कल्पतरू काही गावाजवळील जंगलात असणार नाही परंतु गावाजवळील जंगल हेही कल्पतरूपेक्षा कमी नाही तसेच सर्व चिंता दूर करणारा, सर्वांमध्ये चेतना जागविणारा चिंतामणी आहे किंवा नाही हा प्रश्न आहे; परंतु प्रत्येक गावासभोवताल वन असेल तर प्रत्येक गावकऱ्यास शुध्द हवा, पाणी मिळेल. जमिनीची धूप होणार नाही तसेच लहानसहान अपारंपरिक वनौषधी, रानमेवा उदा. करवंद, टेमरू, मोह, चार, खिरणी, बिबा इत्यादी उपलब्ध होईल. तसेच मनुष्य हा सामाजिक प्राणी असून विरंगुळा हे त्याच्या जीवनाचे एक विभिन्न अंग आहे. जंगल भ्रमंती व पक्षांचे विविध आवाज यामुळे मिळणारी शांतता, मनास व शरीरास आवश्यक तरतरी देऊन जाते.**

गौरी सूर्यवंशी

सांप्रतकाळी मोठी शहरे अस्ताव्यस्त वाढत आहेत. छोटया शहरांचे मोठ्या शहरांत रूपांतर व गावांचे शहरीकरण यामुळे सगळीकडे काँक्रिटची जंगले वाढीस लागल्याचे दिसून येत आहे. औद्योगिकीकरणामुळे प्रदूषणाचे प्रमाण वाढत आहे. शहरी लोकांना निसर्गापासून दुरावल्याचे चित्र प्रकर्षाने दिसून येत आहे. यामुळे ज्ञानेश्वरांना अभिप्रेत असलेले गाव दिसून येत नाही. वाढत्या उद्योगीकरणामुळे जीवनक्रम यंत्रासारखे व्यस्त झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे निसर्गाच्या सान्निध्यात मिळणारी थोडी मानसिक शांतता, थोडा विरंगुळा आवश्यक असल्यामुळे दिवसेंदिवस पर्यटन क्षेत्रास चालना मिळत आहे. महाराष्ट्रात पर्यटन स्थळांची कमतरता नाही. ऐतिहासिक वारसा असलेले गडकिल्ले, धार्मिक स्थळे, थंड हवेची ठिकाणे इत्यादी ठिकाणी पर्यटक भेटी देत असतात परंतु याठिकाणीसुध्दा गर्दी वाढलेली दिसून येते. त्यामुळे शांतता, वन्यजीव दर्शन, विरंगुळा याकरिता पर्यटकांमध्ये वनभ्रमंती करण्याचे प्रमाण वाढीस लागलेले आहे.

**नैसर्गिक वारसा**

वन व वन्यजीव हे आपला नैसर्गिक वारसा असल्याने त्यांचे जतन करणे अत्यावश्यक आहे. पर्यटनामुळे या नैसर्गिक वारशास कोणत्याही प्रकारे हानी न पोचता पर्यटकांना निसर्गाचा आस्वाद घेण्याकरिता महाराष्ट्र शासनाने २० फेब्रुवारी २००८ अन्वये राज्याचे निसर्ग पर्यटन धोरण जाहीर केले आहे. या धोरणाप्रमाणे निसर्ग पर्यटन छोट्या प्रमाणात पर्यावरणीय दृष्टिकोनातून सामाजिक व सांस्कृतिक तसेच आर्थिकदृष्ट्या योग्य, अनुभवसिध्द व शिकण्यायोग्य असावे. तसेच निसर्ग पर्यटनामध्ये स्थानिक लोकांचा सहभाग असावा. ते निसर्गाचा ऱ्हास करणारे नसावे आणि पर्यटकांच्या मागणीनुसार परंतु काही निर्बंधासह असावे, असे अभिप्रेत आहे.

निसर्ग पर्यटन म्हणजे - 'स्थानिक रहिवाशांच्या संस्कृतीचा आविष्कार, अप्रदूषित व नैसर्गिक क्षेत्रात वन्यपशुपक्षी व झाडेझुडपे यांचा अभ्यास, निसर्गाची ओळख तसेच निसर्गाचा आस्वाद घेण्यासाठी फिरणे म्हणजे निसर्ग पर्यटन.'

निसर्ग पर्यटन करतांना पर्यटकांची अपेक्षा फक्त वन्यप्राणी पाहण्यापुरतीच असते. कवियत्री शांता शेळके यांनी गवत फुला रे गवत फुला या प्रसिध्द कवितेमध्ये एक लहान मुलगा गवत फुलास पाहून म्हणतो-

रंग रंगुल्या सान सानुल्या गवत फुला रे गवत फुला
असा कसा रे मला लागला सांग तुझा रे तुझा लळा..
मित्रासंगे माळयावरती पतंग उडवित फिरतांना
तुला पाहिले गवतावरती डुलता डुलता झुलतांना..
विसरून गेलो पतंग नभीचा विसरून गेलो मित्रांना......

या कवितेतील मुलगा ज्याप्रमाणे गवत फुलाला पाहून जग विसरून गेला त्याप्रमाणे निसर्ग पर्यटकांनी वाघ किंवा इतर वन्यप्राणी दर्शनाचा आनंद घेता घेता जंगलातील झाडेझुडपे, फळे-फुले, लहान प्राणी यांच्याही भेटीचा आस्वाद सर्व जग विसरून घेतल्यास निसर्ग पर्यटनाचा उद्देश सफल होईल.

**सुविधांचा सुकाळ**

ज्याप्रमाणे सर्वसाधारण पर्यटक हा वाघ पहाण्याकरीता व्याघ्र प्रकल्पात जात असतो त्याप्रमाणे धार्मिक स्थळास भेट देणाऱ्यांमध्ये हौसे, गवसे, नवसे यांचा समावेश असतो. निसर्ग पर्यटकांमध्ये हौशी पर्यटक, फक्त विरंगुळा आणि शांततेकरिता येणारे पर्यटक व निसर्गाचा आस्वाद घेण्याकरिता येणारे पर्यटक व निसर्गाचा अभ्यास करण्याकरिता येणारे पर्यटक भेट देत असल्याने व्याघ्र प्रकल्पाच्या सभोवताली पर्यटक सुविधांचा सुकाळ झालेला दिसतो. यामुळे व्याघ्र प्रकल्प परिसरात अनिर्बंध वाढलेल्या पर्यटक सुविधांमुळे वाघाच्या अधिवासाचा ऱ्हास होत असल्याने, व्याघ्र प्रकल्पांमध्ये पर्यटनासंबंधी दाखल जनहित याचिकेच्या अनुषंगाने; सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण नवी दिल्ली यांनी १५ ऑक्टोबर २०१२ रोजी, व्याघ्र प्रकल्प व त्याच्या सभोवतालच्या क्षेत्राकरिता मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली. या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही सुरू आहे. व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर क्षेत्राचे जास्तीत जास्त २० टक्के क्षेत्र पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येईल. त्यामुळे निसर्ग पर्यटनाची जास्तीत जास्त कामे बफर क्षेत्रात घेण्याचे ठरविले आहे. व्याघ्र प्रकल्पाच्या भोवतालच्या क्षेत्रातील पर्यटन सोयीसुविधा व त्यापासून मिळणारे आर्थिक उत्पन्न, स्थानिक जनतेच्या चिरस्थायी उपजीविकेचा विकास करणे व वन्यप्राणी संरक्षणाच्या उपाययोजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेत नमूद आहेत. यासंदर्भात शासन निर्णय ९ नोव्हेंबर २०१२ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

- व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर क्षेत्रातील कमाल २०% पर्यंत परंतु यापूर्वी पर्यटनाकरिता उपलब्ध असलेल्या क्षमतेपेक्षा जास्त नाही एवढे क्षेत्र निसर्ग पर्यटनासाठी अनुज्ञेय करण्यात आले आहे.
- व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील सर्व पर्यटन उद्योगसंबंधी निवास सुविधांवर खालीलप्रमाणे कन्झर्वेशन फी आकारण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

बफर झोनमधील रहिवासी असलेल्या स्थानिक गावकऱ्यांनी त्यांच्या राहत्या घरात पर्यटक निवास व्यवस्था केल्यावर conservation फी आकारण्यात येणार नाही. तसेच ग्रामपरिसर विकास समिती/ग्रामपंचायतीच्या सामूहिक मालकीची निवास व्यवस्था जर असेल तर त्यालाही conservation फी लागणार नाही. मात्र शासनाचे अंगीकृत उपक्रम किंवा खाजगी हॉटेल/रिसॉर्ट (१० कक्षापर्यंत असल्यास) रु. ५००/- conservation फी प्रतिकक्ष प्रतिमाह द्यावी लागेल. त्याचप्रमाणे खाजगी हॉटेल्स/रिसॉर्ट (१० कक्षावरील असल्यास) रु. ७५०/- प्रतिकक्ष प्रतिमाह शासनाला द्यावी लागेल.

राज्यातील संरक्षित क्षेत्र (अभयारण्य व राष्ट्रीय उद्यान) रोपवाटिका, रोपवन, पानस्थळ, देवराया, ऐतिहासिक स्थळे ही प्रामुख्याने निसर्ग पर्यटन स्थळांकरिता आदर्श ठिकाणे आहेत. राज्यात अशी स्थळे भरपूर आहेत. या सर्व स्थळांचा पर्यटनदृष्ट्या विकास क्रमाक्रमाने करणे अभिप्रेत आहे. सद्यस्थितीत ज्या ठिकाणी पर्यटकांचा कल आहे अशा ठिकाणी प्राधान्याने निसर्ग पर्यटनाची कामे घेण्यात येत आहेत. राज्यातील प्रमुख निसर्ग पर्यटनस्थळांच्या विकासाकरिता प्रामुख्याने मचाण, पानस्थळ विकास, निसर्ग पथ, ईको-फ्रेंडली स्वच्छतागृह, विश्रामगृह दुरूस्ती, निवास व्यवस्था, तंबु, निसर्ग निर्वचन केंद्र, तपासणी नाके, प्रवेशद्वार, जाहीरात व प्रसिद्धी, घनकचरा व्यवस्थापन, पिण्याचे पाणी, इत्यादी विकास कामे केली जातात.


अंबाखोरी येथील मचान, पेंच व्याघ्र प्रकल्प

**निसर्ग पथ**

पर्यटकांना निसर्ग पर्यटनाचा निर्भेळ आनंद मिळावा याकरीता निसर्ग पथ तयार करण्यात आलेले आहेत. तसेच हौशी पर्यटकांकरिता Adventure tourism, cycling, rope climbing इत्यादी क्रीडा सुविधा करण्यात आलेल्या आहेत. तसेच स्थानिकांना रोजगार मिळून ग्रामीणांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून गृह पर्यटन, प्रशिक्षण (कर्मचारी, गाईड, आदरातिथ्य व्यवस्थापन) इत्यादी कामे प्रामुख्याने केली जातात, परंतु विकास कामे प्रचलित नियम उदा. वनसंवर्धन कायदा १९८०, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ चे तरतुदींचा विचार करूनच केली जातात. या कामांची अंमलबजावणी प्रामुख्याने ग्राम पारिस्थितीकीय विकास समितीमार्फत करण्यात येते. स्थानिक गावकरी पाश्चात्त्य पध्दतीचे

अंबाखोरी, पेंच व्याघ्र प्रकल्प



शौचालय व स्नानघर तसेच तारांकित सुविधायुक्त शयनकक्ष तयार करून त्यांच्या घरी पर्यटकांना योग्य मोबदला घेऊन अतिरिक्त निवासस्थान उपलब्ध करून देतील. त्यामुळे पर्यटकांना परंपरागत निवासस्थानात राहण्याचा आनंद मिळेल व स्थानिक लोकांना आर्थिक लाभ होईल. या पद्धतीचे निवासस्थान तयार करण्याचे तसेच पर्यटकांचे आदरातिथ्य करण्याचे प्रशिक्षण स्थानिक लोकांना देण्यात आले आहे.

**वैशिष्ट्यपूर्ण कामे**

शासनाच्या धोरणानुसार ग्राम परिसर विकास समित्या स्थापित करून ठिकठिकाणी त्यांच्या माध्यमातूनच निसर्ग पर्यटनाची कामे सुरू आहेत. उदाहरणादाखल कांही समित्यांनी केलेली वैशिष्ट्यपूर्ण कामे -

**सेमाडोह**

सेमाडोह ग्राम पारिस्थितीकीय विकास समितीद्वारे प्रमुख महानगरांतील विद्यार्थ्यांची निसर्ग शिबिरे आयोजित करण्यात येतात. प्रत्येक शिबिर सेमाडोह व शहानूर येथील निसर्ग निर्वाचन केंद्रामध्ये २ दिवसांचा मुक्काम घेऊन आयोजित होत असतात, निसर्ग निर्वचन केंद्र व वन विश्रामगृहात उपाहारगृहाची व हाऊसकिपिंगची सुविधा उपलब्ध आहे.

समिती भोजन व्यवस्था करून सदस्यांना रोजगार मिळवून देत असते व प्राप्त होणारा फायदा ठेवत असते १,५१,३४०/- रुपये एवढा महसूल पहिल्या वर्षात निसर्ग विकास समितीस प्राप्त झाला आहे.

**शहानूर**

शहानूर ग्राम पारिस्थितीकीय विकास समितीद्वारे साहसी पर्यटन, पक्षी निरीक्षण, विविध गटांच्या माध्यमाने पर्वतरांगामध्ये चढण्यांस चालना देणे तसेच निसर्ग निर्वाचन केंद्र व पर्यटकांसाठी निवासी आणि भोजनाची व्यवस्था समितीद्वारे सुरू आहे. समितीला पहिल्या वर्षातच रु. २,५५,४८०/- एवढे उत्पन्न प्राप्त झाले आहे.

**गुल्लरघाट**

गुल्लरघाट ग्राम पारिस्थितीकीय विकास समितीद्वारे गुल्लरघाट येथे औषधी/ आयुर्वेदिक बागांचा वन विभागाच्या आधिपत्याखाली पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोलाच्या मदतीने विकास करण्यात येणार आहे. आयुर्वेद व निसर्गाच्या अमूल्य ठेव्याकडे पर्यटकांचे आकर्षण राहील, गुल्लरघाट तलावाजवळ पक्षी निरीक्षण करणे ही बाब पर्यटकांना आकर्षित करीत आहे, रु. ३१०००/- एवढा महसूल प्रतिवर्ष निसर्ग विकास समितीस प्राप्त झालेला आहे.

**पिट्टेझरी व बक्की ग्राम**

पिट्टेझरी व बक्की ग्राम पारिस्थितीकीय विकास समितीद्वारे १ नोव्हेंबर, २०१२ ते ३१ जानेवारी, २०१३ पर्यंत निसर्ग विकास समितीचे निसर्ग पर्यटनांमार्फत (टेंट हाऊसमध्ये भेट दिलेल्या पर्यटकांच्या संख्येकरिता टेंट हाऊसचे शुल्क इ.) प्राप्त झालेले उत्पन्न अनुक्रमे रु. २,५४,२६०/- व रु. ४९,६००/- एवढे आहे.

**नागझिरा**

१ नोव्हेंबर, २०१२ ते ३१ जानेवारी, २०१३ पर्यंत नागझिरा वन्यजीव अभयारण्य, नवीन नागझिरा वन्यजीव अभयारण्य व नवेगांव राष्ट्रीय उद्यानमध्ये स्थानिक तरुणांना गाईडमार्फत झालेल्या सेवेपासून प्राप्त झालेले उत्पन्न अनुक्रमे रु. ४,५२,२००/-, ५,९००/-, व ४१,४००/- एवढे असून स्थानिक तरुणांना रोजगारही मिळाला व उत्पन्नाचे साधनही कायमस्वरूपी सुरू झाले आहे.

निसर्ग पर्यटन वाढीस लागले आहे. पर्यटन धोरण तसेच व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांच्या मार्गदर्शक सूचना व वन्यप्राणी व त्यांचे अधिवासात होणारा व्यत्यय (Disturbance) लक्षात घेता प्रत्येक पर्यटन स्थळांकरिता प्रवेश संख्येवर निर्बंध आहेत. त्यामुळे पर्यटकांनी निराशा टाळण्याकरिता आगाऊ आरक्षण (सध्या प्रमुख निसर्ग पर्यटन स्थळांचे ऑनलाइन आरक्षण सुरू झाले आहे.) करावे. राज्यातील सर्व संरक्षित क्षेत्रामध्ये निसर्ग पर्यटन विकासाची कामे करण्यात येत आहे. निसर्ग पर्यटन विकासाद्वारे ग्राम विकास व स्थानिक लोकांचा आर्थिक विकास करण्याचा त्रिसूत्री मंत्र वनविभागाने अंगीकारला आहे.

**महाराष्ट्रातील महत्त्वाची निसर्ग पर्यटन स्थळे**

पेंच वाघ्र प्रकल्प
मेळघाट व्याघ्र प्रकल्प
सह्याद्री व्याघ्र प्रकल्प
बोर अभयारण्य
राधानगरी अभयारण्य
कळसुबाई हरिश्चंद्र गड
भिमाशंकर अभयारण्य
कासपठार
कर्नाळा पक्षी अभयारण्य
संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' या संत तुकाराम यांच्या उक्तीप्रमाणे निसर्ग हा आपला सगासोयरा तसेच मित्र असल्यामुळे त्यास कोणत्याही प्रकारे त्रास देणे योग्य नाही. यामुळे निसर्गास भेट देताना त्यास कोणत्याही प्रकारचे नुकसान होईल, अशी वागणूक पर्यटकांनी करू नये, ही प्रेमाची सूचना.

❑ ❑


तंबू निवास



# नवा अध्याय

**शहरी माणसाला वाटते, घटकाभर शेतात राहावे, पाण्यात मनसोक्त डुबावे, बैलगाडीतून सैर करावी, लहानपण अनुभवत झाडांवर चढावे, गावरान चवीचे अन्न खावे, पक्ष्यांची किलबिल ऐकावी, थेट शेतीशी संबंधित गोष्टींची ओळख करून घ्यावी. आतापर्यंत असे वाटणाऱ्या लोकांना ते अनुभवण्याची संधी मिळत नसे, पण आता मात्र कृषी पर्यटन ही संकल्पना महाराष्ट्रात रुजली आहे. त्या माध्यमातून शहरी माणसांना हवा तसा 'चेंज' आणि ग्रामीण माणसांना तसेच शेतकऱ्यांना रोजगाराचे एक साधन उपलब्ध झाले आहे. शेतकरी आणि शहरी माणसांची गरज लक्षात घेऊन बारामती तालुक्यातल्या पांडुरंग तावरे यांनी आपल्या शेतात कृषी पर्यटनाचा प्रयोग यशस्वी केला आहे. कृषी पर्यटन ही नावीन्यपूर्ण संकल्पना राबवून त्यांनी शेतकऱ्यांसमोर एक आदर्श ठेवला आहे.**

आपल्यापाशी कल्पकता असेल तर शेती फायद्याचीच ठरते हे बारामती येथील प्रगतिशील शेतकरी पांडुरंग तावरे यांनी शेतकऱ्यांना दाखवून दिले आहे. मनात आणले तर शेतकरी एक उत्तम व्यावसायिक होऊ शकतो, ही बाब आता तावरे यांनी खणखणीतपणे सिद्ध केली आहे. बारामती येथे तावरे यांनी अतिशय उत्कृष्टरीत्या कृषी पर्यटन प्रकल्प उभारला आहे.

कृषी पर्यटनाच्या माध्यमातून तावरे यांचा एक उत्तम जोडव्यवसाय उभा राहिला आहेच, शिवाय त्या माध्यमातून त्यांनी अनेक कलाकार, कारागीर, महिलांना रोजगार मिळवून दिला आहे. इतकेच नव्हे तर महाराष्ट्रभरातल्या शेतकऱ्यांना ते त्याबाबत प्रोत्साहित करत आहेत.

**गणेश देशमुख**

पांडुरंग तावरे हे मूळचे बारामती तालुक्यातल्या सांगवी या गावचे. तिथे १५ ते १६ खोल्यांच्या प्रशस्त वाडयात त्यांचे वडील आणि ६ चुलते एकत्र राहत, एकत्र कुटुंबपद्धतीचे संस्कार त्यांच्यावर लहानपणापासूनच झाले. तसेच घरची शेती असल्यामुळे शेतीशी नाळ लहानपणापासूनच जुळली. बारामतीमध्ये १२ वीपर्यंतचे शिक्षण झाल्यानंतर पुण्याच्या गरवारे महाविद्यालयातून त्यांनी बी.सी.एस. केले. त्यानंतर अनुभवासाठी पर्यटन क्षेत्रात नोकरी करण्याची संधी त्यांना मिळाली. ही नोकरी करत असताना गावाकडच्या लोकांना पर्यटन क्षेत्रात काही संधी आहेत का, शेतकरी पर्यटनाच्या दृष्टीने काही करू शकेल का, हा विचार त्यांच्या मनात आला. त्याच काळात त्यांच्या असेही लक्षात आले की शेतकऱ्यांनी पूरक उद्योग म्हणून काहीतरी वेगळे केले पाहिजे. दुग्धव्यवसाय,

कुक्कुटपालन, रेशीमउद्योग हे व्यवसाय जोडधंदा म्हणून चांगले आहेत, पण त्यांना भांडवल लागते. पारंपरिक शेती करणारे शेतकरी कर्जबाजारी होतात आणि शेतीत लाभ नाही, असे म्हणतात. त्यामुळेच शेतकऱ्याचा मुलगा शेतीपासून दूर पळताना दिसतो आहे. शेती हा तोटयाचा व्यवसाय असा समज होऊ लागला आहे. या पार्श्वभूमीवर ॲग्रो टुरिझम म्हणजेच कृषी पर्यटन हा आगळा व्यवसाय पर्याय म्हणून तावरे यांच्यासमोर आला आणि त्यांनी या नव्या क्षेत्रातल्या संधीचे सोने केले.

एखादी नवीन संकल्पना राबवणे, ती लोकांच्या अंगवळणी पाडणे हे खरे तर तसे अवघड काम; पण ती गोष्ट त्यांनी एक आव्हान म्हणून स्वीकारली. कोणत्याही गोष्टीचा सारासार विचार करून आणि परिस्थितीचा पूर्ण अंदाज घेऊन काम करण्याची पद्धत असल्यामुळे त्यांनी त्या दृष्टीने काम करायला सुरूवात केली. ते म्हणतात, शहरी माणसांची शेतामध्ये जाऊन राहण्याची, शेतीची कामे करण्याची हौस भागवणारा तसेच शेतकऱ्याला चार पैसे जास्त मिळवून देणारा हा उत्तम व्यवसाय आहे. परदेशात कृषी पर्यटन ही संकल्पना आधीपासूनच रूजली आहे. यादृष्टीने काही करता येईल का, याचा विचार मी आधी केला.

२००३ पासून पांडुरंग तावरे यांनी कृषी पर्यटन या विषयावर अभ्यास सुरू केला. त्यासाठी परदेशातल्या कृषी पर्यटन या क्षेत्राची माहिती घेतली. त्यांना या कामी कुटुंबीयांची साथ मिळाली. इतर देशात कृषी पर्यटन कस राबवले जातेय? पर्यटकांशी असलेल्या वागणुकीपासून आहार - राहण्याची व्यवस्था या सर्व गोष्टी नियोजनबद्ध कशा करता येतील याचा त्यांनी अभ्यास केला. कृषी पर्यटन ही संकल्पना भारतात यशस्वी होऊ शकेल का? याबाबत सुरुवातीला त्यांचे मन साशंक होते. त्यामुळे त्यांनी एका संस्थेला हाताशी धरून संशोधन करायचे ठरवले. त्यासाठी एक प्रश्नावली तयार केली. त्या प्रश्नावलीमध्ये - शेती पाहिली का? गायींची धार काढली का? शेती पाहायला किंवा शेतामध्ये राहायला किती अंतरावर जायला आवडेल? असे प्रश्न त्यात होते. ही प्रश्नावली त्यांनी खास शहरी



ग्रामीण जीवनाचा अस्सल अनुभव पर्यटक या कृषी पर्यटन केंद्रात घेतात. त्यांना गाईचे दूध काढायलाही शिकवले जाते.

माणसांसाठी बनवली होती. त्यामध्ये माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या अभियंत्यापासून शाळकरी मुलांपर्यंत सर्वांची मते घेण्यात आली होती. सर्वेक्षणानंतर असा निष्कर्ष निघाला की ३७ टक्के लोकांना खेडेगावात नातेवाईक नाहीत म्हणून त्यांना तिथे जाता येत नाही. अशा लोकांना शेतात जाऊन चार दिवस राहण्याची संधी मिळाली तर त्यांचा या संकल्पनेला उत्तम प्रतिसाद मिळेल, अशी त्यांना खात्री पटली.

तावरे सांगतात, शहरातला बराचसा वर्ग खेडयातून शहरात आलेला किंवा एककाळी खेडयात शेती असलेला आहे. त्यामुळे आपण कधीतरी निसर्गाच्या सान्निध्यात जाऊन राहावं, पण तिथे सर्व शहरी सुविधा असाव्यात असे त्याला वाटते. त्यामुळे आम्ही कृषी पर्यटन सुरू करण्याआधी आवश्यक त्या सोयी शेतामध्ये करून घेतल्या. पण त्यासाठी अनावश्यक खर्च केला नाही, अवाजवी भांडवल गुंतवले नाही.



बारामती कृषी पर्यटन केंद्रात पाहुण्यांचं गंध लावून व महिलांचं स्वागत हळद - कुंकू लावून केलं जातं. त्यांना ते एकदम आवडतं. इथे अगत्याला खूप महत्त्व असतं.

पांडुरंग तावरे यांनी पळशी येथील त्यांच्या शेतात बारामती कृषी पर्यटन प्रशिक्षण संशोधन व विकास केंद्र या नावाने कृषी पर्यटनासाठी आपली शेतजमीन उपलब्ध करून दिली. हे महाराष्ट्रातले सर्वांत मोठे व प्रसिद्ध कृषी पर्यटन स्थळ समजले जाते. शेतात येणाऱ्या पर्यटकांना राहण्यासाठी शेतात २० खोल्या आहेत. त्यात त्यांनी एका वेळी १५० लोक राहू शकतात. सध्या त्यांच्या ३० एकर शेतामध्ये फळबाग लागवड केली आहे. त्यामध्ये आवळा, चिक्कू, पेरु, सीताफळ, मोसंब, लिंबू, आंबा, चिंच,बोर, नारळ अशा फळझाडांचा समावेश आहे. ग्रामीण खेळ खेळले जातात. तिथे जाणाऱ्या पर्यटकांना संगोपन आणि पाळत करायला शिकवले जाते. आंबा, नारळ यासारखी पिके कशी येतात, ते पाहायला मिळते.

तावरे आपल्या इथे येणाऱ्या पर्यटकांची गुऱ्हाळ, साखर कारखाना, डेअरी, वाईनरी या शेतीशी निगडित प्रकल्पांची भेट घडवतात. इतकेच नव्हे तर बैलगाडी आणि ट्रॅक्टवरून रपेट मारली जाते. शिवारातल्या तळयाला भेट दिली जाते. गुऱ्हाळात जाऊन शेतातल्या उसाचा रस प्यायला मिळते. सायकल चालवण्याचा आनंद घेता येतो. शेळया-मेंढयांच्या कळपात जाऊन त्यांच्याबरोबर खेळायलाही मिळतं. ‘बगळयांची माळ’ हवी तितका वेळ पाहता येते. दुर्मीळ पक्ष्यांचे दर्शन कॅमेऱ्यात टिपता येते. कोणत्याही कृत्रिम गजबजाटाला इथे अजिबात थारा नसतो. टेप मोठयांदा लावून नाचणे, टी.व्ही. पाहणं, मांसाहार- व्यसन या गोष्टींना इथे मज्जाव आहे. याबाबत तावरे म्हणतात- ‘या गोष्टी पर्यटक इतर पर्यटन स्थळांवर जाऊनही करू शकतात. पण कृषी पर्यटन ही संकल्पनाच मुळात वेगळी आहे. ज्याची नाळ मातीशी जोडलेली आहे, अशा व्यक्तीच इथे येण्यास प्राधान्य देतात.’

केवळ शेतात राहणे आणि मौजमजा करणं एवढा एकमेव उद्देश कृषी पर्यटन संकल्पना राबवण्यामागचा नाही तर शहरी शेतीतंत्राची ओळख करून देणे हेही तावरे आपले कर्तव्य मानतात. पण ते जेव्हा पिके, शेतीची कामे यांची ओळख पर्यटकांना करुन देतात, तेव्हा त्यामध्ये तांत्रिक मुद्दे नसतात. छोटया छोटया उदाहरणांमधून, गमतीशीर गोष्टींमधून ते पर्यटकांना शेतीतंत्र समजावून सांगतात. त्यांनी त्यांच्या बागेत कुशल असे व्यवस्थापक, गाईड तयार केले आहेत. हे व्यवस्थापक आणि गाईड कोणत्याही शहरांमधून उच्चशिक्षण घेऊन आलेले नाहीत तर गावामधल्याच बेरोजगार तरुणांना त्यांनी प्रशिक्षण दिले. या माध्यमातून रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली. त्यांना आलेल्या पर्यटकांचा पाहुणचार कसा करायचा, तिथले व्यवस्थापन अचूक कसे करायचे, हे त्यांनी शिकवले आहे. हेच गाईड पर्यटकांना शेतीची माहिती देतात, त्यांच्या मनातल्या शंका दूर करतात. कोणत्याही शेतकऱ्याला त्याच्या शेतात आवश्यक सुविधा करून घेऊन हा पूरक व्यवसाय सुरू करता येतो. मात्र त्यासाठी वक्तशीरपणा, आनंदी चेहरा, व्यवस्थापन कौशल्य आणि ज्ञान याची नितांत आवश्यकता असल्याचे तावरे यांनी स्पष्ट केले.

तावरे यांना त्यांच्या या उपक्रमाचा लाभ मिळतो आहेच, पण गावातल्या कित्येक कारागिरांच्या कलेला त्यांनी या माध्यमातून बाजारपेठ मिळवून दिली आहे. टोपल्या बनवणारे कारागीर, बैलगाडया बनवणारे कारागीर यांनाही त्याचा लाभ झाला आहे. त्यांच्या पर्यटन क्षेत्राला भेट देणारे कित्येक पर्यटक तिथल्या छोटया आकर्षक बैलगाडया घेऊन जातात. बारामती परिसरातल्या तब्बल १५०-१६० बचतगटांना त्याचा प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष लाभ मिळालेला आहे. त्यांनी बनवलेल्या वस्तू, तसेच पापडया, कुरडया यांसारख्या पदार्थांना पर्यटन केंद्राच्या रूपाने हक्काची बाजारपेठ मिळालेली आहे. टोपली, माठ, गाडगी, टोपल्या, फळे अशा अनेक गोष्टींची ही हक्काची बाजारपेठ आहे. तावरे म्हणतात, बचतगटांच्या बळकटीसाठी त्यांना मोठा व्यवसाय मिळवून देण्याचे आमचे प्रयत्न सुरू आहेत. पर्यटनासाठी आमच्या इथे येणाऱ्या पर्यटकांना जेवण बनवून देण्याच्या पातळीवर काही करता येईल, असे प्रयत्न सुरू आहेत.



भारत सरकारच्या पर्यटन विभागातर्फे दिला जाणारा 'राष्ट्रीय उत्तरदायी पर्यटन पुरस्कार' पांडुरंग तावरे यांना मार्च २०१३ मध्ये राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

वेगवेगळया कारागिरांबरोबरच लोककला सादर करणाऱ्या कलाकारांनाही तावरे यांच्या कृषि पर्यटन केंद्राने प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. गोंधळी, वाघ्या, यांचे कार्यक्रम सादर केले जातात. भारुडे- कीर्तन यामध्ये पर्यटक रममाण होऊन जातात. एक उदा. तावरे आठवणीने सांगतात- 'आमच्याकडे रोटरीचे लोक आले होते. त्यांच्यासमोर दोन तास भारुड सादर केले. त्या कलाकाराला त्यांनी ६ हजार रुपयांची टीप दिली, त्याच्या कलेला मिळालेली ती मोठी दाद होती.'



या पर्यटन केंद्रात बी कसे लावायचे, रोप कसे लावायचे, खुरपायचे कसे, फवारणी कशी करायची, अशा गोष्टी सांगितल्या जातात. पर्यटनाला गेलेले व शेतीची आवड असणारे स्वत: मातीत हात घालून सर्जनशीलतेचा आनंद मिळवतात.

आपल्या परिसरातल्या लोकांच्या कलेला, कारागिरीला मोठी बाजारपेठ मिळवून देण्याचे काम तावरे यांनी केले आहे. शिवाय पर्यटकांनाही वेगवेगळया ऋतूत त्या त्या वेळची फळे, निसर्गाचे चमत्कार अनुभवायला मिळतात. पेरणीच्या काळात गेले तर पेरणीचा अनुभव घेता येतो, काढणीच्या वेळी गेले तर काढणी पाहता येते, उन्हाळयात आंबे, सप्टेंबरमध्ये आवळे, उसाच्या काळात गुऱ्हाळ, काकवी या गोष्टींचा आस्वाद घेता येतो.

तावरे यांचे हे यश आपल्याच शेतीपुरते मर्यादित नाही तर ते महाराष्ट्रभरातल्या शेतकऱ्यांना कृषी पर्यटनासंदर्भात प्रशिक्षण देण्याचे कामही करत आहेत. आतापर्यंत त्यांनी या दृष्टीने शंभरहून अधिक गावांमधल्या निवडक शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले आहे. जुन्नर, राजगुरुनगर, संगमनेर, सोलापूर, आकोला, वाशीम, नागपूर, कोल्हापूर, वर्धा, ठाणे आणि साताऱ्यातल्या काही गावांचा त्यामध्ये समावेश आहे. ज्या शेतकऱ्यांना प्रशिक्षण घ्यायचे असते त्यांची आधी माहिती मागवली जाते. त्यांच्या शेतावर भेट दिली जाते. ते शेत या व्यवसायासाठी उपयुक्त आहे का? ते शहरापासून किती दूर



पळशी येथील केंद्रात पर्यटनाबरोबरच विविध सांस्कृतिक कार्यक्रमही घेण्यात येतात. शहरातील आणि विदेशातील अनेक पर्यटक आठवड्याची सुट्टी मजेत घालवण्यास येथे आवर्जून येतात. घरापासून दूर घराचा अनुभव घेण्याबरोबरच येथील भाषा, संस्कृती, रीतीरिवाज इत्यादींचा त्यांना आस्वाद घेता येतो.

आहे ? परिसर कसा आहे? गावाची परिस्थिती कशी आहे ? गावाला इतिहास आहे का? गावात तळी-धरणं आहेत का ? अशा गोष्टींची चाचपणी केली जाते. त्याला अनुकूल परिस्थिती असेल तरच संबंधित शेतकऱ्याला प्रशिक्षण दिले जाते.

शेतकऱ्यांना ते सांगतात- केवळ फळत्याफुलत्या शेतजमिनीवरच हा व्यवसाय करता येतो असे नसून, पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या छोट्याशा जमिनीच्या तुकड्यावरही हा व्यवसाय करता येतो, हे तावरे यांनी सिद्ध करून दाखवले आहे. हा व्यवसाय करू इच्छिणाऱ्यांनी काही बाबतीत विशेष काळजी घेतली पाहिजे स्वच्छता, वेळच्या वेळी जेवणाची सुविधा दिली पाहिजे. याबरोबरच मद्य पिऊन येणाऱ्या, व्यसनाधीन माणसांना तसे न करण्यास बजावले पाहिजे. मांसाहार कटाक्षाने टाळला पाहिजे. प्लॅस्टिकचा वापर किंवा पर्यावरणाला हानी पोहोचवणाऱ्या गोष्टी विशेषत: टाळल्या पाहिजेत. शेतकऱ्याने सोमवार ते शुक्रवार शेतीच केली पाहिजे, त्यामध्ये आवश्यक तेवढे लक्ष घातले पाहिजे आणि मगच कृषी पर्यटनासारख्या गोष्टींना उत्तेजन दिलं पाहिजे. कृषी पर्यटनाचा शेती हा गाभा आहे, त्यामुळे तिच्याकडे दुर्लक्ष झाले तर तिच्यावर आधारलेला पूरक उद्योगही गडगडणारच.

कृषी पर्यटन हे अनेक शेतकरी एकत्र येऊन ठरवूनही करू शकतील. प्रत्येक पर्यटकामागे शेतकऱ्याला ४०० ते ५०० रुपये मिळतात. पळशी ता.बारामती येथे आलेल्या पर्यटकांचे काही चांगले अनुभव ते सांगत असतात. मुंबईमधल्या सिटी बँकेत नोकरी करणारे विलास भागवत आले. त्यांनी स्वत:शेतात उतरून उसाची लागवड केली. गरवारे कॉलेजचे विद्यार्थी इथे नेहमी सहली आयोजित करतात.

काही कटू अनुभवही तावरे यांनी सांगितले, पर्यटक बरेचदा एक विशिष्ट दृष्टिकोन ठेवून इथे येतात, म्हणतात- बघायला काही आहे का ? पर्यटन हे केवळ काही बघण्यासाठी असते, अनुभवण्यासाठी असते, हा आपल्या इथला मोठा गैरसमज आहे. उदा., फळांच्या १९० जाती भारतात पिकतात, मसाल्याच्या भारतीय १२०० जाती आहेत, २६ प्रकारच्या गायींच्या जाती आहत, ८ प्रकारच्या म्हशी आहेत, २० प्रकारच्या शेळया, १८ प्रकारच्या कोंबडया आहेत, अशा गमतीशीर गोष्टी समजतात.



पांडुरंग तावरे यांना समाज बांधणी आणि सांस्कृतिक जतन वाईल्ड एशिया २०१२ चा उत्तरदायी पर्यटन पुरस्कार आणि लंडन येथील जागतिक उत्तरदायी पर्यटन पुरस्कार २०११ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांना या क्षेत्राकडे वळण्यासाठी प्रवृत्त करण्याबरोबरच तावरे कृषि पर्यटनाची आवड असणाऱ्या महाराष्ट्रातील कृषि पर्यटन केंद्राची एक डिरेक्टरीही तयार करत आहेत. पर्यटक आणि शेतकऱ्यांमधला ही डिरेक्टरी हा एक दुवा असेल. महाराष्ट्रातील कृषि पर्यटनाची महत्त्वाची केंद्र आणि तिथले पत्ते, फोननंबर यांचा यामध्ये समावेश असणार आहेत

शेतकरी कुटुंबातून आलेले आणि उद्योजक झालेले पांडुरंग तावरे यांनी शहरातील लोकांना शेतीमध्ये विसावा मिळावा या संकल्पनेतून महाराष्ट्रामध्ये कृषी पर्यटनाची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर काही दिवसातच त्या संकल्पनेचे स्वरूप शहरी लोकांना शेतात आणण्यापर्यंत मर्यादित न राहता तिचे रूपांतर ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी उत्तरदायी आणि जबाबदार पर्यटन पर्यायामध्ये झाले. पळशी ता. बारामती जि. पुणे येथील बारामती कृषी व ग्रामीण पर्यटन प्रशिक्षण, संशोधन आणि विकास केंद्रामध्ये पर्यटनाच्या माध्यमातून शेतीपूरक व्यवसाय निर्मितीचे प्रशिक्षण वर्ग चालवण्यात येतात. शेतीला पर्यटनाची जोड दिल्यामुळे शेतीव्यवसायास पूरक असे अधिक उत्पन्न मिळाले आणि त्याचबरोबर शेतकऱ्यांना आपल्या संस्कृतीचेही जतन करता आले. देशातील निसर्गसौंदर्याला कुठेही तोड नाही. पर्यटनामध्ये या निसर्गसौंदर्याचे जतन करून त्यापासून शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न देण्याची क्षमता आहे. पर्यटनाची जोड दिल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात ४५% पर्यंत वाढ झाली आहे.

ग्रामीण भागांमध्ये शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसाय आणि उत्पन्न मिळावे या दृष्टीने आणि ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी ॲग्रो टूरिझम इंडिया कृषी पर्यटनाचा प्रसार करणे; शेतकऱ्यांना प्रशिक्षण देऊन कृषी पर्यटनाच्या माध्यमातून त्यांनी अधिक उत्पन्न मिळवावे याकरता त्याची क्षमता बांधणी करणे.

संपर्कासाठी पत्ता :(पांडुरंग तावरे,
pandurang@agritourism.in,
www.agritourism.in,
९८२२०९०००५)
**संपर्क :९८८११३३६९४**



फ्लेमिंगो

# आनंदसागर

**नाथसागर व त्याभोवतालच्या परिसरातील पक्षी नुसते बघणे अथवा त्यांचे विविध सुरेल आवाज ऐकणे म्हणजे जणू आपण एखाद्या वेगळ्या विश्वात जाऊन स्वर्गीय आनंद उपभोगण्यासारखे आहे. धरणाची गोलाकार भिंत, मध्यभागीचे धरण या प्रचंड जलाशयाला थोपवून धरताना बघितले म्हणजे आपल्याला समुद्राच्या काठावर उभे असल्याचा भास होतो. एका बाजूला प्रचंड जलाशय, दुसऱ्या बाजूला फळा-फुलांनी नटलेले ज्ञानेश्वर उद्यान, आजूबाजूला विविधवृक्षांनी हिरवागार झालेला परिसर व जलाशयाच्या सभोवतालचा मोकळा भाग यामध्ये विविधप्रकारच्या, विविधरंगाच्या व आकारांच्या पक्ष्यांच्या जीवनाची ओळख आपल्याला होते.**

डॉ. दिलीप यार्दी

**ना** नाथसागर जायकवाडीच्या प्रचंड जलाशयाचे यथार्थ नाव पैठणपासून ८ कि. मी. अंतरावर असलेला हा जलाशय समुद्राची आठवण करून देत आहे. दक्षिण गंगेवर हे धरण बांधून संतांची भूमी सुजलाम् सुफलाम् करण्याचे स्वप्न जायकवाडी धरणाच्या रूपाने साकार होत असतानाच, नकळतपणे दुसरेही पक्षी अभयारण्याचे स्वप्न आकार येत असेल व प्रत्यक्षात उतरेल याची जाणीवही कदाचित त्यावेळी धरणाच्या योजनाकारांना नसेल.

ऑक्टोबर १९७४ सालामधील तो गुरुवार अजूनही आठवतोय, जायकवाडी धरणाच्या बांधकामाचा शेवटचा टप्पा सुरू होता. धरणाच्या परिसरातील बांधकामाचे फोटो काढण्याचे काम माझ्यावर सोपविण्यात आले होते. नदीच्या पात्रात उतरून कांही फोटो काढणे आवश्यक होते. कारण बांधकामाची स्थिती दर्शविणारे छायाचित्र तेथूनच अतिशय सुरेख येत होते. छायाचित्र काढले. परत येताना पात्रातील दगडांमुळे अडखळत अडखळत चालावे लागत होते. कसेतरी काठावर आलो. महत्त्वाचे काम मनासारखे झाल्यामुळे जरा बरे वाटत होते. परत नेण्यासाठी गाडी येण्यास बराच अवधी होता, म्हणून उगाच इकडे तिकडे भटकणे सुरू होते. अचानक कॉक कॉक असा आवाज असा आवाज ऐकू आला आणि दोन सोनेरी बदके डोक्यावरून उडत उडत नदीमधील पाणवनस्पती वाढलेल्या जागेत जाऊन बसली.

आपल्याकडील बदकांपेक्षा आकाराने थोडेसे मोठे आणि डोके व पंख नारिंगी रंगाचे, शेवटी शेपटीकडे हिरवी-काळी पिसे, असे हे अतिशय मोहक सोनेरी बदक. पुराणात ज्याचा ठिकठिकाणी उल्लेख आहे, तेच हे चक्रवाक पक्षी. जेव्हा बघितले तेव्हा त्यादिवशी मिळालेला आनंद कांही वेगळे समाधान देऊन गेला व ते दृश्य चिरकाल स्मृतिपटलावर कोरले गेले, आणि मग जायकवाडी येथे येणारे विविध पक्षी बघण्याचे वेडच लागले.

याच परिसरात युरोप, सैबेरिया, लडाख, तिबेट व इतर उत्तरेकडील भागामधून असंख्य पक्षी ऑक्टोबरमध्ये, थंडीच्या काळात येतात व थंडी संपेपर्यंत येथे मुक्काम ठोकतात. या जगताची खरी गंमत अथवा आनंद लुटायचा

असेल तर आपल्याला माहीतगार माणसाची मदत घ्यावी लागते. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली जर त्या पक्षी जगतात सफर केली तर एकेका पक्ष्याचे बारकावे त्यांच्या विशिष्ट सवयी जवळून बघावयास मिळतात व खराखुरा आनंद लुटायला मिळतो.

नाथसागर व आजूबाजूच्या परिसरातील पक्षी सर्वसाधारणपणे तीन प्रकारामध्ये विभागता येतील. पहिला म्हणजे ज्ञानेश्वर उद्यान विश्रामगृह या आजूबाजूच्या झाडाझुडूपामधील पक्षी. दुसरा जलाशयावरील अगर पाणथळीवर आढळणारे पक्षी आणि तिसरा म्हणजे जलाशयाच्या आजूबाजूच्या मोकळ्या माळरानावर आढळणारे पक्षी.

विश्रामगृह कॉलनी, ज्ञानेश्वर उद्यान भागातील निम (कडूलिंब), शेवगा, आंबा, जांभूळ अशी झाडे तशीच छोटी झुडुपे यामध्ये पक्ष्यांची किलबिल कायम चाललेली असते. असा एकही क्षण जात नाही, ज्या क्षणी की, आपल्याला कुठल्याच पक्ष्याचा आवाज ऐकू येत नाही. भर उन्हाळ्यात कोकिळांचे ‘कुहु कुहू’ तर पावसाळ्यात रॉबिनचा ‘चटचट’ असा आवाज तर हिवाळ्यात आम्रपक्ष्यांचे गाणे अशी काही ना काहीतरी किलबिल चालू असतेच.

इतर पक्ष्यांच्या किलबिलाटामध्ये तपकिरी रंगाच्या पाठीचा १२फूट ते १५ फूट लांबीचा ‘भारद्वाज’ त्याच्या लालबुंद डोळ्यांमुळे, काळ्या अंगाभोवती तपकिरी रंगाचे सोवळे पांघरलेल्या ऋषीसारखा हा पक्षी ओळखण्यात चूक होत नाही. त्याच्या गंभीर आवाजाने प्रात: समयीचा काळ प्रसन्न होतो व म्हणूनच याचे दर्शन शुभ समजले जाते. साधारणपणे चिमणी एवढा ‘रॉबिन’ हा तर अत्यंत धीट पक्षी, नर रॉबिन काळा तर मादी फिकट रंगाची असते हा पक्षी आपली शेपटी हळुवार खालीवर खालीवर करीत असतो. याचे घरटे जमिनीपासून थोडयाच अंतरावर एखाद्या दगडाच्या कपारीत छोट्याश्या भगदाडामध्ये असते. जायकवाडी धरण्याच्या भिंतीवरील उतरणीला हे हमखास आढळतात . आपल्या मंजूळ शिळेने आपल्याला बोलवत असतात .

रॉबीनपेक्षा लहान आकारच्या अतिशय सुरेख अशा शिंपी पक्षाची वटवट आपल्याला बेचैन करते, कारण हा पक्षी आपल्याला चटकन दिसत नाही पण आवाज मात्र अगदी जवळून येत असतो. त्यांच्या पंखाचा रंग हिरवट पिवळसर, तर खालचा भाग पांढरा डोक्याकडे फिक्कट तांबूस. असा लोभस छोटासा पक्षी आपले घरटे फारच कलात्मकरित्या बांधतो . दोन-तीन पाने एकत्र


वेडाराघू

भारद्वाज




शिंपी (टेलर बर्ड)


फुलटोच्या (सनबर्ड)

करून ती शिवून पिशवी तयार करतो व त्यामध्ये पिलांसाठी मऊ गवत , शेवरीचा कापूस अंथरूत आपले बिऱ्हाड थाटतो.

त्याच्या या शिवणकलेतील नैपुण्यामुळेच त्याला ‘टेलरबर्ड’ अथवा शिंपी म्हणतात. शिंपीएवढा गडद जांभळा बारीक बाकदार चोचीचा पक्षी एका फुलावरून दुसऱ्या फुलावर त्यातील मध खाताना विश्रामगृहाच्या व त्यासमोरील बागेमध्ये नेहमी दिसतो . हा ‘फुलटोच्या’ किंवा ‘सनबर्ड’ जेव्हा जवळच्या तारेवर बसुन तीक्ष्ण स्वरात जेव्हा हा ओरडतो तेव्हा क्षणभर असे वाटते की त्याच्या शरीराच्या आकारापेक्षा किती तरी मोठया आवाजात ओरडतांना याला त्रास तर होत नाही ना?

विश्रामगृहातील बाहेरील तारांवर दिसतो छोटासा ‘वेडाराघू’, याचा रंग पोपटासारखा हिरवा, पाठीवरील पिसे किंचित विटकरी रंगाची असतात. याच्या शेपटीमधून दोन लांब एरीअलसारखा वायर निघते, ।। ट्रीर ।। ट्रीर। असा आवाज करीत हा उडणाऱ्या किडयांची शिकार करतांना आपल्याला आढळतो. लांब धारदार टोकाला किंचित बाकदार अशा आपल्या चोचीने हा आपल्या आवडत्या मधमाशांची शिकार करत असतो व म्हणूनच त्याला इंग्रजीत ‘ग्रीन-बी-इटर’ असे म्हणतात. ग्रीन बी इटर सारखीच किडयांची शिकार करणारा काळा कुळकुळीत कोतवाल आपल्याला दिसतो तो चरणाऱ्या जनावरांच्या पाठीवर अगर विजेच्या तारावर विहार करताना दिसतो. याची शेपटी दुभंगलेली असते. याची शिकार करण्याची पध्दत फारच सुरेख असते ज्या किडयाची शिकार करावयाची तो किडा जसा खालीवर उडेल अगदी तसाच त्याच्याच मागे त्याप्रमाणे उडून त्याला पकडतो. त्यामुळे शिकार करताना त्याच्या हालचाली फारच



मजेशीर दिसतात. नावाप्रमाणे हा पक्षी आक्रमक आहे. त्याच्या हद्दीत येणाऱ्या मोठ-मोठया पक्ष्यांचा पाठलाग करून अक्षरश: त्यांना हाकलून लावतो. मी जायकवाडीला कित्येक वेळा घारींना हाकलून लावतांना याला बघितले आहे.

ज्ञानेश्वर उद्यान व डावा कालवा यांच्यामधील मोकळया जागेत वृक्षारोपण केल्यामुळे आता बऱ्यापैकी झाडी दिसू लागली आहे या झाडीमध्ये बाभळीची काटेरी झाडेदेखील बरीच आहेत या काटेरी झाडावर अथवा त्या झाडाच्या आजूबाजूला 'खाटीक' बसलेला आढळेल. १७-२० सेंमी. आकाराचा काळापांढरा गुलाबी रंगाचा पंखाच्या कडेला कांळे फराटे असलेल्या या पक्ष्याच्या डोळ्यापासून डोक्यापर्यंत काळा पट्टा असतो. त्यामुळेच याची ओळख चटकन होते. नावाप्रमाणेच वर्तणूक असणारा हा पक्षी टोळ, बेडूक, सरडा यांची शिकार केल्यावर खाटकाप्रमाणे काटेरी झाडावर आपली शिकार उलटी टांगून ठेवतो व सवडीने चवीने खातो.

'निळकंठ' अथवा चाष हा पक्षी थंडी पडण्यापूर्वी सप्टेंबरमध्ये आपल्याकडे येतो. हा पक्षी सर्वसाधारण कबुतरापेक्षा किंचित मोठा चोच काळपट, पोट आणि डोके पिवळसर तर गळयाचा रंग तपकिरी, पंखाचा रंग निळा, टोकाला काळे पट्टे अशा अनोख्या रंगांनी नटलेला असा हा पक्षी जेव्हा उडतो तेव्हा त्याचा अतिशय मोहक असा निळा रंग अधिकच खुलून दिसतो. यालासुध्दा शुभलक्षणी पक्षी म्हणून ओळखतात. हा शेतकऱ्यांचा मित्र म्हणावा लागेल. कारण पिकांवरील किडे हे याचे आवडते खाद्य. जायकवाडी परिसरातील शेतांमध्ये अथवा रस्त्यांच्या कडेला असलेल्या खांबावर हा हमखास दिसतो. आजूबाजूच्या झाडाझुडपामध्ये याच्याबरोबर आपल्याला नेहमीच बुलबुल, मैना व्होले, पोपट, हूप्पी, स्पॉटेड डोव्ह इतर अनेक पक्षी मनसोक्त विहार करतांना आढळतात.


नदी सुरय

धरणाच्या भिंतीवरून पलीकडील जलाशयावर नजर टाकली म्हणजे असंख्य बारीक बारीक ठिपके पाण्यावर तरंगतांना दिसतात तर पाण्याच्या काठाकाठाने वेगवेगळया प्रकारचे छोटे मोठे पक्षी आपल्या


निळकंठ

नजरेत चटकन भरतात. हे सर्व पाणपक्षी अथवा पाण्याच्या आसपास दिसणाऱ्या पक्षांच्या विभागात येणारे पाणपक्षी प्रामुख्याने निरनिराळया बदकांच्या जातीचे आहेत. टफ्टेड-पोचार्ड, पिनटेल, विजन, कुट, चक्रवाक इत्यादी अनेक पक्षी युरोप, सैबेरिया, लडाख, तिबेट, इतक्या लांबून येतात. तर पाण्याच्या काठाकाठाने पांढऱ्या मानेचा करकोचा, ओपनबील स्टॉर्क, व्हाईट आयबीज, ब्लॅक आयबीज, विविध प्रकारचे वेडर्स, ज्यामध्ये शॅन्क, प्लवर, स्नाईप, गॉडविट इ. अशा अनेक पाणपक्ष्यांनी सर्व परिसर जणू फूलून जातो.

जायकवाडीच्या धरणाच्या भिंतीवरून चालत चालत साधारणपणे एक अर्धा किलोमीटर गेल्यावर ज्या ठिकाणी बऱ्यापैकी दलदल आहे त्या भागात आपली दुर्बीण लावून बघितले म्हणजे अनेक राखाडी रंगाचे, चॉकलेटी रंगाच्या डोक्याचे, मानेपर्यंत पांढरे पट्टे असलेले बदक जेव्हा खाली डोके वर पाय करून पाण्याखालील पाणवनस्पती खातात तेव्हा त्यांची लांब टोकदार शेपटी पिनेसारखी चटकन उठून दिसते आणि हीच 'पिनटेल बदक' ओळखण्याची खूण, उत्तर युरोपमध्ये आशिया भागातून हा पक्षी आपल्याकडे दर हिवाळयात येतो आणि थव्याथव्याने हे पक्षी नाथसागरावर वास्तव्य करतात.

काळ्या रंगाचे डोक्यावर शेंडी असलेले पांढऱ्या पोटाचे 'टफ्टेड पोचार्ड' सर्व विविध जातीच्या बदकांमध्ये चटकन उठून दिसते. पाण्यावरील लाटांबरोबर हेलकावे येतांना मध्येच याचे पोट चमकते. याच बदकाबरोबर आपल्या तांबूस डोक्यावरील पांढरा पट्टा गंध लावल्याप्रमाणे मिरवत, सारखे इकडेतिकडे


शॉवेलर

चपळाइने हालचाल करताना हमखास 'वीजन' पक्षी दिसतात. ह्या सर्वांचा थवा नाथसागरावर जेव्हा हिडताना आपण बघतो तेव्हा विविध रंगाच्या फुलांचा ताटवाच जणू पाण्यावर हेलखावे खात आहे असे वाटते.

'शॉवेलर' अतिशय देखणे बदक उत्तर युरोपमधून दर हिवाळयात न चुकता जायकवाडीच्या नाथसागरावर येते. मान, डोके गडद हिरव्या रंगाचे, छाती पांढरी तर इतर सर्व भाग गडद, चॉकलेटी शेपटी, कडेला पंखाचा रंग राखाडी निळा तर या सर्वांवर उठून दिसणारी चपटी चोच अशा विविध रंगाची वेधक सरमिसळ झालेल्या ह्या पक्षांचा थवा ठिकठिकाणी आढळतो. त्या थव्याकडे कितीही वेळ बघत बसले तरी मनाचे समाधान काही होत नाही.

काळ्या पंखांचा लांब गुलाबी पायांचा, टिटवीच्या आकाराचा 'ब्लॅक विंग स्टिल्ट' किंवा 'शेकटा' पक्षी काठाकाठाने खूप मोठ्या संख्येने किडे खातांना दिसतो. त्याला ओळखण्याची चूक होणे शक्य नाही. एकदा याला कुणी बघितले तर विसरणे अशक्य इतका नाजूक देखणा पक्षी आहे. किनाऱ्यावर उगवणाऱ्या गवतामध्ये 'वॅगटेल' (धोबी) यांच्या चारही जाती आढळतात. ग्रे, येलो, व्हाईट, ब्लॅक हेडेड ह्या चार जाती. चिमणीपेक्षा मोठा असा हा पक्षी आपली शेपटी सतत खालीवर करत असतो. धोबी ज्या प्रमाणे कपडे धुतांना जशी खालीवर हालचाल करतो त्याप्रमाणे यांच्या शेपटीची हालचाल होत असते. म्हणून याला 'धोबी' असे संबोधतात.

याच पक्षाबरोबर 'लिटील रिंग प्लवर' गळयाभोवतीची काळी रेघ मिरवत तुरूतुरू पळत असतात. तर दोन्ही प्रकारचे बगळे पटापट किडे खातांना आढळतात त्यांच्याबरोबर 'सॅन्ड पायपर'देखील प्रचंड थव्यांनी पाण्याच्या पृष्ठभागावरून उडतांना क्षणात दृष्टिआड होत असतात. या सर्वांच्या धावपळीच्या पार्श्वभूमीवर संथ पावले टाकीत डोके संपूर्ण काळे तर इतर अंग पांढरे स्वच्छ

असलेला 'व्हाईट आयबीस' आपल्या लांब बाकदार चोचीने किडे खातांना अतिशय मनोहर दिसतो. तीन फूट उंचीचा रंगाने काळा परंतु 'पांढऱ्या मानेच्या करकोच्याची ऐट तर आपल्या डोळ्यांचे पारणे फेडते. 'ओपन बील स्टॉर्क' जेव्हा याच्याचबरोबर मासेमारी करतो तेव्हा तर खूपच विलोभनीय दृश्य दिसते. असेच एकदा जेव्हा आम्ही पक्षी निरीक्षणाला गेलो होतो तेव्हा अचानक जणू विविध रंगांनी रंगवलेला 'पेटेंड स्टॉर्क' दिसला. आपल्या पिवळ्या चोचीने अतिशय शांतपणे याची चाललेली मासेमारी बघायला कुणाला आवडणार नाही?

नाथसागराच्या पाण्यावर आपल्या दमदार पंखाच्या बळावर पांढरे स्वच्छ असे मोठे पक्षी आपल्याला एका मागुन एक उडतांना हमखास दिसतात. मध्ये पाण्यावर उतरून पोहतात तेव्हा सुरेख चमकणारे हे आहेत सीगल. तसा हा पक्षी समुद्रकिनारा सोडून कुठे जात नाही. पण जायकवाडीचा हा जलाशय समुद्राची आठवण देणारा आहे ना.


पिवळ्या चोचीचा, लाल पायाचा, मध्यम आकाराचा 'नदी सुरय' (रिव्हर टर्न) सीगल्स च्या साथीने उडतांना मध्येच क्षणात पाण्यावर सूर मारून माश्याला चोचीत पकडून उडताना दिसतोच. जसाजसा मार्च महिना जवळ येत जातो तसतसे असंख्य 'स्वॅलोड' तारांवर दाटीवाटीने बसलेले दिसतात. हा काळा निळा छोटासा पक्षी पाण्यावरचे किडे अतिशय सफाईदारपणे पकडतो. यांच्यामध्ये उडतांना स्वॅलाजपेक्षा फिकट रंगाचा 'मार्टीन' चटकन उठून दिसतो. याचे मातीचे गोळे चिकटवून तयार केलेले घरटे पंप हाऊस मधील खिडकी खाली आहे असे सांगितले तर कोणी विश्वास ठेवणार नाही.

'नाथसागराचे भूषण' असलेला कांहीसा राजहंसा सारखा दिसणारा चार ते साडेचार फूट उंचीचा इंग्रजी एस आकाराची लांब मान असलेला, पांढरा शुभ्र पक्षी म्हणजेच 'फ्लेमींगो' याच्या पंखाची गुलाबी पिसे त्यांच्या पांढऱ्या रंगावर खुलून दिसतात.


स्कायलार्क

पाण्यावरून उड्डाण करतांना हे बराच वेळ पाण्यावर धावतात, नंतर हवेत झेपावतात.

नाथसागराच्या दोन्ही किनाऱ्याच्या बाजूला खूपच मोकळी जमीन दिसते. या माळरानावर थोडीफार झुडूपे उगवलेली आहेत. मधून थोडीफार काटेरी झाडे आढळतील. माळरान म्हटले की, डोळ्यांसमोर भकास वातावरण उभे राहते. परंतु आपल्या कानात मात्र माळरानावरील पक्ष्यांचे सुरेल स्वर नक्कीच ऐकू येतील. हे पक्षी जमिनीवरील वाळलेल्या गवतात अगर दगडांमध्ये वावरतात. मातकट रंगाशी इतके सरमिसळ (एकरूप) होतात की अगदी आपल्या जवळून उडाल्यावरसुध्दा त्यांचे दर्शन होत नाही. माळरानावरचे पक्षी आकाराने चिमणीएवढे असतात. यामध्ये


पेटेंड स्टॉर्क


संत ज्ञानेश्वर उद्यान, पैठण

प्रामुख्याने 'लार्क' आढळतात. 'क्रेस्टेड लार्क' अथवा तुरेबाज चंडोल मातकट रंगाचा अंगावर रेषा असलेला, जेव्हा आपल्याच नादात हवेमध्ये गोलाकार उडतो, तेव्हा त्याची गंमत बघण्यासारखी असते. 'इंडियन स्कायलार्क'हाही चिमणीएवढा भूरकट, मातकट रंगाचा असतो. याचे वैशिष्ट्य असे की, हा आकाशात उंच उडत जातो व तेथेच शीळ वाजवत स्तब्ध होतो, तर क्षणात जमिनीवर कुठे बसतो ते लक्षातच येत नाही. 'काळ्या पोटाचा फिंच लार्क' नर बघितला म्हणजे कोणीतरी कोट घालून रुबाबात बसल्यासारखे वाटते.

'ट्री पिपेट' आपल्या छोट्याशा गुलाबी पायावर, तोंडात एखादा किडा पकडून आपल्यासमोर तुरुतुरु धावतो. आपल्याला वाटते की आपण याला सहज पकडू म्हणून आपण याच्यामागे लागतो, तर हा हळूच उडून दुसरीकडे बसतो. याच्याशी पाठशिवणीचा खेळ खेळण्याची मजा काही औरच आहे. असे कितीतरी पक्षी आपले मन रमवत असतात, निसर्गाची ही किमया बघून आपण दंग होतो.

नाथसागरावरील व त्याच्या आजूबाजूचे पक्षी बघून मन कसे तृप्त होते. शासनाने हा स्वर्गीय ठेवा जतन करण्यासाठी हा परिसर 'पक्षी-अभय प्रदेश' म्हणून घोषित केला आहे. त्यामुळे या पक्ष्यांचे संरक्षण तर होईलच, पण त्याचबरोबर त्यांना होणाऱ्या त्रासापासून देखील सुटका मिळेल, अशी आशा बाळगण्यास हरकत नाही.


रॉबिन

संपर्क : ९४२२७०४२५१

# सागरेश्वराचा सुगंध

**महाराष्ट्रात सध्या अस्तित्वात असलेल्या ४९ संरक्षित क्षेत्रांपैकी सागरेश्वर हे प्रथम मानवनिर्मित वन्यजीव अभयारण्य आहे.**

सागरेश्वर वन्यजीव अभयारण्य क्षेत्रास लागून असलेल्या एका खेडयात यशवंतराव चव्हाण यांचा जन्म झाला होता. या थोर पुढा-याचा देश व राज्याच्या सर्वांगिण प्रगतीकरिता सतत प्रयत्नशील राहण्याच्या प्रेरणेने तसेच स्थानिक पुढारी श्री मोहिते यांच्या सतत प्रयत्नामुळे



प्रभावित होऊन स्थानिक लोकांनी वनरहित झालेले क्षेत्र वनाच्छादित करण्यास वनविभागास सहकार्य दिले. त्यामुळे हे क्षेत्र पुन्हा हिरवेगार होऊन वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित झाले. या अभयारण्याचे नामांतर स्व. यशवंतराव चव्हाण सागरेश्वर वन्यजीव अभयारण्य करण्याचा शासनाचा मानस आहे.

कृत्रिमरीत्या निर्मित वनाचा समावेश करून सागरेश्वर वन्यजीव अभयारण्य वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ मधील तरतुदी नुसार वर्ष १९८५ मध्ये अधिसूचित करण्यात आले. सागरेश्वर वन्यजीव अभयारण्याचा व्याप सांगली जिल्ह्यातील कडेगांव, बलना व पलूस तालुक्यात असून भौगोलिक विस्तार अक्षांस १७.१११ ते १७.१६२ उत्तर व रेखांस ७४.४०८ ते ७४.३३५ पूर्व आहेत. सागरेश्वर वन्यजीव अभयारण्याचे क्षेत्र १०.८७ वर्ग किमी. असून त्यात मोहिते वडेगांव, आसाड, कुंभारगांव, देवराष्ट्रे, दुधारी, टाकरी, दयारी, तुपारी, घोगांव व कुंडल या प्रत्येक गावातील जमिनीचा समावेश आहे. अभयारण्याचा परीघ ३८.९९५ कि.मी आहे. सागरेश्वर वन्यजीव अभयारण्याचा भूभाग डोंगराळ असून डोंगराचा परिसर पूर्व- पश्चिम भागात आहे.



अभयारण्याचे अन्य संरक्षित क्षेत्रापेक्षा असाधारण महत्त्व आहे. ८० च्या दशकात सुरुवातीला ते वनक्षेत्र उद्यान म्हणून विकसित करण्यात आले, त्यावेळी बोरिवली, भीमाशंकर येथून चितळ, सांबर, काळवीट, इत्यादी वन्यप्राणी सोडण्यात आले. कालांतराने या वनप्रण्यांना ९० च्या दशकात खुल्या वनात सोडण्यात आले. दरम्यान, हे क्षेत्र सागरेश्वर वन्यजीव अभयारण्य म्हणून १९८५ मध्ये घोषित झाले. धार्मिक, सांस्कृतिक व पुरातत्त्वीय दृष्टिकोनातूनसुद्धा अभयारण्याचे असाधारण महत्त्व आहे. हजारो भक्त पूजेकरिता दरवर्षी भ्रमण करतात. सोबत वन्यजीव. त्यांचा अधिवासाचा आनंद घेतात. याच भूभागातून प्रांतिक सरकारची चळवचळ स्वातंत्र्यपूर्व काळात सुरू झाली होती.



**टी. यू. शेवते**



या क्षेत्रात प्रसिध्द शिवमंदिर व जवळपास ५१ इतर मंदिरांची वसाहत सातवाहन काळापासून अस्तित्वात आहे. त्याचप्रमाणे या क्षेत्रात लिंगेश्वर शिवमंदिर तसेच पुरातन कमलभैरी मंदिर अस्तित्वात आहे. याच पुरातत्त्वीय महत्त्वामुळे सागरेश्वर नावाची उत्पत्ती झाली.

महाराष्ट्रात प्रामुख्याने विदर्भात वनक्षेत्र जास्त असून विविध प्रजातीच्या वन्यप्राण्यांचा अधिवास आहे. त्या तुलनेत महाराष्ट्रातील इतर भागात वनांचे प्रमाण कमी आहे. त्यातही सांगली जिल्ह्यात अत्यल्प आहे. त्यामुळे राज्य व देशापुढे मानवनिर्मित वन्यजीव अभयारण्याचे उदाहरण हे या परिसरातील लोकांची वन्यजीवांबद्दल जिव्हाळा व्यक्त करणारी बाब ठरते. सांगली रहिवासी पर्यायाने महाराष्ट्रातील जनतेकरिता ही गौरवशाली बाब आहे .

अभयारण्य क्षेत्रात मुख्यत: चितळ, सांबर या तृणभक्षी वन्यप्राण्यांचा अधिवास असून इतर वन्यप्राणी उदा. मोर, रानडुक्कर,कोल्हा, लांडगा, ससा तसेच प्रवासी पक्ष्यांचासुद्धा अधिवास आहे. येथील जैवविविधता समृध्द आहे.


या क्षेत्रात रानमूग व रानउडद विपुल प्रमाणात आढळतात. त्यामुळे जनुकीय साठा सुरक्षित ठेवण्यास मदत मिळते. (मानिटर लिझार्ड) या धोकादायक स्थितीत असलेल्या सरपटणाऱ्या प्रजातीचा आढळ अभयारण्य क्षेत्रात असणे ही वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे. सांगली जिल्हयात वनक्षेत्राचे प्रमाण फार कमी आहे. त्यामुळे या अभयारण्यास स्थानिक तसेच बाहेरील पर्यटकांना भेट देण्याकरिता आकर्षण निर्माण करण्यास यशस्वी झाले आहे.

सरासरी १५ ते २० हजार पर्यटक अभयारण्यास भेट देतात. अभयारण्याचे लहान क्षेत्र विचारात घेता भेट देणा-या पर्यटकांची संख्या लक्षणीय आहे.

बाहय कारणामुळे राज्यातील वेगवेगळया भागांत मानव आणि वन्यजीव संघर्षाच्या घटना उघडकीस आल्या आहेत. त्या तुलनेत सागरेश्वर वन्यजीव अभयारण्याची निर्मिती हे मानव आणि वन्यजीव सहअस्तित्वाचे श्रेष्ठ उदाहरण होय.

राज्यातील वन्यजीवांचे संरक्षण, संवर्धन व विकास कामाकरिता राज्याचे मुख्यमंत्री यांचा शास्त्रीय दृष्टिकोण व ते साध्य करण्याकरिता त्यांचे मार्गदर्शन तसेच वनमंत्री यांच्या मागदर्शनामुळे संरक्षित क्षेत्रात संरक्षण, संवर्धन व विकास कामांना गती मिळाली आहे याचा फायदा सागरेश्वर वन्यजीव अभयारण्याला मिळाल्याने या अभयारण्याचे व्यवस्थापन दर्जेदार झाले आहे.

❐❐





# ‘कले’ची सुटका

**वाढत्या औद्योगिक, नागरी विकासासोबत वनक्षेत्र संकुचित होत आहे. मानवी वावर असलेल्या क्षेत्रात सहवास्तव्य करणे वन्यप्राण्यांना भाग पडत आहे. विहिरी, कालवे या मानवनिर्मित व असुरक्षित धोक्यांचा वन्यप्राण्यांना सामना करावा लागतो. अशा विहिरीस, नहरास सुरक्षा कठडा नसल्याने सावजाचा पाठलाग करणाऱ्या वाघाच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. अलिकडील काळात विहिरीत वा नहरात पडलेल्या वाघिणींना वन विभागाने अतिशय काळजीपूर्वक व शास्त्रोक्त पद्धतीने बाहेर काढले. आवश्यक औषधोपचारानंतर त्यांना मूळ अधिवासात सुरक्षितपणे मुक्त करण्यात आले. या यशस्वी बचावाच्या दोन घटनांचा तपशील चित्तथरारक असा आहे.**

आर. व्ही. गोळे

**स्थळ: भिवापूर**

नागपूर पासून सुमारे ८० कि.मी. अंतरावर भिवापूर वनपरिक्षेत्रात वनखंड ४६८ मधून गोसीखुर्द धरणाचा कालवा गेला आहे. डोंगरावरून वाहून येणारे पावसाचे पाणी कालव्याखालून निघून जाण्यासाठी ड्रेनेज कलव्हर्ट बांधलेला आहे. डोंगराच्या बाजूने पाणी गोळा करणारे विहिरीसारखे मोठे टाके (चेंबर) असून १-२ मिटर व्यासाच्या दोन मोठया पाईपद्वारे नहराखालून पायथ्याच्या बाजूस पाणी काढण्यात येते. या २५ फूट खोल २५ ते ३० फूट व्यासाच्या खड्ड्यात एक वाघ पडला अशी माहिती १२ ऑक्टोबर २०११ रोजी क्षेत्र सहायक भिवापूर यांना प्राप्त झाली. त्यांनी सकाळी ८.३० वाजताचे सुमारास भिवापूरचे वनपरिक्षेत्राधिकारी श्री. लोंढे यांना भ्रमणध्वनीद्वारे माहिती कळविली. नागपूरचे सहायक वनसंरक्षक (रोहयो) त्यांनी श्री. चव्हाण व नागपूरचे श्री. रास्ते सहायक वनसंरक्षक, शिकार प्रतिबंधक घटक यांना भ्रमणध्वनीने ही माहिती दिली. दोन्ही सहायक वनसंरक्षक यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. त्याची सविस्तर माहिती सहायक वनसंरक्षक (वन्यजीव), श्री. किशोर मिश्रीकोटकर, नागपूर व पशुवैद्यकीय अधिकारी नागपूर, डॉ. गौतम भोजने यांना दिली.

त्यांना वाघाच्या बचावासाठी आवश्यक पिंजरा, बेशुद्धीकरणासाठी लागणारी बंदूक व गुंगीचे औषध इत्यादी साहित्य घेऊन पशुवैद्यकांसह घटनास्थळावर येण्यास कळविण्यात आले. दुपारी १२.३० पर्यंत आवश्यक सामुग्री व कर्मचाऱ्यांसह मिनिट्रकने पिंजरा घेऊन पथक ८० कि.मी. अंतरावरील तास येथील घटनास्थळी दुपारी ३.०० वाजता पोहोचले. या पथकाने घटनास्थळाची पाहणी केली. विहीरवजा चेंबरमधून पाणी वाहून नेणारे पाईप दुसऱ्या बाजूने पाणी, माती व रेती गाळाने बंद झाले होते. वाघ चेंबर मधून पाईपमध्ये जाऊन लपत होता. त्यामुळे वाघास ट्रँक्युलाइज करणे कठीण होत होते. पाइपचे चेंबरमधील तोंड बंद करण्यासाठी स्थानिकरीत्या स्टिल कॉट्स, बांबू गोळा करण्यात आले. वाघ शिरलेल्या पाईपच्या बंद तोंडास जेसीबीच्या साहाय्याने थोडे मोकळे करून पाणी जाण्यास वाट करून दिली. त्या बाजूने वाघ निघून जाऊ नये म्हणून ते तोंड स्टील जाळीने बंद केले. वाघ विहिरीत येताच दोन्ही पाईपची तोंडे बंद करण्यास जाळीचे लोखंडी पलंग दोराने पाईपच्या तोंडाजवळ लटकवून ठेवण्यात आले. यानंतर चेंबरमधील साचलेले पाणी मजुरांच्या साहाय्याने पोहऱ्याने व नंतर डिझेल इंजिनद्वारे बाहेर काढण्यात आले. वाघ असलेल्या पाइपचे बाहेरील टोकाजवळ सुतळी बॉम्ब, लड असे सौम्य फटाके फोडून वाघास चेंबरमध्ये आणण्याचे प्रयत्न सुरू केले. सायंकाळी ५.०० वाजता वाघ चेंबरमध्ये आला. बघ्यांची गर्दी व गोंगाटामुळे वाघाने बावरून जाऊन चेंबरमधील दुसऱ्या पाईपमध्ये प्रवेश केला.





वाघास बंदिस्त करण्याची संधी हुकली. बघ्यांची गर्दी व कमी झालेला सूर्यप्रकाश यामुळे बचाव मोहीम स्थगित करण्यात आली. दुसऱ्या दिवशी बचावकार्यासाठी नियोजन करून पोलीस मदत घेण्यासाठी कामाची आखणी करण्यात आली.

१३ ऑक्टोबर २०११ ला सकाळी ५.०० वाजल्यापासून मोहीम सुरू करण्यात आली. ज्या दुसऱ्या पाईपमध्ये वाघ गेला होता त्या पाइपच्या बाहेरचे तोंड टिकास फावड्याच्या मदतीने किंचित उघडण्यात आले. वाघ पाइपच्या दुसऱ्या बाजूस असल्याची खात्री करून घेतल्यानंतर फटाके फोडून त्यास चेंबरमध्ये आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु वाघ चेंबरमध्ये येईना. मग एक जिवंत बकरी दोऱ्याच्या साहाय्याने चेंबरमध्ये सोडण्यात आली परंतु त्यासही वाघ दाद देईना. नंतर पाइपच्या बाहेरच्या बाजूस टायर जाळून धूर करण्यात आला. त्यामुळे दुपारी १२ च्या सुमारास वाघाने चेंबरमध्ये प्रवेश केला. लगेच लोखंडी पलंगाने दुसऱ्या पाइपच्या चेंबरमधील तोंड बंद करण्यात आले. जाळे टाकून वाघास जाळ्यात पकडून योग्य संधी साधून दुपारी १२.१५ वाजता सहायक वनसंरक्षक, श्री मिश्रीकोटकर, यांनी बंदुकीने वाघाला ट्रांक्युलाइज केले. वाघ बेशुध्द झाल्यावर त्याची पाहणी केली असता हा वाघ मादी असून तिचे वय अडीच ते तीन वर्ष असल्याचे उपस्थित तज्ज्ञांचे मत झाले.

जाळयासह वाघिणीस वर ओढून दुपारी १.१५ वाजता पिंजऱ्यात बंदिस्त करून ट्रकने नागपूर येथे रवाना केले. नागपूर येथे सायंकाळी ४.०० वाजताच्या सुमारास पशुवैद्यकांनी तपासणी केली. व औषधोपचार करून वाघिणीस शुद्धीवर आणले. तिच्या



कपाळावर किरकोळ जखम आढळली. तसेच तिला ज्वर असल्याचे लक्षात आल्याने तिच्या रक्त व मूत्राचे नमुने घेण्यात आले व तिच्यावर उपचार सुरू करण्यात आले.

वाघीण बरी झाल्यावर तिला बंदिस्त ठेवणे उचित नव्हते. म्हणून योग्य अधिवासाचा शोध सुरू झाला. अन्य क्षेत्रासोबतच ज्या क्षेत्रात बचाव केला त्याच अधिवासात वाघिणीस मुक्त करणे योग्य ठरेल का याबाबत अभ्यास करण्यास मुख्य वन्यजीव रक्षकांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना निर्देश दिले. यासाठी समिती स्थापन केली. या समितीला क्षेत्र पाहणी अभ्यास करून मूळ अधिवास क्षेत्रच मुक्त करण्यास योग्य ठरेल असे आढळून आल्यावर वाघिणीपासून सभोवतालच्या मानवी वस्त्यांना धोका होऊ नये म्हणून काय काय खबरदारी घेता येईल याचा विचार करण्यात आला.

वाघिणीस रेडिओ कॉलरींगचा पहिलाच प्रयोग यावेळी राज्यात करून तिच्या हालचालींचे संनियंत्रण व भ्रमणाचा अभ्यास करण्याचे ठरले. या कामी सेंटर फॉर वाइल्डलाइफ स्टडिज या संस्थेच्या श्रीमती विद्या अत्रेय यांनी रेडिओ कॉलर लावणे व प्रत्यक्ष संनियंत्रणाची मदत देऊ केली. २७ नोव्हेंबर, २०११ रोजी या वाघिणीस GPS-GSM रेडिओ कॉलर व मायक्रोचीप लाऊन तिच्या मूळ अधिवासात मुक्त करण्यात आले. त्यामुळे वाघिणीचा पुढील प्रवास रेडिओ कॉलरच्या जी.पी.एस. वाचनांवरून सॅटेलाइमार्फत सरळ संगणकावर मुख्य वन्यजीव रक्षकांना उपलब्ध होत होता. श्रीमती अत्रेय यांनी उपलब्ध करून दिलेली रेडिओ कॉलर २०१० मध्ये घेतली होती. कॉलरची बॅटरी लवकरच संपल्याने संगणकावर सघन संनियंत्रण फार काळ शक्य झाले नाही. तथापी सेंटर फॉर वाइल्ड लाइफ स्टडिजच्या विद्यार्थिनी श्रीमती आर. नव्या यांनी VHF बॅटरी जी नंतरही कार्यरत होती त्याचा वापर करून क्षेत्रीय पाठपुरावा संनियंत्रण केले आणि ही वाघीण निसर्गात यशस्वीपणे सामावून गेल्याची खात्री झाली. बंदिस्त केलेल्या वाघाचा मानवी संपर्क आल्यानंतर पुन्हा मुक्त करताना वाघ मानवावर हल्ले करेल अशी शंका असते. त्यामुळे मुक्त करताना त्यांच्या हालचालींची पूर्ण माहिती घेऊन पाळत ठेवणे आवश्यक असते.

मुक्त केलेल्या वाघिणीने मानवी वस्तीच्या जवळून, शेतीतून, नहरातून व रस्त्यावरूनही रात्री भ्रमण केल्याचे स्पष्ट झाले. वाघिणीच्या भ्रमण मार्गाचा मागोवा घेऊन तिने केलेली वन्यप्राणी सावजाची शिकार व मानवी वस्त्यांजवळ काही पाळीव प्राण्यांची केलेली शिकार अभ्यासण्यात आली. दिवसा वाघीण मनुष्य वस्तीस टाळते. तथापी कुत्रे, बकऱ्या आणि गुरे आदी सहज भक्षांमुळे रात्रीच्या वेळी मानवी वस्त्यांजवळ आकर्षित होत असल्याचे दिसून आले. निरीक्षण काळात वाघिणीच्या भ्रमणक्षेत्रात वाघिणीने मनुष्यहानी केली नाही. वाघिणीस मुक्त केल्यापासून केलेले संनियंत्रण व क्षेत्रीय तपासणीत २७ नोव्हेंबर २०११ पासून २३ मार्च २०१२पर्यंत वनक्षेत्रात २ बकऱ्या,१ माकड,१ गाय, २ रानडुकरे व एक ओळखता न आलेला (पूर्ण खाल्लेला) प्राणी तसेच तलावाच्या पाटाच्या क्षेत्रात १ रानडुक्कर व शेतीचे क्षेत्रात ३ रानडुकरे, १ बकरी व २ ओळखता न आलेले (पूर्ण खाल्लेले) प्राणी असे एकूण १४ प्राणी खाल्याचे अवशेषांवरून दिसून आले. शेतीच्या क्षेत्रात वाघीण रात्रीच्या वेळीच आल्याचे आढळले. वाघिणीने दिवसा वस्तीत येऊन अथवा शेतात येऊन मानवावर अथवा पाळीव प्राण्यांवर हल्ला केल्याची घटना निदर्शनास आली नाही. लगतच्या वस्त्यांकडून वाघिणीच्या हल्ल्याबाबत तक्रारही प्राप्त झाली नाही. या वाघिणीने ३ महिन्यांचे काळात सुमारे ४०० वर्ग कि.मी. क्षेत्राचे भ्रमण केले. यामध्ये रात्रीच्या वेळी अधिक भ्रमण दिसून आले. मानवी वहिवाटीच्या क्षेत्रात मानवापासून सरासरी १०० मीटर अंतर राखून तिचे भ्रमण असल्याचे दिसून आले. दिवसा दाट झाडीत ती वेळ घालवत असे. या काळात मानवी कार्यात हल्ल्याची तक्रार प्राप्त झाली नाही.



वाघिणीस स्थानिक लोक चेंबरमध्ये पडण्यापूर्वीपासूनच 'कला' नावाने ओळखत होते. पुन्हा मूळ अधिवासात वाघीण सामावून गेल्यामुळे आजीवन बंदिस्त ठेवण्याची गरज उरली नाही. यामुळेच खऱ्या अर्थाने वाघिणीचा

बचाव पूर्णपणे झाला आहे.

**स्थळ : कातलाबोडी**

नागपूर वनविभागातील कळमेश्वर वनपरीक्षेत्रामधील बाजारगाव बिटातील कातलाबोडी हे वनक्षेत्राने वेढलेले लहानसे गाव आहे. कातलाबोडी गावात राहूल भड आणि मुकेश गरड या गुरे चारणाऱ्या गुराख्यांना किशोरसिंग ठाकूर यांच्या शेतातील सुमारे ४० फूट खोल आणि १५ फूट व्यासाच्या विहिरीत ७ फेब्रुवारी, २०११ रोजी सकाळी ९.०० वाजता एक वाघ पडला असल्याचे लक्षात आले. ताबडतोब त्यांनी कळमेश्वर व कोंढाळी रेंज ऑफीस आणि स्थानिक पोलीस ठाण्यास याबाबत सूचित केले. स्थानिक वनकर्मचाऱ्यांकडून वन विभाग नागपूर कार्यालयात सकाळी १० वाजता हे वृत्त पोहोचले. क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना घटनास्थळी पोहचून खात्री करण्यास कळविण्यात आले. विहिरीत पडलेल्या वाघाची बातमी वेगाने पसरल्याने वाघ पाहायला विहिरीजवळ बघ्यांची गर्दी वाढली. ही गर्दी लक्षात घेता तिच्या नियंत्रणासाठी एस.आर.पी.चे जवान घटनास्थळी रवाना झाले. याबाबत वरिष्ठ वन अधिकाऱ्यांना माहिती देण्यात आली. वनविभाग व वन्यजीव विभागाचे अनुभवी अधिकारी, पशुवैद्यक अधिकारी व वन्यजीव संरक्षण कार्यात असलेल्या खाजगी संस्थांचे कार्यकर्ते घटनास्थळी पोहोचले. त्यांनी तेथील परिस्थितीचा अंदाज घेतला. वाघीण वाचविण्यासाठी आवश्यक साधने, औषधी मागविण्यात आले. विहिरीत पाणी नव्हते. वाघीण कोरडया विहिरीत पडली होती, त्यामुळे सुमारे ४० फूट खोल कोरडया विहिरीत पडल्याच्या धक्क्यामुळे तसेच उडया मारून बाहेर पडण्याकरिता केलेल्या अयशस्वी प्रयत्नांमुळे थकलेली वाघीण तहानेने व्याकूळ झालेली होती. हे लक्षात येताच पाण्याने भरलेली एक बादली दोरीच्या साहाय्याने विहिरीत सोडण्यात आली. या वाघिणीला तात्काळ उपचारांची आवश्यकता होती. त्यामुळे नागपूर विभागाचे वनसंरक्षक श्री रामबाबू यांनी प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा मुख्य वन्यजीव रक्षक महाराष्ट्र राज्य यांना घटनेबाबत अवगत केले. वाघिणीच्या बचावासाठी तिला बेशुद्ध करून बंदिस्त करण्याची परवानगी मिळवली. या वाघिणीस बेशुध्द करून पिंजऱ्यात बंदिस्त करण्यासाठी आवश्यक साधने जसे शिड्या, जाळया, दोर, औषधे घेऊन बचाव चमू नागपूर येथून दुपारी १२ वाजता नियून दुपारी२ वाजता घटनास्थळी पोहोचली.



सहायक वनसंरक्षक मिश्रीकोटकर यांना ट्रांक्युलायझींगचा चांगला अनुभव आहे. त्यांनी पशुवैद्यक अधिकाऱ्यांच्या मदतीने डार्ट तयार करून वाघिणीस बेशुध्द केले. श्री अमोल खंते (NGO) हे दोर व शिडीच्या साहाय्याने विहिरीत उतरले व वाघीण पूर्ण बेशुध्द झाल्याची बांबूने ढोसून खात्री करून घेतली.


दरम्यान, बचाव चमूने एक जाळी विहिरीत सोडली. मानद वन्यजीव रक्षक, कुंदन हाते, आणि गुणवंत खरबडे, वनकर्मी हे दोर व शिडीच्या साहाय्याने विहिरीत उतरले. त्यांनी वाघिणीचे पाय बांधून जाळयात ठेवले. डॉ. भोजने यांनी वाघिणीस इजा होवू नये या दृष्टीने तिला बांधताना घ्यावयाच्या खबरदारीबाबत आधीच सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे वाघिणीस जाळीत बांधण्यात आले. वाघिणीचे पुढचे व मागचे पाय चपट्या टेपद्वारे बांधण्यात आले व दोघेही विहिरीबाहेर आले. पर्वतारोहणाच्या दोरांचा उपयोग करून नायलॉन नेटवर वाघिणीस विहिरीबाहेर काढले. वर ओढतांना वाघिणीने काही हालचाल केली. त्यामुळे संभाव्य धोका लक्षात घेता तिला पुन्हा डार्ट बेशुध्द करून सायंकाळी ५.३० वाजता यशस्वीरीत्या पिंजरा बंदिस्त करण्यात आला.



डॉ. भोजने यांनी तिची तपासणी करून जखमी वाघिणीस निरीक्षण व उपचारासाठी खैरी नर्सरी येथे पिंजऱ्यात ठेवले. तिला शुद्धीवर आणण्याकरिता योग्य औषधोपचार केल्यानंतर रात्री ८ वाजता वाघीण शुद्धीवर आली. तिचे नीट निरीक्षण केले असता वाघिणीचे मागचे पाय सामान्य दिसत नव्हते तसेच ती ताठ उभीसुध्दा राहू शकत नव्हती. वनसंरक्षक नागपूर विभाग व मुख्य वन्यजीव रक्षकांनी एकमेकांशी सल्लामसलत करून पुढील वैद्यकीय उपचारांसाठी या वाघिणीला नागपूर येथील सेमिनरी हिल्स येथे आणून ठेवले. तेथे वाघिणीचा ८ फेब्रुवारी, २०११ रोजी गर्भपात झाला. अपरिपक्व गर्भातील तीन पिल्ले मृतावस्थेत बाहेर पडली. अकाली गर्भपातामुळे अशक्त वाघिणीवर डॉ दक्षिणकर, डॉ धूत व डॉ भोजने यांच्या निरीक्षणाखाली त्यांच्या पथकाने औषधोपचार सुरू केला.

१२ फेब्रुवारी २०११ रोजी वाघीण पूर्ण बरी झाल्याने ती निसर्गमुक्त करण्यासाठी पात्र झाल्याचे पशुवैद्यकांनी अहवाल दिला. त्यानंतर वाघिणीच्या मूळ अधिवासाचा अभ्यास करून व तेथील खुल्या विहिरींना काठ कुंपण करून त्याच क्षेत्रात मुक्त करावे असे ठरविण्यात आले. स्थानिकांना वाघीणीपासून सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्याचबरोबर तिचे छायाचित्रण करून वाघिणीस १५ फेब्रुवारी २०११ रोजी पहाटे ३.०० चे सुमारास खैरी रोपवाटिका परिसर या तिच्या मूळ अधिवासात मुक्त करण्यात आले.

तद्‌नंतर जवळपास आठ आठवडे तिच्या हालचालींचा मागोवा घेत वाघीण निसर्गात पूर्ववत सामावून गेल्याची खात्री करण्यात आली. यासाठी वनक्षेत्रातील कर्मचारी व एस.आर.पी.च्या जवानांनी गस्त ठेवली. गावोगावी भित्तिपत्रकांद्वारे लोकांना सतर्क करण्यात आले. ग्रामस्थ इंधनासाठी जंगलात जावू नयेत म्हणून बाजारगाव, सातनवरी या गावांमध्ये गावकऱ्यांना निस्तार दराने लाकूड विक्रीस उपलब्ध करून देण्यात आले. वाघिणीने निरीक्षण काळात मानवावर हल्ला केला नाही व निसर्गात सुस्थितीत सामावल्याची खात्री परिसरातील वन्यप्राणी सावज व गुरांच्या शिकारीने स्पष्ट झाली. ❑❑



# समृद्धीचा प्राणवायू

**देशातील अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने (संरक्षित वनक्षेत्रे) ज्या जंगलावर उभी आहेत ती अत्यंत पुरातन आहेत. ती अनेक पिढयांपासून जपलेली आहेत. देशाच्या संरक्षणात महत्त्वाची भूमिका बजावलेल्या किल्यांसारख्या वास्तूचे आपण जतन करतो. या वास्तू आम्हाला इतिहासाची आठवण करून देतात. तसेच या पुरातन जंगलांचे आहे. पण ही अरण्ये फक्त इतिहासाचे साक्षिदार नाहीत तर ते आपल्या वर्तमान व भविष्याचीही काळजी घेतात. रयतेच्या विकासासाठी, कृषी उद्योगांना संपन्न करण्यासाठी वीज,पाणी योग्य हवामान यासारख्या सेवा पुरविण्याचे काम ही पुरातन जंगले अविरतपणे करीत आहेत.**

किशोर रिठे

प्रत्येक राज्याला लाभलेली वने व वन्यजीवसंपदा खरे म्हणजे बँकेतील ठेवीप्रमाणे असते. त्या राज्याच्या विकासासाठी ठेवीवरील व्याजाप्रमाणे नैसर्गिक संसाधने व पर्यावरणीय सेवा अंखडपणे पुरविण्याचे काम ही समृध्द वने व वन्यजीवसंपदा करीत असते. महाराष्ट्रातील वने व वन्यजीव क्षेत्रांबद्दल पूर्वापार असलेले महत्त्व व राजाश्रयाबद्दल तर अनेक ऐतिहासीक पुरावे आहेत. महाराष्ट्रातील जंगलाच्या संरक्षणाबद्दल राज्यकर्त्यांची कटिबध्दता शिवाजी महाराजांनी अगदी चपखलपणे मांडली होती.

शिवाजी राजे आपल्या आज्ञापत्रात लिहितात.-

‘ही झाडे वर्षा-दोन- वर्षांनी होतात असे नाही. रयतेने ही झाडे लावून लेकरांसारखी बहुतकाळ जतन करून वाढविली ती झाडे तोडीलीयावरी त्यांचे दु:खास पारावार काय?’ शिवाजी महाराजांनी रयतेचे दु:ख हे असे मांडले. म्हणूनच शिवाजी राजे रयतेसाठी ’जाणते राजे’ ठरले.

महाराष्ट्रामध्ये ९१७६ चौ कि.मी वनक्षेत्रावर ही ४९ अभयारण्ये,राष्ट्रीय उद्याने असून राज्यातील नद्यांना ते बारमाही ठेवण्याचे कसोशीचे प्रयत्न करतात. या नद्यांच्या आश्रयानेच आम्ही आमच्या विकासाची स्वप्ने रंगवित आहोत.

तापी, पूर्णा, पेंच, कन्हान, वर्धा, प्राणहिता या विदर्भातील नद्या महाराष्ट्र मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश व गुजरात या राज्यातील जवळपास दोन लाख चौ कि.मी. भोगोलिक क्षेत्राला कृषीसाठी सिंचनसेवा, उद्योगांना वीज,शहरांना पिण्याचे पाणी व नागरिकांना इतर पर्यावरणीय सेवा पुरवून संपन्नता बहाल करतात. उर्वरित महाराष्ट्रातील गोदावरी, कृष्णा मुळा-मुठा या नद्यांचे मूळ स्त्रोत हे आपल्या संपन्न वने व वन्यजीव क्षेत्रामधे दडले आहेत. या वन्यजीव क्षेत्रांचा ऱ्हास आमच्या नद्यांच्या मुळाशी घाव घालणारा ठरणार आहे.

महाराष्ट्रात चार व्याघ्र प्रकल्प आहेत. परंतु

या व्याघ्र प्रकल्पांनी फक्त वाघांवरच प्रेम केले नाही तर राज्यातील जनतेच्या विकासासाठी शंकरजींच्या जटेमधून निघणाऱ्या गंगेप्रमाणे नद्यांनाही वाहते ठेवण्याचे काम केले आहे, सातारा, कोल्हापूर व रत्नागिरी जिल्ह्यांत पसरलेला सह्याद्री व्याघ्र प्रकल्प कोयना चांदोली धरणांच्या रूपाने कृषी व उद्योगांना वीज व पाणी पुरविणारा मोठा स्रोत राहिला आहे.

नागपूर जिल्ह्यातील पेंच व्याघ्र प्रकल्पानजिकच्या सुमारे ८००० हेक्टर जंगलास कापून १९८८ साली उभारलेले पेंचचे धरण आज १ लाख हेक्टर कृषी क्षेत्राचे सिंचन करीत आहे. येथे उभारलेला जलविद्युत प्रकल्प १६० मेगॉवॅट एवढी वीज महाराष्ट्र व मध्यप्रदेशाला पुरवितो तसेच नागपूर शहराला ३४६ दशलक्ष लिटर पिण्याचे पाणीही पुरवितो. पेंच व्याघ्र प्रकल्पाचे ऋण आपल्याला या जन्मात फेडता येणार नाही.

या व्याघ्र प्रकल्पातून निघणारी पेंच नदी नागपूर तालुक्यातील २५.४६२ हेक्टर भंडारामधील २०.२९९ हे. रामटेकमधील ५३.६८१ हेक्टर व सावनेर तहसील मधील ५११४ हेक्टर कृषी जमिनीवर सिंचन करते.

नागपूर महानगरपालिका आज वर्षाकाठी ५० कोटी रुपये निधी पिण्याच्या पाण्याच्या करामार्फत नागपूरकरांकडून गोळा करते. यापैकी ९० टक्के निधी हा नदीमुळे महापालिकेला मिळतो हे मात्र सोईस्करपणे विसरले जाते. महापालिका या पाणीपुरवठ्यासाठी वर्षाकाठी साधारण: १२ कोटी रुपये जीवन प्राधिकरणास देते परंतु पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या संवर्धनास मात्र या कराचा साधा १ टक्का निधीसुध्दा जात नाही.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील सिपना खंडू, खापरा डोलार, गाड्या या नद्या तापीला मिळून सशक्त करतात. हीच तापी पुढे तीन राज्यांमध्ये पसरलेल्या ६५१४५ चौ.कि.मी. खोऱ्यास सुजलास-सुफलाम बनविते. महाराष्ट्रातील ५१,५०५ चौ.कि.मी., मध्यप्रदेश आणि गुजरात मधील ३,८३६ चौ.कि.मी. एवढया क्षेत्राचा यात समावेश होतो.

सातपुडा पर्वतातील जंगलाच्या निर्झरांनी जन्माला घातलेली पूर्णा, मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या दक्षिणेकडील वान अभयारण्यातून निघणाऱ्या वान नदीच्या साथीने अमरावती व अकोला जिल्ह्यांना संपन्नता प्रदान होते तर खानदेशातील यावल अभयारण्यातील सुक्की नदीने जळगाव जिल्हातील केळीच्या बागांना आजवर पोसले आहे.

चंद्रपूर जिल्हातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातून निघणारी अंधारी, उमा या नद्या पुढे वैनगंगा व इंद्रावतीच्या साथीने गोदावरीच्या पोटात सामावून विदर्भासह आंध्रप्रदेश व दक्षिणेकडील राज्यांना संपन्नता प्रदान करतात.

स्थानिक गावांना ही संरक्षित वनक्षेत्रे प्रतिष्ठेची वाटली पाहिजेत. या गावांना कृषी व उद्योगांना वीज पुरवठा याशिवाय पिण्यासाठी पाणी, कृषीसाठी जलस्रोत, पिकांसाठी मित्रकीटक, हवेत गारवा जमिनीत ओलावा हे मिळते. आर्थिक लाभाच्या निकषणावर मैत्री बाळगणाऱ्या माणसांकडून खरे म्हणजे या संरक्षित वनक्षेत्रांना सहानुभूती मिळेलच हे सांगता येणार नाही. त्यातच राज्याच्या काही भागांमध्ये मानव व वन्यप्राणी संघर्षाची स्थिती





निर्माण झाल्यामुळे या भागांमध्ये संरक्षित वनक्षेत्रांना गावकऱ्यांकडून सहानुभूती व लोकप्रतिनिधींचे प्रेम कसे मिळेल, यावर चिंतन होणे गरजचे झाले आहे.

**हिरवी मंदिरे**

देशात सध्या ६२८ अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने (जवळपास ४५ व्याघ्र प्रकल्प) आहेत. ही वन्यजीव क्षेत्रे म्हणजे जणू हिरवी मंदिरेच. अशा संपन्न वन्यजीव क्षेत्रांना नख न लावण्याचे केंद्र शासनाचे धोरण आहे. तेच धोरण राज्य शासनाचे आहे. म्हणूनच धरणे व खाणी उभारण्यासाठी जेव्हा वनजमिनींची व वन्यजीव अधिवासांची मागणी होते तेव्हा अशी प्रकरणे थेट केंद्रीय वन्यजीव मंडळाकडे पाठविली जातात. अशा प्रकल्पांना मग परवानगी मिळणे कठीण होऊन बसते. त्यामुळे या अभयारण्यांकडे पुन्हा तिरस्काराच्या भावनेतून पाहिले जाते.

अवाढव्य लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात प्रत्येक भौगोलिक क्षेत्राचा वापर वाढत्या लोकसंख्येला जगविण्यासाठी होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील पाचही विभागांमध्ये कृषी क्षेत्र व वनक्षेत्राकडून जनतेला रोजगाराची अपेक्षा असते. यातूनच वनक्षेत्रांचा पर्यटनासारख्या व्यावसायिक बाबींसाठी वापर करायचा पण त्यातून मूळ वनक्षेत्राच्या अस्तित्वाला जराही नख लागू द्यायचे नाही हे पाहणे आवश्यक ठरते. राज्यातील कोकण व विदर्भासारख्या वनाच्छादित क्षेत्रांमध्ये

वनसंवर्धनातून रोजगार निर्मिती होणे म्हणूनच आवश्यक आहे. निसर्ग पर्यटनाच्या माध्यमातून हे निश्चित शक्य आहे.

स्थानिक लोकांच्या आर्थिक विकासातून किल्ल्यांच्या देखरेखीसाठी मिळालेला लोकसहभाग पाहता हे यश राज्यातील व्याघ्र प्रकल्प, अभयारण्ये व राष्ट्रीय उद्यानांच्याही वाट्याला यावे, यासाठी महाराष्ट्र सरकारने ५ ऑक्टोबर २०११ रोजी संयुक्त वन - व्यवस्थापनाचा शासकीय अध्यादेश जारी केला. राज्यातील वनाच्छादित गावांसाठी हा वरदान ठरू शकेल. याच धर्तीवर २२ डिसेंबर २०११ रोजी राज्यातील अभयारण्ये राष्ट्रीय उद्याने व व्याघ्र प्रकल्पांच्या क्षेत्रातील गावांसाठी असाच अध्यादेश काढण्यात आला आहे. आता राज्यातील वनक्षेत्रांमध्ये असलेल्या स्थळांना भेटी देणाऱ्या पर्यटकांपासून शुल्कवसुलीचे अधिकार गावातील संयुक्त वनव्यवस्थापन व पारिस्थितीकीय विकास समित्यांना वने व वन्यजीव संरक्षण करण्याच्या अटींवर देण्यात आले आहेत.



या स्थळांची देखभाल करणे, कचरा व्यवस्थापनात सहभाग देणे, पर्यटकांना मार्गदर्शन करणे, वनवणवे, अतिक्रमणे यापासून संरक्षण देणे व गावांना चूलमुक्त, चराईमुक्त व हागणदारीमुक्त करणे या बाबी समित्यांकडून अपेक्षित आहेत. राज्यातील अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने व व्याघ्र प्रकल्पांमध्ये शिस्तबध्द पध्दतीने निसर्गपर्यटन धोरण राबविल्यास ही संरक्षित वनक्षेत्रे आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण होतील.

या जंगलांच्या संरक्षण व संवर्धनासाठी जाळरेषा काढणे, पाणवठे निर्माण करणे, जलव्यवस्थापन करणे, कुरणांचा विकास करणे, अनावश्यक वनस्पती प्रतिबंध व निमूर्लन, गावांमधील पाळीव गुरांचे लसीकरण करून घेणे, भाकड गुरांचे नियोजन करणे, अतिक्रमणे काढणे, वन्यप्राण्यांपासून होणारे पीक नुकसान थांबविणे, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात होणारी गुरे व मनुष्य हानी कमी करणे, गावानजिक वृक्षारोपण करणे इत्यादी कामे करणे आवश्यक असते. अर्थात ही सर्व कामे करण्यासाठी प्रत्यक्षात मोठया प्रमाणावर निधीची आवश्यकता भासते.

या ४९ संरक्षित वनक्षेत्राचे प्रत्येकी सर्वसाधारण क्षेत्रफळ ७० चौ. कि.मी. ते ७०० चौ. कि.मी. एवढे आहे. महाराष्ट्रातील कोणत्याही गावात सांडपाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी गटार योजना राबविण्यांसाठी सुमारे दीड ते दोन कोटी रुपये एवढा खर्च अपेक्षित असतो. यातील कोणत्याही अभयारण्यास व्यवस्थापनासाठी प्रत्यक्षात यापेक्षा कितीतरी जास्त निधी लागतो. परंतु त्याप्रमाणात तो राज्यसरकार किंवा केंन्द्रशासनाकडून मिळत नाही.

देशातील या ६२८ हिरव्या मंदिरासाठी केंद्राकडून ३४ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना जो एकून निधी मिळतो तोच मुळी तुटपुंजा आहे. २००७-०८ मधे ६३ कोटी २००८-०९ मधे ७९ कोटी, २००९-१० मधे ७३ कोटी व २०१०-११ मधे ७४ कोटी रुपये, अशा तुटपुज्या निधीत राज्य सरकारे या हिरव्या मंदिरांना शास्त्रोक्त पद्धतीने सभांळणार तरी कसे? यापैकी ज्या संरक्षित वनक्षेत्रामध्ये वाघ किंवा हत्ती आढळून येतात त्या अभयारण्यांना किंवा राष्ट्रीय उद्यानांना व्याघ्र प्रकल्प किंवा हत्तींचे रिझर्व या संज्ञेखाली आणण्यात आले आहे. महाराष्ट्रात सांवतवाडी- दोडामार्ग हा गोवा, कर्नाटक सीमेनजीकचा भाग सोडला तर रान हत्ती नाहीतच. मात्र देशात असणाऱ्या २८ हत्तींच्या रिझर्वसाठी २००७-०८ मधे १६.४० कोटी, २००८-०९ मधे २०.९९ कोटी २००९-१० मधे ९.९० कोटी व २०१०-११ मधे २१.९७ कोटी रुपये केंद्र शासनाकडून देण्यात आले. महाराष्ट्राला या चार वर्षांमध्ये अनुक्रमे ५६, ७७, ४९ व २९ लाख रुपये मिळाले. वाढती लोकसंख्या व त्यासाठी कृषी आणि औद्योगिक विकासासाठी लागणारी वीज, पाणी व कोळसा यांची वाढती मागणी यामुळे येणाऱ्या काळात राज्यातील संरक्षित वनक्षेत्रे व त्यांना जोडणाऱ्या संचारमार्गांच्या संरक्षणामध्ये मोठे प्रश्न उभे राहणार आहेत.

त्यावर उपाय सुचवितांना शिवाजी महाराजांचे आज्ञापत्र पुढे म्हणते,



**वृक्षांच्या अभावे हानीहि होते.**
**हे गोष्ट सर्वथा होवू न द्यावी,**
**कदाचित येखादे**
**झाड जे बहूत जीर्ण**
**होवून कामातून गेले असेल**
**तरी त्याचे धन्यास राजी**
**करुन द्रव्य देऊन**
**त्याच्या संतोषे न्यावे**

एखाद्या जीर्ण झाडाच्या विल्हेवाटीसाठी इतक्या संवेदनशीलतेने विचार करणाऱ्या शिवाजी महाराजांसारखा दृष्टिकोन येणाऱ्या काळात आम्हालाही ठेवावा लागेल. विकासाच्या योजना आखताना खाणी आणि धरणांसाठी जंगलावर सर्रास बलात्कार करणे योग्य नव्हे. जीर्ण झालेल्या वृक्षांप्रती महाराज इतके संवेदनशील होते तर आज जंगलाचे लचके तोडून खाणी आणि धरणांसाठी त्यांचा बळी देणे किवा वन्यजीवांच्या मंदिराना धरणांमध्ये बुडविणे आम्हाला कसे परवडणार आहे?

**संपर्क : ९४२२१५७१२३** ❐ ❐



# वने आणि उपजीविका

गडचिरोली जिल्ह्यामध्ये ७६% इतके वनक्षेत्र जंगलांनी व्यापले आहे. या वनक्षेत्राचे संवर्धन करण्यासाठी पाच वनविभाग कार्यरत आहेत.

या जिल्ह्यातील बहुतांश जनता आदिवासी आहे. त्यांची स्वत:ची जमीन अथवा शेती नाही. त्यांची उपजीविका वनविभागामार्फत सुरू असलेल्या कुप तोड, जलसंधारण कामे, तेंदू पत्ता संकलन यासारख्या हंगामी स्वरूपाच्या कामावर मिळणाऱ्या रोजगारातून चालते. काही प्रमाणात बिल्ट या कागद कारखान्यासाठी बांबू तोड मधूनही रोजगार मिळतो. शाश्वत कामाचा हंगाम कालावधी किंवा कामाचे दिवस मर्यादित असतात. साधारणपणे ४ ते ५ महिने काम मिळते. उर्वरित कालावधीत डिंक, मध, मोहाफुले,

**टी. एस. रेड्डी**

आवळा, हिरडा, बेहडा यासारखे किरकोळ वन उपज संकलित करून स्थानिक आठवडी बाजारात किरकोळ व्यापाऱ्यांना हे आदिवासी विकतात. त्यांचे निश्चित दर नसल्यामुळे बाजारमूल्यापेक्षा अत्यल्प दरामध्ये व्यापारी ते खरेदी करतात. साठवणूक व प्रक्रिया यासारखे पर्याय नसल्यामुळे हा नाशवंत माल मिळेल त्या दरात विक्री केला जातो.

प्रामुख्याने अगरबत्ती उत्पादन प्रकल्प, हिरडा, बेहडा यासारखे औषधी बी संकलन प्रक्रिया विक्री, मोहाफुले खरेदी विक्री, डिंक, मध खरेदी प्रक्रिया प्रकल्प, पळस पत्रावळी प्रकल्प, बांबूपासून कलाकुसर व फर्निचर प्रकल्प, जैवविविधता केंद्र निर्मिती देखभाल, याचबरोबर कमी शिक्षण झालेल्या आदिवासी मुले-मुली, तरुणांसाठी हॉटेल व्यवस्थापन, बांधकाम, ऑटोमोबाइल यासारखे व्यावसायिक प्रशिक्षण व हमखास नोकरी मिळणारे प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. गडचिरोलीचे जिल्हाधिकारी अभिषेक कृष्णा व गडचिरोली वनवृत्ताचे मुख्य वनसंरक्षक टी.एस.के. रेड्डी यांनी यासाठी विशेष परीश्रम घेतले. वनांचे शास्त्रोक्त व्यवस्थापन (Sustainable

> गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींच्या जीवनमानात सुधारणा करण्याची नावीन्यपूर्ण योजना वनविभागाने, जिल्हा प्रशासन व स्थानिक वन व्यवस्थापन समितीच्या सहभागातून तयार केली आहे.



अगरबत्ती उत्पादन



Management) हा याचा पाया आहे. गडचिरोली जिल्ह्यात असलेल्या विपुल व वनसंपत्तीने समृद्ध असलेल्या जंगलावर आधारित उद्योगांमधून रोजगार निर्मिती व संवर्धन याची सांगड घालण्यात आली आहे.

**अगरबत्ती उत्पादन**

पोर्ला, देऊळगांव, घोट, सिरोंचा, रोमपल्ली, भामरागड व ताडगांव अशा ७ गावांमध्ये अगरबत्ती उत्पादन प्रकल्प सुरू करण्यात आले. प्रत्येक केंद्रावर २० पेक्षा जास्त महिलांना काम मिळाले आहे. दररोज १५० रु. पेक्षा जास्त मजुरी मिळत आहे. महिलांमध्ये विधवा, परित्यक्ता, निराधार, गरीब, आदिवासींना प्राधान्य दिले आहे. कच्चा माल कोळसा, जिगत, बांबू काडी सर्व पर्यावरणपूरक आहेत. प्रति किलो १० रु. प्रमाणे मोबदला मिळत आहे. प्रत्येक केंद्रावर १ पुरुष पर्यवेक्षक व २० महिलांना काम मिळाले आहे. सध्या सुरू असलेल्या ५ केंद्रावर १५० महिलांना काम मिळाले. त्यांचे बचत गट कार्यान्वित करण्यात आले आहेत.

पुढील टप्प्यामध्ये बांबू अगरबत्ती काडी बनविण्याचे संयंत्र कुरखेडा येथे बसविण्यात येणार आहे. त्यामुळे स्थानिक जंगलात उपलब्ध असलेल्या बांबूपासून काड्या, पालापाचोळा यापासून अगरबत्ती कोळसा या प्रकल्पातून मूल्य वृध्दी होणार आहे. यातून मिळणारा लाभ हा आदिवासी महिला मजुरांना वितरित करण्यात येईल.

हा स्वावलंबी प्रकल्प असून २०१२-१३ या वर्षामध्ये ३-४ महिन्यात १००० पेक्षा जास्त महिलांना गावात काम मिळणार आहे. एकात्मिक कृती आराखडा, मानव विकास कार्यक्रम, जिल्हा नियोजन समिती इत्यादी योजनांमधून निधी मंजूर करण्यात आला आहे. ४६ उत्पादन केंद्र निर्मितीचे काम सुरु आहे. दर १५ दिवसांनी मजुरी मिळत असल्यामुळे या कामाला आदिवासी महिलांकडून मोठी मागणी आहे.

**हिरडा बेहडा खरेदी प्रक्रिया**

२०१२-१३ मध्ये ८ टन हिरडा बी मधील छिलका व बी वेगळे काढून ''बैद्यनाथ'' या



हिरडा बेहडा प्रक्रिया

औषधी कंपनीस विक्री करण्यात आले आहे. त्यापासून आदिवासींना वाढीव किंमत मिळाली.

**मोहफुले खरेदी विक्री**

३१ टन मोहफुले आदिवासींमार्फत हमी भावामध्ये खरेदी करण्यात आली. ही फुले वाळवून विक्री केली गेली. यामुळे आदिवासींना वाढीव भाव व जागेवरच रोख रक्कम मिळाली आहे.

## व्यावसायिक प्रशिक्षण

२०० अल्पशिक्षित आदिवासी तरुणांना 'प्रथम' या नामांकित संस्थेमार्फत हॉटेल व्यवस्थापन, बांधकाम या विषयाचे ३ महिन्याचे निवासी प्रशिक्षण मोफत दिले आहे. प्रशिक्षणानंतर या तरुणांना 'ताज ग्रुप', 'सन अॅण्ड सॅन्ड' यासारख्या पंचतारांकित हॉटेलमध्ये आणि लार्सन व टुब्रो यासारख्या आंतरराष्ट्रीय कंपनीमध्ये नोकरी मिळाली आहे. अनेक तरुण, तरुणी औरंगाबाद,लातूर, अहमदनगर, धमतरी सागर या ठिकाणी प्रशिक्षण घेत आहेत. किमान ३,७५०/- रुपये दरमहा इतकी पगार हमी आहे. कुशलतेनुसार रु.६,०००/- ते रु.१०,०००/- दरमहा पगार मिळतो. अल्पशिक्षित आदिवासी तरुणांना स्पर्धेच्या युगात नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी मिळत आहे. सद्यस्थितीत ३०० पेक्षा जास्त तरुण प्रशिक्षण घेत आहेत. पुढील वर्षी एकूण २४०० पेक्षा जास्त तरुणांना प्रशिक्षण व नोकरी देण्याचे नियोजन आहे. मानव विकास कार्यक्रमांतर्गत रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या सहकार्यातून प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे.



प्रशिक्षणार्थी विद्यार्थी

### लाख उत्पादन प्रकल्प

नैसर्गिकरीत्या वाढलेल्या कुसूम, पळस या वृक्षावर लाख कीटकांचे संगोपन करून अल्प कालावधीत ६ ते ८ महिन्यात चांगले उत्पन्न आदिवासींना मिळत आहे. भामरागड, आलापल्ली, सिरोंचा येथे ८०० आदिवासींना ४००० पेक्षा जास्त वृक्ष उपलब्ध करून देण्यात आले आहेत. प्रति लाभार्थी ५ वृक्ष देण्यात येत आहे. यामधून १०,००० ते १२५०० इतके उत्पन्न ८ महिन्यात मिळेल. आंतरराष्ट्रीय बाजारात लाखेचे भाव वाढले आहेत. ते ५०० रु. प्रति किलो ते रु.१२०० प्रति किलो असे आहेत. वृक्षतोड न करता त्यापासून सातत्याने वृक्षावर कीटक संगोपन करून उत्पन्न स्त्रोत निर्माण करण्यात येत आहे. हासुद्धा पर्यावरणपूरक प्रकल्प आहे.



फूलझाडू गवत

### पळस पत्रावळी

पळसाच्या पानापासून पत्रावळी बनविण्याचा उद्योग वडसा वनविभागात सुरू करण्यात आला आहे.

### बॉयोडिझेल प्रकल्प

जंगलात मोठ्या प्रमाणात मोहा झाडे आहेत. मोहा बियांपासून जैविक तेल निर्मिती प्रकल्प उभारणीचे नियोजन करण्यात आले आहे. या नाविन्यपूर्ण प्रकल्पातून वनावर अवलंबून असलेल्या जंगलवासी आदिवासींना चरितार्थाचा कायमचा स्रोत निर्माण होणार आहे.



स्वयंपाक गॅसचे प्रात्यक्षिक

### मधसंकलन प्रक्रिया प्रकल्प

एटापल्ली येथे मध प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात आला आहे. यावर्षी सिरोंचा, गडचिरोली, आलापल्ली येथे प्रकल्पाचे काम सुरू आहे. यामध्ये केंद्र शासनाचा मध संशोधन केंद्र, पुणे यांच्या सहभागातून शास्त्रोक्त पद्धतीने मध संकलन करणारी प्रक्रिया यांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रक्रिया केंद्रावर स्थानिक आदिवासी तरुणांना काम देण्यात येईल. स्थानिक बाजारात मधास ६० ते ७० रुपये दर मिळतो. प्रक्रिया केंद्रावर १०० ते १२० रु. दर दिला जाईल.



मध संकलन

### जैविक विविधता केंद्र

गडचिरोली शहराजवळ सेमानादेव येथे ''जैवविविधता उद्यान'' निर्माण करण्यात आले आहे. याची देखभाल मौजा वाकडी येथील संयुक्त वनव्यवस्थापन समिती करीत आहे. प्रवेशकरांमधून मिळणाऱ्या आर्थिक स्त्रोतामधून १०-१२ मजूरांना देखभालीचे काम मिळाले आहे. शहराजवळ पर्यावरण जैवविविधता माहिती केंद्र निर्माण झाले आहे. याचा लाभ विद्यार्थी व नागरिक घेत आहेत. मौजा चामोर्शी, आलापल्ली, सिरोंचा व वडसा येथेही जैवविविधता उद्यान निर्मितीचे काम सुरू आहे. यामधून पर्यावरण शिक्षणाबरोबर पर्यटन उद्योगाला चालना मिळणार आहे. प्रसिद्ध देवस्थान मार्कन्डादेव येथे पर्यटन संकुल व माहिती केंद्र उभारण्यात येईल. याच्या देखभालीपासून स्थानिक तरुणांना रोजगार मिळेल.



# सहल वनातली

**आर. के. वानखडे**

महाराष्ट्रातील राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, व्याघ्र प्रकल्प क्षेत्र, दुर्ग, जलस्थळे, जलप्रपात या वनातील आकर्षणांकडे पर्यटकांचा कल वाढत आहे. वनक्षेत्रातील पर्यटकांवर प्रभावी नियमन नसल्यामुळे तेथील जैवविविधता, वन्यजीव, पाणस्थळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर जैविक/ अजैविक कचरा प्रदूषण होऊन या स्थळांचा ऱ्हास होत आहे. स्थानिक लोकांना या क्षेत्रांचे पावित्र राखण्यात स्वारस्य दिसून येत नाही. त्यामुळे वनांचे संवर्धन आहे त्या स्थितीत करणे अगत्याचे आहे. त्याचबरोबर या क्षेत्रांवर ज्या स्थानिक लोकांची उपजीविका अवलंबून आहे त्यांना या क्षेत्राचे संवर्धन व संगोपन करणे आवश्यक वाटले पाहिजे व त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने निसर्ग पर्यटनाचे धोरण निश्चित केलेले आहे. पर्यावरणाचा ऱ्हास न होता निसर्ग पर्यटनाचा विकास व स्थानिक लोकांच्या संस्कृतीचे जतन या बाबी विचारात घेऊन पर्यटक व स्थानिक लोक या दोघांचेही हित यातून जोपासले जाणार आहे.



आरामदायी निवास



मोहर्ली

नैसर्गिक वारसा आणि स्थानिक जनतेचे हितसंबंध जपण्यासाठी निसर्ग पर्यटन स्थळी योग्य कामांचे नियोजन करण्यात येते. ही कामे करण्याकरिता वनविभाग व फॉरेस्ट डेव्हलपमेंट ऑफ कार्पोरेशन लिमिटेडतर्फे निसर्ग पर्यटन प्रकल्प तयार करण्यात आले. परिसरातील संयुक्त वनव्यवस्थापन समिती तसेच परिस्थिती विकास समिती यांच्या माध्यमातून विविध निसर्ग पर्यटन कार्यविधी कार्यान्वित करण्यात येत आहे. त्यामुळे स्थानिक जनतेत पर्यटन स्थळांविषयी आपुलकी निर्माण होईल व त्यांचा क्षेत्र संवर्धनाचा व्यासंग निश्चितच वाढीस लागेल.

निसर्ग पर्यटन विकास प्रकल्पांच्या कामांमधे निवास व्यवस्थेसह प्रामुख्याने खालील कामांचाही समावेश आहे.

१. सांडपाणी व्यवस्थापनाकरिता बायोडायजेस्टर प्रणाली बसविणे.

२. सौर उर्जेच्या वापराकरिता सोलार उपकरणे लावणे.

३. स्थानिक संस्कृतीचा लाभ पर्यटकांपर्यंत पोहचविण्याकरिता गृहपर्यटनास प्रोत्साहन देणे.

४. निसर्ग शिक्षणाकरिता निसर्ग पाऊलवाट तयार करणे व त्यावर योग्य फलक लावणे.

स्थानिक युवकांना गाईड प्रशिक्षण, कॅटरींग व हाऊसकिपिंग प्रशिक्षण देण्यात येत असून त्यांचे सहकार्य यासाठी घेण्यात येत आहे. यातून त्यांना आर्थिक लाभ अपेक्षित आहे.

निसर्ग पर्यटन प्रकल्प व्यावसायिक दृष्टीने राबविण्याकरिता हॉटेल मॅनेजमेंट व हॉस्पिटॅलीटी मॅनेजमेंट प्रशिक्षित रिसॉर्ट मॅनेजर व असिस्टंट रिसॉर्ट मॅनेजर यांची कंत्राटी नेमणूक करण्यात आली आहे. याशिवाय त्यांच्या मदतीस एफडीसीएम लि. च्या आस्थापनेवरील वनरक्षक यांना नेमण्यात आले आहे. या सर्वांना निसर्ग पर्यटनाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

एफडीसीएम लि. तर्फे कार्यान्वित करण्यात आलेल्या निसर्ग पर्यटन निवास व्यवस्थेच्या आरक्षणाची सुविधा www.maharashtra-tourism.gov.in या महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. ❑ ❑



# संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

# संस्मरणीय सफर

**संजय गांधी राष्ट्रीय उद्यान हे मुंबई महानगरच्या चतुर्सीमेतील उष्णकटिबंधीय जंगलाचा एक विलक्षण आविष्कार आहे. १०४ चौ.किमी परिसर व्यापलेले हे संरक्षित क्षेत्र सव्वा कोटीहून अधिक लोकसंख्येने वेढलेले आहे. हे उद्यान एक चतुर्थांश भारतीय पक्ष्यांचे घर असून, त्याबरोबर चकवा देण्यात पटाईत बिबट्यासह विविध सस्तन प्राण्यांचे आश्रयस्थानही आहे. फुलपाखरांच्या १५० व कीटकांच्या ८००० प्रजाती इथे आढळतात. अत्यंत छोटी झाडेझुडपे, उंच वृक्ष व वृक्षाला लपेटलेल्या वेलीपासून ते गगनचुंबी सागवान, बांबूपर्यंत अशा ८०० हून अधिक वनस्पतींची इथे दाटी झालेली दिसते.**

सुनील लिमये

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान कदाचित भारतातील सर्वाधिक भेट दिले जाणारे पण अत्यंत कमी समजावून घेतलेले हे एक निसर्गउद्यान असावे. अलिकडेच ख्यातनाम निसर्गतज्ज्ञ संजोय मोंगा यांना oriental hobby, oriental hawk eagle, d Orange Breasted green pigeon या परिसरात पहिल्यांदाच आढळले आहेत. यावरून या भागातील नैसर्गिक समृध्दी अधोरेखित होतेच तसेच या भागात विविध जीवसृष्टीना अनुकूल पर्यावरण असल्याचे स्पष्ट होते. बीजा (pterocarpus marsupiam) आणि स्पॉंडियस (Spondius acuminate) हे या उद्यानातील प्रमुख विशेष वृक्ष आहेत की जे निव्वळ हयाच भागात आढळतात. हया उद्यानात इतरही नामशेष होऊ यातलेल्या जीवांचे अस्तित्व आढळते. या उद्यानातील पृष्ठवंशीय प्राण्यात २२ प्रकारचे सस्तन प्राणी, १७४ प्रकारचे पक्षी, ३८ प्रकारचे सरपटणारे प्राणी व ९ निशाचर प्राणी सापडतात. येथील एक दुर्मीळ सस्तन प्राणी म्हणजे 'वाघाटी' (rusty spotted cat AWdm Felis rubiginosa) इथे सापडणाऱ्या ८ नैसर्गिक गटातील १८ कुलातील ८ प्रजाती या नामशेष होणा-या सुरक्षित जीवांच्या यादीत आहेत. यात वाघाटी (rusty spotted cat) रानमांजर (jungle cat), उदमांजर (small Indian civet cat) कांदेचोर (plam civet), कोल्हा (jackal), चौशिंगा (four horned antelope), बुटके हरिण (mouse deer) यांचा समावेश आहे.

प्राणीसृष्टीत १८ गटातील ४७ कुलांचे वास्तव्य येथे सापडते. या उद्यानाला हिमालयातील व मध्य आशियातील सुमारे ८० प्रकारचे स्थलांतरित पक्षी भेट देतात. Sparrow Hawks, European Kestrels,

Black-Breasted Quails, Marsh Sandpipers and Stone curlews हे पक्षीही येथे दिसतात. हे राष्ट्रीय उद्यान नामशेष होऊ घातलेल्या ५ संरक्षित पक्ष्यांचे वसतिस्थान आहे. मासे खाणारे गरुड (Osprey or the fish eating eagle) पांढऱ्या पोटाचे समुद्रगरुड (white bellied sea eagle) हे त्यातील महत्त्वाचे पक्षी आहेत. सरपटणाऱ्या प्राण्यांच्या ३ गटातील १४ कुलातील प्राणी येथे सापडतात पैकी ७ हे नामशेष होऊ घातलेल्या संरक्षित प्राण्यांच्या गटात मोडतात. मगरी (The marsh crocodile or Mugger) AOJa (Rock python) हे त्यातील महत्त्वाचे प्राणी आहेत. भारतीय नाग (Indian cobra) घोणस (Russel's viper), मण्यार (krait) आणि फुरसे (the saw scaled viper) हे सर्व विषारी साप या उद्यानात सहजपणे दृष्टीस पडतात. विषारी सर्पांच्या जोडीनेच नागला भागात Excoecaria agallocha ही विषारी पाणथळ वनस्पतीही आढळते.

## २५ प्रकारचे मासे

वसईची खाडी, तुलसी, विहार हे जलाशय व इतर पाणीसाठयांमुळे प्रत्यक्ष उद्यानात व सभोवतालात जलचरांचे सुमारे २५ प्रकारचे मासे आढळतात जसे बोंबील (Mumbai Duck), गोल्डन अँकोव्ही (Golden anchovy), हेकरु (Hekru), सागरी कॅटफिश (Marine Catfish) मरे (Murre) शिंगला (shingala), कटला (Catla) रोहू (rohu) वडस (vadas) इ. सकाळी अथवा संध्याकाळी शिलोंडा, मालाड, गायमुख या भागात भटकताना एखाद्या जंगली पाहुण्याच्या भेटीगाठीचा योग येऊ शकतो जसे की चपळ बिबटया, माकडांची टोळी, नानाविध प्रकारचे पक्षी (Grey jungle fowl, Red spur fowl, Greater racket-tailed drongo, Indian grey hornbill, Emerald dove, Black-hooded oriole, Puff-throated babbler and the White-eyed buzzard.) या परिसरातील वैविध्य कधीही जंगलप्रेमींना निराश करत नाही. कीटकांच्या सुमारे ८ ते १० हजार जाती येथे सापडतात. जंगलात भटकताना जेव्हा लहान लहान मुलांना वा निसर्ग प्रेमीना एखादा नाकतोडा सापडतो वा एखादा



चकाकणारा भुंगा सतावतो वा हातभर आकाराचा घुबडी पतंग (owl moth) भेटतो तेव्हा या इवल्याशा कीटकांविषयीचा दृष्टिकोन निश्चितच बदलतो.

या उद्यानात ७० हून अधिक प्रकारच्या कोळयांची नोंद जरी येथे झाली असली तरी अजूनही अनेक अनामिक जाती इथे नांदतात. हे कोळी पाहण्यासाठी जुलैच्या शेवटापासून नोव्हेंबरच्या मध्यापर्यंतचा काळ सर्वोत्तम. सर्व सामान्यांना कोळी त्यांच्या जाळे विणण्याच्या कौशल्यासाठी माहिती असतात, तरी अनेक कोळी जाळी न विणता थेट शिकार करतात. जाळयासाठी प्रसिध्द असलेला विशाल कोळी (The Giant Wood Spider) ऑगस्टच्या सुरुवातीला वा त्याच्या आधी आपल्या विजनवासातून बाहेर येतो. त्याचप्रमाणे ट्रॅप डोअर कोळी (Trap door spider) बेसावध कीटकांना लक्ष्य करतो तेव्हा पाहणारा स्तिमित होतो. स्पॉट स्वोर्डटेल (The Spot Swordtail) कॉमन ब्ल्यू बटरफलाय (Common Blue Bottle Butterfly) इथल्या सर्द उन्हाळी वातावरणात जेव्हा भिरभिरतात तेव्हा येथील उन्हाळा रंगबेरंगी होऊन जातो.

## पक्ष्यांचा मोसम

पावसाळयानंतर लगेचच पक्षी निरिक्षणाचा हंगाम सुरू होतो. हिमालय आणि त्यापलीकडील प्रदेशातून शेकडो मैल प्रवास करून येणारे स्थलांतरित पक्षी सप्टेंबरच्या सुरुवातीला या उद्यानात यायला लहागतात. या आगमनाच्या सुरुवातीला येणा-या काही पक्षांपैकी एक म्हणजे खाटिक कुलातील लाँग टेल्ड श्राईक (Long-Tailed Shrike) विहार व तुलसी जलाशयांच्या भोवतालच्या खुरटया झुडपांमध्ये स्थिरावतात. ऑक्टोबरमध्ये हा पक्ष्यांचा लोंढा विस्तारतो आणि १०० हून अधिक पक्षिगण हया उद्यानात येतात. गाणारा ब्ल्यू रॉक थ्रश (Blue Rock Thrush), कॉमन स्टोनचॅट (Common Stonechat), ब्लॅक रेडस्टार्ट (Black Redstart), कॉमन हूपो (Common Hoopoe), नीलग्रीव (Blue Throat) हे पक्षी विहार जलाशयाच्या परिसरात दिसतात. शेपटया नाचवणाऱ्या काही पक्षांचा थवा पाणवठयाच्या बाजूला बसलेला दिसतो. तसेच कबुतरांच्या वंशातले फिजंट टेल्ड जकाना (Pheasant-Tailed Jacana) हेसुध्दा येथे दिसतात.





कधी-कधी ब्राँझ विंग्ड जकाना (The Bronze-Winged Jacana), पर्पल स्वॅम्पहेन (Purple Swamphen), लिटिल कॉर्मोरंट (Little Cormorant), परपल हेरॉन (Purple Heron), ग्रे हेरॉन (Grey Heron), इग्रेट (Egrets), सँडपाइपर्स (Sandpipers), एशियन ओपनबिल्स (Asian Openbills), पेंटेड स्टॉर्कस (Painted Storks) आणि ब्लॅक हेडेड आयबिस (Black-Headed Ibis) हे पक्षी खोल पाण्यात मासेमारी करताना दिसतात. हिवाळयात सकाळी पाणकोंबडया तलावाच्या काठावर येतात. प्रत्येक दिवशी त्यांच्या संख्येत बदल होतो. एखाद्या सकाळी शेकडोंनी पक्ष्यांचा घोळका दिसतो, तर काही दिवसांनी क्वचितच एखादा पक्षी दिसतो. तुलसी आणि विहार सरोवरे ही कदाचित या फिरस्त्या पक्षांचा एखादा विसावा असावा. मांसाहारी पक्षीदेखील या ठिकाणाला वारंवार भेट देतात.

Oriental Honey-Buzzard ची गुणगुण आणि सर्पगरुडाची (Crested Serpent Eagle) लांबलचक, बारीक शीळ शेजारच्या डोंगरातून घुमलेली आपणास नेहमी ऐकू येईल. ब्लॅक शोल्डर्ड काईट (Black-Shouldered Kite), ब्राम्हणी मैना (Brahminy Kite), काळी मैना (Black Kite), युरेशियन मार्श हॅरिअर (Eurasian

Marsh Harrier), आणि एखादा राखाडी डोक्याचा मत्स्य गरुड (Grey-Headed Fish Eagle) खालून उडताना दिसतील तर व्हाईट बेलीड सी ईगल (White-Bellied Sea Eagle), बूटेड ईगल (Booted Eagle) आकाशात उंच भरा-या मारताना दिसतील. वसईची खाडी समुद्रगरुडांना साद घालते. क्वचित ससाणेही या खाडीकडे आकर्षित होतात. शाहीन बहिरी ससाणे डोकयावरून उडत कान्हेरीच्या टेकडीवरील त्यांच्या खानावळीत जाताना दिसतील. एखादया हिवाळयात लॅगर बहिरी ससाणेच आपले पंख फडफडवत तलावावर विहार करताना दिसतील. ससाण्यांच्या जोड्या आपला हिवाळा तुळशी सरोवराच्या शांत पाण्याच्या सान्निध्यात व्यतीत करताना दिसतात आणि आपल्या शिकारीत गुंग राहतात.

### मोठे शिकारी प्राणी

उन्हाळ्याच्या वैराण जंगलात एखादे भेकर (Barking Deer) माणसांच्या पावलांच्या आवाजाने धूम ठोकतना दिसेल किंवा एखादे सांबर विस्फारलेल्या डोळयांनी त्यांच्या केकारवाचा अंदाज घेताना आढळेल. चकवा देणारे चौसिंगासुध्दा तुलसी तवालाच्या सभोवताली दिसेल. हरणं, माकडं, ससे आणि कधी-कधी रानडुकरेही या क्षेत्रात दिसतात अथवा त्यांच्या असण्याची जाणीव करून देणाऱ्या खुणा जागोजागी दिसतात.

बऱ्याचदा उन्हाळयाच्या दिवसात निस्तेज अशा झाडाझुडपांत हे प्राणी राहतात तरी कसे? असा प्रश्न आपल्या मनात उमटतो. गेल्या काही वर्षात वनविभागाने जागोजागी पाण्यासाठी खड्डे खोदलेले आहेत आणि गेली २ वर्षे त्यात बाहेरूनही पाणी भरण्याची व्यवस्था केलेली आहे. कान्हेरीच्या खालच्या अंगाला असलेल्या फणसाचे पाणी नामक पाणवठयात भर उन्हाळयांतही पाण्याची उपलब्धता केलेली आहे आणि तिथे ब-याच वेळेला बिबटयांच्या पावलांचे ठसे तसेच सांबर




किंवा रानडुकरांनी उकरलेली माती दिसून येते.

### जंगल संपत्ती

पश्चिम घाटात वसलेल्या या उद्यानाचे अस्सल सौंदर्य हे त्यातल्या जंगलसंपत्तीत आहे. या जंगलात पानझडी तसेच सदाहरित अशा दोन्ही प्रकारची वृक्षसंपदा सापडते. बोरिवली, थेऊर, नागला या भागातील सुमारे २०० वनस्पतींच्या जातींचा अभ्यास झालेला आहे. त्यातील काहीचा त्यांच्या सौंदर्यासाठी, उपयोगासाठी, पर्यावरणीय आणि औषधी महत्त्वासाठी उल्लेख करणे अपरिहार्य आहे. येथील वनस्पतीत वृक्ष, झुडपे आणि वेलींचा समावेश होतो. झाडेझुडपे जरी वर्षभर येथेच सापडतात, तरी छोटया वनस्पती मात्र पावसाळ्यातच उगवतात आणि पाऊस संपल्याबरोबर नाहीशा होतात.

पाऊस सुरु होण्याच्या वेळेला किंवा त्याच्याहीआधी जूनपासून किंवा वळवाच्या पावसापासूनच गवत यायला सुरुवात होते आणि त्यांचा हिरवागार गालिचा पसरायला लागतो. टवटवीत अशा गुलाबी तुतारीसारख्या 'लिली' जादू केल्यासारख्या डोकावतात पण पावसाच्या सुरुवातीच्या दिवसातच गायब होतात. त्यांच्या मागोमाग



जंगली हळदीच्या गुलाबी पांढऱ्या फुलांचे घोस दिसू लागतात. पावसानंतरचे ४ महिने वेगवेगळया फुलझाडांमुळे हे उद्यान सौंदर्याच्या खाणीसारखेच दिसू लागते. मलबार ग्लोरी लिली (Malabar Glory Lilly), गार्डन बालसम (Garden Balsam), लाजाळू (Smithies), तीळ-कॉमेलिना (Commelina), कोस्टस (Costus) येथे आढळतात. सप्टेंबरच्या शेवटी असंख्य ऑर्किडस् पठारी भागात फुललेली दिसतात. त्यामुळे वनस्पतिसृष्टीतील सलग बदल एकाचवेळी दिसून येतो. त्यात बालसम पासून ते हळव्या लाजाळू व तीळापर्यंत (Silver-Spiked Cockscomb or Sesame) असंख्य वनस्पती दिसून येतात.



वृक्षराजीमध्ये प्रामुख्याने लाकूड कामासाठी वापरला जाणारा साग पावसाळयात जेव्हा त्याला बहर येतो तेव्हा तो झगमगणाऱ्या



पांढऱ्या फुलांनी भरून जाते. बहावा (Indian Laburnum) आपल्या हिरवाईने व सुंदर अशा पिवळया फुलांच्या घोसांनी उन्हाळयात आपले स्वागत करतो. लवकरच त्याची हिरव्या कांडीसारखी फळे दिसू लागतात आणि पिकल्यावर ती तपकिरी रंगाची होतात. पळसाला गडद हिरवी पाने येतात. तर उन्हाळयात तोच पळस गडद केशरी रंगाने उजळून निघतो. या रंगांनी सर्व जंगलच आगीच्या ज्वाळांनी पेटलेले दिसते. त्यामुळेच त्याला 'जंगलातल्या ज्वालेची' (Flame of the Forest) उपमा दिली जाते. हिरव्या पार्श्वभूमीवरच्या लाल चोचींच्या फुलांमध्ये त्याची तुलना पोपटाशीही केली जाते. त्यातून संस्कृतमध्ये त्याला 'किंशुक' असे नाव प्राप्त झाले आहे. याचीच नातलग म्हणले महाकाय अशी 'लिआना' नावाची वेल, जी ब-याची ठिकाणी पाहायला मिळते. ती पळस-वेल या नावानेही ओळखली जाते. 'उक्षी' ही अजून एक महाकाय अशी वेल सापडते ज्यामुळे जमिनीतील मोठया पाण्याच्या स्तराची खात्री पटते. श्रीखंड वा बासुंदीची लज्जत वाढविण्यासाठी वापरतात ती 'चारोळी' ही इथे सापडणाऱ्या झाडांच्या फळापासून मिळवली जाते. आसन नावाच्या झाडाला छोटी चांदणीच्या आकाराची फुले येतात. 'कोशिंब' वा 'कुसुम' किंवा लाखेच्या

झाडाला ठळक अशा किरमिजी रंगाची पाने असतात. हे झाड लाखेच्या किड्यांचे आश्रयस्थान आहे. 'शिरिष' या राजेशाही झाडाला सूंदर, नाजूक फुलांचे घोस लगडतात. लाकूडकामाचे एक महत्त्वाचे लाकूड शिसम वा शिसव (Rosewood) या भागात सापडते. सोने म्हणून वाटले जाणारे 'आपटा' आणि त्याचाच भाऊ 'कांचन' आपल्याला दस-याची आठवण करून देतात. 'काटेसावर' नावाचे रेशमी कापूस देणारे काटेरी झाडही इथे सापडते.त्याची पाने पूर्णपणे झडल्यावर त्याला मोठया आकाराची दिखाऊ, भडक रंगाची लाल फुले येतात. रेशमी कापसाच्या छत्रीसारखे या झाडाचे बी लांब अंतरापर्यंत वाहून नेले जाते. गदेच्या आकाराचे, पिवळया फुलांचे, अत्यंत सुंदर पाने असलेले 'हेद' किंवा 'हळदू' हे एक भक्कम उंच झाड इथे खूप ठिकाणी दृष्टीस पडते. अजून एक व्यावसायिक महत्त्वाचे झाड म्हणजे 'मोहा'. याची फुले आंबवून 'महुवा' नावाची दारू तयार केली जाते. याच्या बियांपासून केलेले तेल आदिवासी आपल्या अन्नात आणि दिव्यासाठी वापरतात.याच्या ज्वलनाने काजळी निर्माण होत नाही. इथे सर्वत्र सापडणारे 'ऐनाचे' झाड श्रावण महिन्यात धार्मिक कार्यासाठी मोठ्या प्रमाणावर वापरले जाते.



काही तुरळक ठिकाणी, फांद्यांच्या टोकाला नाजूक लाल फुले असलेली 'बेहडयाची' झाडे सापडतात. हळदू सारखेच सुंदर पर्णसंभार असलेले आणि पिवळया फुलांचा घोस असलेले 'कळंब' हे अजून एक झाड आपल्या विस्तीर्ण आणि पंखांसारख्या आकाराने लक्ष वेधून येते. 'टेटू' ची घंटाकृती फुले सूर्यास्ताला उगवतात आणि त्यांचे परागीभवन वटवाघळांमार्फत होते. त्याच्या शेंगा मोठया आणि तलवारीच्या आकारच्या असतात. 'ताड (Toddy Palm)', 'शिंदी (phoenix)' उजाड भागात आपले अस्तित्व दाखवून जातात. दरम्यान बोर आणि करवंदाच्या दाट जाळयांकडे तुम्हाला दुर्लक्ष करता येत नाही कारण अनेक ठिकाणी त्याची आंबटगोड फळे आपणास चाखायला मिळतात. पांढऱ्या सुवासिक फुलांचे 'कुडा', जांभळया होणाऱ्या सुंदर लाल फुलांची 'मुरुडशेंग' आणि 'वावडिंग' यांनी या जंगलाचे निव्वळ वैविध्यच वाढवले नाही तर जंगलाचे महत्त्व देखील वाढवले आहे.



पाऊस येताच सर्व उद्यानात पेवाचे (Spiral Ginger) गालिचे अंथरले जातात. त्याची पाने गोल गुंडाळीसारखी असून पानांच्या बेचक्यात त्याची पांढरी फुले बहरतात. 'रानमका (Fox Tears)' नावाचे एक उंच वाढणारे गवत सर्व पाणथळ जागी दिसून येते. 'कावळा' नावाच्या स्पर्शसंवेदक गवतात थंडावा निर्माण करणारे गुणधर्म असतात. सुंदर फुलांची 'रानहळद', सजावटीसाठी वापरले जाणारे रुपेरी गुलाबी फुलांचे 'कुर्डू' यांनी उद्यानाचे सौंदर्य खुलते. आपल्या केसाळ पानातून दरवळणाऱ्या उग्र



वासातून 'रानतुळस' आपली आठवण करून देते.

कुजणा-या पालापाचोळयावर अनेकविध प्रकारचे कवक आणि भूछत्र्यांचे प्रकार उगवतात ज्यामुळे या उद्यानातील जैविक समृद्धी अधिक व्यापक होते. वानगीदाखल म्हणून ब्रॅकेट फंगी (Bracket Fungi) व शटल कॉक फंगी (Shuttle Cock Fungi) ही उदाहरणे देता येतील. यांच्यामुळे जीवनसत्वांचा पुनर्वापर होतो तसेच जमिनीचा कसही वाढायला मदत होते.

साध्या शब्दात सांगायचे तर 'संजय गांधी राष्ट्रीय उद्यान' हे एक अवाढव्य निसर्गाचे एक छोटे रूपच भासते. म्हणून हे उद्यान सांभाळण्यासाठी मोठ्या प्रमाणावर येथे प्रयत्न केले जात आहे. अतिक्रमण हटवण्यापासून ते वनवणवा रोखणे, वन गुन्हे होऊ नयेत म्हणून दिवसरात्र गस्त घालणे याच्याबरोबरच व्याघ्र व सिंह विहार अबाधितपणे चालू ठेवणे



यासाठी येथील कर्मचारी व अधिकारी रात्रंदिवस व्यग्र असतात.

**उद्यानातील आदीवासी पाडे**

मुंबई हे जगातले असे एकच महानगर असेल की ज्यात आदिवासी लोक नैसर्गिक वातावरणात त्यांच्या पाडयात राहत असतील. हे उद्यान जे मुंबापुरीचे फुफ्फुस म्हणून ओळखले जाते, ते केवळ चितळ, बिबटे आणि इतर प्राणी-पक्ष्यांचे माहेरघर नाही तर येथील आदिवासींचेही आश्रयस्थान आहे. या उद्यानात सुमारे ४३ पाडे आहेत. वारली, कोकणा, महादेव कोळी आणि कातकरी या त्यातल्या काही प्रमुख जमाती आहेत. त्यांच्याही जीवनाला महानगरी आयुष्याचा स्पर्श होऊ लागला आहे. काही मर्यादेपर्यंत त्यांनी आपापले रीतीरिवाज जपले आहेत. ते त्यांच्या पूर्वजांची, निसर्गाची आणि प्रतिकांची पूजा करतात. त्यांच्या खुणा त्यांच्या आसपासच घुटमळतात. त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी त्यांना आता या उद्यानातून बाहेर पडून नवी ओळख शोधायची आहे व त्यासाठी उद्यान प्रशासन त्यांची मदत करणार आहे.



अशा या संपन्न व अत्यंत ताणाखाली टिकून असलेल्या राष्ट्रीय उद्यानाला आपल्या सर्वांच्या मदतीची गरज आहे. ग्राम परिसर विकास कार्यक्रमांतर्गत स्थानिकांची मदत घेणे सुरू आहेच पण आपणही सर्वांनी या उद्यानास भेट देऊन त्याच्या भल्यासाठी प्रयत्न करणे व मदत करणे ही आजच्या काळाची किंबहुना पूर्ण मुंबईची गरज आहे.

(सुनील लिमये आणि रंजन देसाई यांनी लिहिलेला मूळ इंग्रजी लेख. मराठी शब्दांकन : विनायक गोगटे)

# परिवर्तनाचा सुसंवाद



महिलांशी संवाद साधताना राज्यमंत्री फौजिया खान.

**समाजाच्या विकासासाठी शासनाचे विविध विभाग अनेक योजना राबवत असतात. या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी जनजागृती आणि या योजनांचा आपल्याला लाभ होऊ शकतो, असा विश्वास निर्माण करणारा लोकसहभाग फार आवश्यक ठरतो. हे लक्षात घेऊन महिला व बालविकास सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण राज्यमंत्री प्रा. फौजिया खान यांनी परभणी जिल्ह्यात आरोग्य, शिक्षण, पोषण-जनजागरण व जनसंवाद मोहीम २०१३ पासून सुरू केली आहे. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानास जनतेने जसा प्रचंड प्रतिसाद दिला होता, तसाच या मोहिमेस मिळत आहे.**

परभणी जिल्ह्यात राज्यमंत्री फौजिया खान यांच्या प्रेरणेने वैशिष्ट्यपूर्ण जनजागरण व जनसंवाद मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत शासनाच्या विविध विकास योजनांविषयी थेट जनतेशी त्यांच्या गावात जाऊन सुसंवाद साधण्यात येत आहे. या मोहिमेत जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, महिला व बालकल्याण विभाग, सामान्य रुग्णालये, जिल्हा माहिती कार्यालय तसेच औरंगाबादचे क्षेत्रीय प्रचार कार्यालय सहभागी झाले आहे. या मोहिमेचा शुभारंभ प्रजासत्ताक दिनाच्या मुहूर्तावर झरी येथे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महसूल राज्यमंत्री प्रकाश सोळंके यांच्या हस्ते झाला. जिल्ह्यातील परभणी, जिंतूर, गंगाखेड, पाथरी, पालम, पूर्णा, सेलू, सोनपेठ व मानवत अशा

**राजेंद्र सरग**

९ तालुक्यांतील १८८ गावांत ही मोहीम राबविण्यात येत आहे.

राज्यमंत्री प्रा. फौजिया खान या प्रशासकीय अधिका-यांसह निश्चित केलेल्या गावांमध्ये जाऊन जनतेशी संवाद साधतात. मंत्रालयातून घेण्यात आलेल्या निर्णयांचा लाभ प्रत्यक्ष जनतेपर्यंत किती पोहोचतो, योजनांचा लाभ खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतो का, याचीही पाहणी यानिमित्ताने होत आहे. जनसंवाद कार्यक्रमास सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहतात. गावात सोयीच्या ठिकाणी एक मोठा तंबू टाकलेला असतो. पूर्वप्रसिध्दी झालेली असल्याने गांवकरी तेथे जमलेले असतात, त्यामध्ये विद्यार्थी व महिलांची संख्या मोठी असते. तत्पूर्वी प्राथमिक आरोग्य केंद्र, अंगणवाडी व शाळांची पाहणी करण्यात येते. यापूर्वी झालेल्या सर्वेक्षणातील बाबींची पडताळणी केली जाते. मुख्य सभामंडपात स्वागतसमारंभात वेळ न दवडता जनसंवाद

मोहिमेची पार्श्वभूमी सांगितली जाते. जनसंवादाचा कार्यक्रम सुरू झाल्यानंतर गावक-यांच्या प्रश्नांवर होणारी कार्यवाही पाहून समाधानाची भावना गावक-यांत दिसून येते. अनेक गावांतील बहुसंख्य समस्या सारख्याच असतात.

गंभीर आजारांवर शासनाकडून मोफत उपचार तसेच काही आर्थिक मदत असते का, अशीही विचारणा अनेकदा होते. शिक्षणविषयक प्रश्न विद्यार्थी तर अवैध दारू विक्रीचा प्रश्न महिलांकडून आवर्जून उपस्थित होतो. ग्रामीण भागात दारुबंदी होणे किती आवश्यक आहे, हे महिलांचे अनुभव ऐकल्यानंतर लक्षात येते. गावक-यांच्या प्रश्नांना उपस्थित अधिकारी योग्य उत्तरे देतात. संपूर्ण जिल्हा प्रशासन हजर असल्याने अधिकारी-कर्मचाऱ्यांना थातूरमातूर उत्तरे देता येत नाहीत. एखादा अधिकारी चुकीची माहिती देत असेल तर गावकरी त्यातील वस्तुस्थिती जाहिरपणे मांडत असतात. त्यामुळे अनेक प्रश्न तात्काळ मार्गी लागण्यास मदत होते. शासनाच्या एखाद्या योजनेचा लाभ झाल्यास त्याबद्दल आवर्जून सांगून अधिका-यांचा उत्साह वाढविणारे गावकरीही अनेक कार्यक्रमात दिसतात.

मोहिमेसाठी खासदार, सर्व आमदार, सर्व लोकप्रतिनिधी पत्रकार संघटना, वकील संघटना, इंडियन मेडीकल असोसिएशन, शिक्षणतज्ज्ञ, परिवर्तन प्रकल्प आदींचा उत्स्फूर्तपणे सहभाग लाभला आहे. या मोहिमेमध्ये लोकसहभागातून स्वच्छता कार्यक्रम राबविणे, शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य व शैक्षणिक दिंडी, वृक्षारोपण, आरोग्य व शिक्षणविषयक प्रदर्शन, भित्तिपत्रके, होर्डिंग्ज कलापथकाच्या माध्यमातून जनजागृती, प्रबोधनात्मक कार्यक्रम व किशोरवयीन मुलींना आरोग्य शिक्षण व पोषण आहारासंबंधी मार्गदर्शन, आरोग्यशिक्षण व पोषणविषयक माहितीपटाचे आयोजन करण्यात आले. प्रबोधनविषयक कार्यक्रमामध्ये साथीचे रोग स्वच्छता व पर्यावरण सामाजिक आरोग्य आदींचा समावेश करण्यात आला आहे. गावपातळीवर प्राथमिक आरोग्य केंद्र शाळा, अंगणवाड्यांची स्थिती नेमकी कशी आहे, त्यात सुधारणा करण्यासाठी काय उपाययोजना करावयास हव्यात हेही या मोहिमेमुळे लक्षात आले.

जीवनमान उंचावण्यासाठी आरोग्य, शिक्षण आणि पोषण या तीन मूलभूत गोष्टी असतात. या मोहिमेमुळे जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक वाढण्यास मदत होऊ शकते. मोहिमेनिमित्त प्राथमिक आरोग्यकेंद्र, अंगणवाडी व शाळांची पहाणी करण्यात येते. कार्यक्रमात मोहिमेच्या जनजागृतीसाठी व व्यापक प्रसिध्दीसाठी शालेय स्तरावर घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, सुदृढ बालक स्पर्धेतील बालक व माता, दोन मुलींवर शस्त्रक्रिया करणाऱ्या जोडप्यांचा, पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया करणाऱ्या पुरुषांचा गौरव, नेत्रदानाचा संकल्प करणाऱ्या तसेच देहदानाचा संकल्प करणा-यांचाही सन्मान करण्यात येतो. रक्तदान शिबिराचे आयोजन करून रक्तदानाची चळवळ जिल्ह्यात या निमित्ताने सुरू करण्यात आली आहे. परिवर्तन प्रकल्पांतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या बचतगटाच्या सदस्यांचाही गौरव करण्यात येतो. कार्यक्रमात अपंग सहायता निधी, मानव विकास योजनेंतर्गत बुडीत मजुरी योजना निधींचे वाटपही करण्यात येते.

प्रबोधन कार्यक्रमात कोरड्या दिवसाचे महत्त्व, परिसर स्वच्छता, शोष खड्डा, डास उत्पत्ती स्थान त्याबाबत करावयाची कार्यवाही, शुध्द पाण्याचे महत्त्व, जलशुद्धीकरणाची पध्दती, वैयक्तिक स्वच्छता (केसांची स्वच्छता, नखे काढणे, हात धुणे, दररोज स्नान करणे, दातांची निगा राखणे), घरगुती क्षार संजीवनी, शौचालयाचे महत्त्व, केरकच-याची विल्हेवाट, निर्मल ग्राम अभियान, वृक्षारोपणाचे महत्त्व, पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना, जागतिक तापमान वाढ, सुरक्षित प्रसूतीचे महत्त्व, संस्थेतील बाळंतपण, जननी शिशू सुरक्षा, स्त्री जन्माचे स्वागत, स्त्री भ्रूण हत्या, गर्भलिंग निदान कायदा, हुंडाबळी, स्त्रियांचे हक्क व अधिकार, कौटुंबिक हिंसाचार कायदा, महिला स्वसंरक्षण, तंबाखू, गुटखा, दारू यांचे दुष्परिणाम, लैंगिक आजाराबाबत माहिती व एड्सबाबत मार्गदर्शन, क्षयरोग लक्षणे, तपासण्या व उपचार, कुष्ठरोग, मोतिबिंदू शस्त्रक्रिया, कर्णबधिरता, रक्तदान, देहदान, नेत्रदान, मानसिक आरोग्य कार्यक्रम, जीवनदायी आरोग्य योजना, शालेय आरोग्य तपासणी, बालकांच्या मोफत शिक्षणाचा अधिकार, आनंददायी शिक्षण यांची माहिती दिली जाते.

मोहिमेमुळे शासकीय अधिकारी, कर्मचारी आणि जनता नव्या जोमाने कामाला लागली.




आरोग्य, शिक्षण, पोषण-प्रबोधन शिबिर, परभणी.

मंत्री गावात येणार असल्याने उत्स्फूर्तपणे स्वच्छता दिंडी, आरोग्य दिंडी काढून जनजागृती केली जाते. गावागावात स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली. शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय यांची डागडुजी, रंगरंगोटी करण्यात आली. गावातील स्वच्छता पाहून गाव करील ते राव काय करील, हेच या मोहिमेचे फलित म्हणता येईल.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानचे प्रकल्प संचालक डॉ. विकास खारगे यांनी जनसंवाद मोहिमेचा उपक्रम राज्यात आदर्श निर्माण करणारा असल्याचे गौरवोद्गार काढले.

**आरोग्य आपल्या दारी**

जनतेला आरोग्यविषयक सेवा वेळेवर मिळाव्यात यासाठी राज्यमंत्री फौजिया खान यांच्या मार्गदर्शनाखाली परभणी जिल्ह्यात

## गरीब मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी

मॅडम, मी गरीब आहे, मला वडील नाही, आईच माझ्या शिक्षणाचा खर्च उचलते, मी सध्या आठवीत आहे. खर्च पेलणे शक्य न झाल्यानं मला शिक्षण अर्धवट सोडावं लागंल... अशी व्यथा एका विद्यार्थिनीनं मांडली. तिच्या डोळ्यातील अश्रू पाहून उपस्थितांची मनं हेलावली. दुस-याच क्षणी राज्यमंत्री प्रा. फौजिया खान यांनी या मुलीच्या शैक्षणिक खर्चाची जबाबदारी उचलणार असल्याचं जाहीर केलं.

ऊर अभिमानानं भरुन येणारी ही घटना घडली. आरोग्य, शिक्षण, पोषण जनजागरण व जनसंवाद मोहीम कार्यक्रमात. ठिकाण होतं गंगाखेड तालुक्यातील महातपुरी हे गाव आणि मुलीचं नाव आहे भाग्यश्री वाघमारे. या कार्यक्रमात भाग्यश्रीने आर्थिक परिस्थिती कथन केली. गरिबीमुळं शिक्षण अर्धवट टाकण्याची कल्पना स्वत: शिक्षिका असलेल्या राज्यमंत्री प्रा. खान यांना अस्वस्थ करुन गेली आणि त्यांनी त्रिधारा शुगर्सच्या वतीने मुलीच्या शिक्षणाचा खर्च उचलला जाईल, असे जाहिर केले.



ग्रामीण महिलांनादेखील आपली भूमिका मांडण्याची संधी मिळाली.

'आरोग्य आपल्या दारी' हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

राज्यमंत्री प्रा. खान यांनी उपस्थितांसह महातपुरी, हरंगूळ, पडेगाव येथील प्राथमिक उपकेंद्र, अंगणवाडी तसेच शाळांची पाहाणी केली. आरोग्य, शिक्षण, पोषणविषयक प्रदर्शनासही त्यांनी भेट दिली. जनतेशी संवाद साधतांना राज्यमंत्री प्रा. खान यांनी स्त्रियांना आपल्या आहारावर लक्ष केंद्रीत करण्याचे आवाहन केले. ग्रामीण भागातील जनतेने शाळेसाठी लोकसहभागातून संगणक, बेंचेस यासारख्या भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे आवाहन त्यांनी केले.

राज्य शासनामार्फत जननी सुरक्षा योजना प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम सार्वत्रिक लसीकरण, शालेय आरोग्य कार्यक्रम, किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, क्षयरोग नियंत्रण, अंधत्व नियंत्रण, कुष्ठरोग निर्मूलन, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना अशा अनेक योजना गावपातळीपर्यंत राबविल्या जात आहेत.

'सर्वांसाठी आरोग्य' हा जागतिक आरोग्य संघटनेने केलेला संकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी पाथरी तालुक्यातील वाघाळा प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या अधिकारी-कर्मचा-यांनी निर्धार केला आहे. वाघाळा केंद्रांतर्गत येणा-या सर्व गावांमध्ये नियोजित केलेल्या सोमवारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी अंगणवाडी कर्मचारी व आशा स्वयंसेविका जाऊन आरोग्यसेवा उपलब्ध करून देणार आहेत.

'आरोग्य आपल्या दारी' या उपक्रमानुसार नियोजित गावात वैद्यकीय अधिकारी व सर्व कर्मचारी जातील. वैद्यकीय अधिकारी हे अंगणवाडी किंवा उपकेंद्र इमारतीमध्ये औषधीसाठ्यासह उपस्थित राहतील. वैद्यकीय अधिकारी बसलेल्या ठिकाणी आरोग्य प्रदर्शनाचा स्टॉल लावण्यात येईल. प्रदर्शनस्थळी वैद्यकीय अधिकारी ग्रामस्थांचे आरोग्यविषयक बाबींवर प्रबोधन करतील. तसेच किशोरवयीन मुलींना आरोग्यशिक्षण दिले जाईल. सर्व आरोग्य कर्मचा-यांना गावातील गृह भेटीसाठी विभागणी करून देण्यात येईल. गृहभेटीवेळी आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन विविध रुग्णांची पाहाणी करतील. ज्यांना आवश्यक त्यांना वैद्यकीय अधिका-यांकडे तपासणीसाठी पाठवतील. रुग्णांची वैद्यकीय तपासणी करून वैद्यकीय अधिकारी औषधोपचार व सल्ला देतील. प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध असणा-या औषधांचा उपयोग केला जाईल व आवश्यकतेनुसार रुग्णकल्याण समिती औषधीखरेदी करेल.

'आरोग्य आपल्या दारी' या उपक्रमानुसार गृहभेटीच्या सर्वेक्षणाचा नमुना तयार करण्यात आला आहे. त्यामध्ये कुटुंबप्रमुखाचे नाव घरातील एकूण पुरुष व स्त्री, गरोदर माता, स्तनदा माता, संशयित कुष्ठरुग्ण संशयित, मोतिबिंदू तापरुग्ण आदींची माहिती भरण्यात येईल.

सर्व राष्ट्रीय कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यास मदत होईल. आरोग्यविषयक जनजागृती होईल. 'सर्वांसाठी आरोग्य' हे जागतिक आरोग्य संघटनेचे उद्दिष्ट प्रत्यक्ष साधण्यास मदत होईल. जनतेला आरोग्यसेवा देण्याची जबाबदारी आरोग्य विभागावर निश्चितच आहे. पण राज्यमंत्री प्रा. फौजिया खान यांच्या आरोग्य, शिक्षण, पोषण, जनजागरण व जनसंवाद मोहिमेमुळे आरोग्य विभागाचे अधिकारी-कर्मचारी प्रेरित झाले असून त्यांच्यात सेवाभाव निर्माण झाला आहे.

**संपर्क : ९४२३२४५४५६**

वाचू आनंदे

# वनसंपदेचा इतिहास

**चारुशीला बा. चंदनशिवे**

वनसंपदा व वनस्पतींमधील विविधता भारताएवढी जगात इतरत्र आढळत नाही. प्राचीन काळापासूनच वैदिक व महाकाव्यकालीन ऋषींनी वनस्पतीशास्त्राचा सखोल अभ्यास करुन हे शास्त्र प्रगत केले होते. मात्र ज्ञानाचे संकलन करण्याविषयीच्या आपल्या उदासीनवृत्तीमुळे प्राचीन काळापासून मध्ययुगीन काळापर्यंत या क्षेत्रात झालेल्या संशोधनाचा वृत्तांत आज आपणास उपलब्ध नाही. बारावे शतक ते सोळाव्या शतकापर्यंत परचक्रामुळे आलेल्या अस्थिरतेतून इतर शास्त्रांप्रमाणेच वनस्पतीशास्त्राचाही आपणास विसर पडला.

ब्रिटिशांनी मात्र येथील वनस्पतींची वैशिष्ट्ये जाणून घेऊन २०० वर्षांहून अधिक काळ सर्वेक्षणाचे मोठे काम करून भारतीय वनस्पतींच्या संदर्भात प्रचंड ग्रंथसंपदा निर्माण केली. आजही हे ग्रंथ भारतीय वनस्पतींच्या अभ्यासासाठी आधारभूत ठरतात. स्वातंत्र्योत्तरकाळात या सर्वेक्षणाप्रमाणेच नैसर्गिक साधनसंपत्ती संदर्भात झालेले नवनवीन संशोधन नोंदविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या गॅझेटिअर विभागाने १. बॉटनी पार्ट-१, मेडिसिनल प्लँटस् (१९५३), २. बॉटनी पार्ट-२, टिंबर्स (१९५७), ३. बॉटनी पार्ट-३, मिसलेनिअस प्लँटस् (१९६१) आणि ४. बॉटनी ॲण्ड फ्लोरा ऑफ महाराष्ट्र (१९८७) या राज्य गॅझेटिअर्सची निर्मिती केली.

महाराष्ट्राच्या वनसंपदेवर मूलभूत लेखन असलेले हे ग्रंथ इंग्रजीतून होते. मातृभाषेतून हे ज्ञान दिल्यास सामान्य मराठी माणसास या ग्रंथात दिलेली माहिती समजेलच त्याशिवाय वनस्पती व कृषी अभ्यासक, संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी यांनासुध्दा याचा लाभ मिळेल. या हेतूने या गॅझेटिअर्सची मराठी आवृत्ती काढण्याचे काम दर्शनिका विभागाने हाती घेतले. त्यानुसार सन १९५३ साली डॉ.एस.पी.आघारकर यांनी लिहिलेल्या मबॉटनी - मेडिसिनल प्लँटस्फ या ग्रंथाचे सन २००३ मध्ये औषधी वनस्पती या नावाने सुधारित मराठी पुनर्मुद्रण करण्यात आले तर सन १९८७ मध्ये बॉटनी ॲण्ड फ्लोरा ऑफ महाराष्ट्र या टी. एस. महाबळे लिखित ग्रंथाची 'महाराष्ट्रातील वनस्पतीशास्त्र आणि वनसंपदा' ही सुधारित मराठी आवृत्ती २००६ मध्ये प्रकाशित करण्यात आली. मूळ इंग्रजी गॅझेटिअरचे हे फक्त मराठी भाषांतर नाही. महाराष्ट्राच्या भौगोलिक मर्यादेत वनस्पतीशास्त्र आणि वनसंपदा या विषयावर झालेले नवीन संशोधन नोंदवून शास्त्रीय पध्दतीने लेखन करण्याचा प्रयत्न यामधून करण्यात आला आहे. डॉ. वासुदेवराव नाईक, निवृत्त प्रपाठक, वनस्पतीशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी या ग्रंथाचे लेखन केले असून ते या क्षेत्रातील ज्येष्ठ अभ्यासक व संशोधक म्हणून प्रसिध्द आहेत.




विषयाची व्याप्ती मोठी असली तरीही, महाराष्ट्र (भौगोलिक रचना), महाराष्ट्रातील वनस्पतीशास्त्राचा इतिहास, वनस्पतींचे वर्गीकरण, महाराष्ट्राची वनसंपदा या चार भागांतून विषयाचे वर्गीकरण करून स्वयंस्पष्ट उपशीर्षांद्वारे मोठ्या प्रमाणात नेटकेपणाने माहिती देण्यात आली आहे.

पहिल्या भागात महाराष्ट्रातील कोकणातील वनश्री, विदर्भातील वनश्री असे भूशास्त्रीय रचनेचा परिचय करुन देऊन विविध भौगोलिक क्षेत्रातील वैशिष्ट्यपूर्ण वनस्पतींची ओळख करुन दिली आहे. वनस्पतीशास्त्राच्या इतिहासातून प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक काळांत या क्षेत्रात भारतीय शास्त्रज्ञांनी केलेल्या कामाचा व ग्रंथ रचनेचा आढावा घेण्यात आला आहे. तिसऱ्या भागात वनस्पतींचे विभाग व गटवार वर्गीकरण करण्याची गरज व उपयोगिता स्पष्ट केली आहे. शेवटचे प्रकरण शास्त्रीय अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असून यामध्ये शैवल, कवक, त्यांचे प्रकार, कवकजन्य विविध रोग, भूछत्रे, संकवक, अनावृत्तबीज वनस्पती, आवृत्तबीज वनस्पती, त्यांचे कुल, मानवी जीवनात होणारा उपयोग व उपलब्धीची ठिकाणे तक्त्यांच्या स्वरूपात दिली आहेत. याशिवाय या क्षेत्रात कार्यरत ब्लॅटर वनस्पती संग्रहालय, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, विविध विद्यापीठे यासारख्या संस्था व त्यांच्या कामाची माहिती देण्यात आली आहे.

ग्रंथामध्ये विविध वनस्पतींची व भौगोलिक वैशिष्ट्यांची छायाचित्रे, महाराष्ट्रातील जंगले, पर्जन्यमान, नद्यांची खोरी, तापमान, महाराष्ट्राचे भूस्तर, मातीचे प्रकार, अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने इत्यादी दर्शविणारे नकाशे, आरेखने यांचाही समावेश करण्यात आला आहे.

भौगालिक वैशिष्ट्ये व पर्यावरणात होणारे बदल यामुळे वनसंपदा सतत बदलत राहील. शहरीकरण आणि औद्योगिकीकरणाच्या रेट्यामुळे आजची वने, सहज उपलब्ध असणाऱ्या वनस्पतीदेखील दुर्मीळ होण्याचा संभव निर्माण झाला आहे. ग्रंथरुपाने का होईना भावी पिढीकरीता त्यांचे जतन करण्याचा प्रयत्न या गॅझेटिअरद्वारे दर्शनिका विभागाने केला आहे.

❐ ❐

## पुस्तक कुठे मिळेल?

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री, प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, मुंबई – ४००००४. दूरध्वनी : २३६३१४३३, २३६३१७९९.

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ.नजीक, पुणे – ४११००१. दूरध्वनी : २६१२५८०८.

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाइन्स, नागपूर – ४४०००१. दूरध्वनी : २५६२६१५.

४. सहायक संचालक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद – ४३१००१. दूरध्वनी : २३३१५२५.

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६००३. दूरध्वनी : २६५०३९५, २६५०४०२.

किंमत : ४१५ रुपये

# साद घालती रानवाटा

भ्रमंती

**महाराष्ट्रातील जंगले जैवविविधतेने ओतप्रोत भरलेली आहेत. प्रत्येक जंगलाचे वेगळे वैशिष्ट्य आणि सौंदर्य वेगळे आहे. ताडोबाच्या जंगलातील वाघाची डरकाळी, मेळघाटातील नद्यांची खळखळ, नवेगावातील पाहुण्या पक्ष्यांचे विहंगम दृष्य, संजय गांधी उद्यानातील शिल्पमय शांतता... निसर्गातली अशी विविध रूपे कवेत घ्यायची असतील तर अरण्यातील एकांताशी सलगी करावी लागेल. रानवाटा तुडवाव्या लागतील. महाराष्ट्राला लाभलेल्या संपन्न अरण्यवैभवाचा वेध...**

## नागझिरा

'निसर्गाला पडलेलं एक सुंदर स्वप्न' म्हणून नागझिऱ्याचा गौरव केला जातो. जंगलात एक तळं असावं, तळ्याकाठी आज्ञाधारक रक्षकांप्रमाणे उभे असणारे सरळसोट बुंध्याचे वृक्ष असावेत, त्या वृक्षांचं प्रतिबिंब तळ्यात पडलेलं असावं, तळ्याच्या काठाकाठानं जाणारी वाट असावी, आजूबाजूला डोंगराच्या रांगा असाव्यात, असं कल्पनेत वाटावं अन् प्रत्यक्षात असावं, असं नागझिऱ्यात आहे. रानात राहून या सर्व सौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठी या अभयारण्यात



आधुनिक दर्जाची निवासगृहे पर्यटकांच्या सेवेसाठी हजर आहेत.

गोंदिया जिल्ह्यातील हे अभयारण्य पानझडी वृक्षाचे आहे. १५३ चौ.कि.मी. इतक्या मोठ्या क्षेत्रावर पसरलेल्या या परिसरावर निसर्गाने सगळे रंग मुक्तहस्ते उधळले आहेत. साग, आंजण, धावडा, ऐन, तिवस, सप्तवर्णी यांचे उंच वृक्ष येथे आढळतात. शिवाय मोहफुले, चार, आवळा, बेहडा, टेंभुर्णी इ. फळझाडेही बघावयास मिळतात. आकाशाला भिडणारी बांबूची बेटेदेखील नजरेस पडतात.

वाघ, बिबटे, रानगवे, चितळ, सांबर, नीलगाय, अस्वल, रानकुत्रे इ. प्राणी इथे मुक्त संचार करतात.

## ताडोबा

चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा हे अभयारण्य वाघ प्रकल्पासाठी प्रसिध्द आहे. ताडोबा अभयारण्यातील वाघांची संख्या ४० पेक्षा अधिक आहे.

ताडोबा हे उष्ण कटिबंधातले शुष्क पानझडीचे जंगल असून वैविध्यपूर्ण वनराईने हा परिसर समृध्द आहे. साग, बिबळा, धावडा, हलदू, गराडी, ऐन, बांबू ह्या वनस्पती इथे आढळतात. वाघ, बिबटे, गवे, अस्वल, रानटी कुत्रे, कोल्हे, सांबर, चितळ, नील गायी, चिंकारा ह्या प्रमुख वन्यश्वापदांचे ताडोबाच्या जंगलात वास्तव्य आहे.


अनेक प्रकरचे गरुड, विशेषत: मच्छिमार गरुड, ससाणे, मोर, रानकोंबड्या, बदके व इतर स्थलांतरित पाणपक्षी, गोड्या पाण्यातील मगरी यामुळे वन्यजीव अभ्यासकांसाठी तर हे जंगल एक पर्वणीच आहे.

**कसे जाल ?**

जवळचे विमानतळ - नागपूर -१५५ कि.मी., जवळचे रेल्वेस्थानक - चंद्रपूर - ४५ कि.मी, रस्ता मार्ग - ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाला चंद्रपूरहून बसेस आणि टॅक्सीने जाता येते.

## नवेगावबांध

गोंदिया जिल्ह्याच्या दक्षिण-पूर्व टोकावरील हे राष्ट्रीय उद्यान अभयारण्य आहे. सुमारे १३४



चौ.कि.मी. क्षेत्रावर पसरलेल्या या अरण्याला १९७५ साली राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित करण्यात आले. नागपूर ते रायपूर या राष्ट्रीय महामार्गावर साकोली हे गाव आहे. येथून ४० किलोमीटर अंतरावर नवेगाव राष्ट्रीय उद्यान आहे.

वन्यप्राणी आणि देशविदेशींचे दुर्मीळ पक्षी या दोहोंसाठी नवेगाव हे हक्काचं आश्रयस्थान आहे. वाघ, बिबट, अस्वल, लांडगा, तरस, उडणारी खार असे मांसाहारी प्राणी तर सांबर, नीलगाय, भेडकी, चौसिंगा इ. तृणभक्षी प्राण्यांचे इथे वास्तव्य आहे. पक्षी निरीक्षण करणाऱ्यांसाठी नवेगाव परिसर हे नंदनवनच आहे. प्रसिद्ध पक्षतज्ज्ञ व लेखक मारुती चित्तमपल्ली यांनी इथल्या पक्षिजीवनाचा सखोल अभ्यास केला आहे. नवेगावबांध सारखा ९०० वर्षांपूर्वीचा पुरातन सरोवर, इथून जवळच असलेला इटियाडोह प्रकल्प, राखीव घनदाट जंगल, जंगलातील पाणझरे तसेच आजूबाजूची तळी व त्याभोवतालची समृद्ध पानगळी व बांबूची वने ही सारी स्थळे म्हणजे पक्षी निरीक्षणासाठी निसर्गाने उभारलेल्या प्रयोगशाळाच आहेत.

हिवाळ्यात नवेगाव सरोवरापाशी अनेक पाहुणे पक्षी वास्तव्यास येतात. इथे सहा महिने राहून उन्हाळ्यात परत आपल्या मातृभूमीकडे प्रस्थान करतात. या पक्ष्यांमध्ये लडाख, तिबेटहून येणारी चक्रवाक बदकं, कच्छच्या रणातून येणारे रोहित, यूरोप, सैबेरियाहून येणारे शेकोटे, उत्तरेकडून येणारे मोटघार, दलदल ससाणा इ. प्रकारच्या अनेक पक्ष्यांचा समावेश होतो. पक्षिनिरीक्षण करण्याकरिता येथील सरोवरामध्ये निरीक्षण कुटी आहे. सरोवरात फिरण्यासाठी नावेची सोय आहे. सरोवरात सुंदर बेटेदेखील आहे.

**कसे जाल?**

जवळचे विमानतळ -नागपूर १४० किमी. जवळचे रेल्वेस्थानक - देवलगाव २

किमी.(चंद्रपूर-गोंदिया रेल्वेमार्ग), रस्ता मार्ग - राष्ट्रीय महामार्ग क्र.६ साकोलीपासून ४० किमी.

## पेंच

मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रातून वाहणाऱ्या पेंच सातपुडा पर्वत रांगेतील नदीच्या तीरावर पेंच राष्ट्रीय उद्यान आकारास आले आहे. पेंच नदी व नदीतील डोहाचा तसेच देवलापार, खापा व रामटेक डोंगराचा व तेथील जंगलाचा समावेश या राष्ट्रीय उद्यानात होतो. १९७५ साली पेंच हे राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित झाले तर १९९९ साली या उद्यानास 'व्याघ्र प्रकल्पाचा' दर्जा देण्यात आला. उष्टकटिबंधीय शुष्क पानगळीच्या वर्गात मोडणारे हे जंगल जैवविविधतेने समृद्ध आहे. २५७ चौ.कि.मी. इतक्या विस्तृत भूप्रदेशावर पसरलेल्या पेंच उद्यानात साग, ऐन, बलागी, बिबळा, तिवस, शिसम, हळदू, कळंब, मोह, टेंभूर्णी, धावडा, बांबू ह्या प्रमुख वनस्पती पहावयास मिळतात.

'गोलिया पहाड' हे ६७० मी. उंचीचे नागपूर जिल्ह्यातील अत्युच्च शिखर उद्यानाच्या पूर्व भागात आहे. या उद्यानातील महत्त्वाचे आकर्षण म्हणून तोतलाडोहचा उल्लेख करावा लागतो. गोड्या पाण्यातील प्राणीजीवनाचा अभ्यास करण्यासाठी देखील हे ठिकाण महत्त्वाचे आहे.

**कसे जाल ?**

जवळचे विमानतळ - (७० किमी)

जवळचे रेल्वेस्थानक - रामटेक (३५ किमी)

रस्ता मार्ग - नागपूर-शिपणी (३० किमी)

## मेळघाट

घनदाट हे विशेषण मेळघाटला चपखल लागू होते. सूर्याच्या किरणालाही महत्प्रयासाने प्रवेश करता यावा, एवढी घनदाट झाडी येथे आहे. खळखळून वाहणाऱ्या इथल्या नद्या सृष्टीचं लोभसवाण रूप दर्शवून जातात. निबिड अरण्याचे सौंदर्य 'याचि देही याचि डोळा' अनुभवायचे असेल तर मेळघाटला पर्याय नाही. मेळघाट व्याघ्रप्रकल्प अमरावतीपासून १०० किलोमीटर अंतरावर आहे. या प्रकल्पामध्ये चिखलदरा आणि धारणी तालुक्यातील वनक्षेत्राचा समावेश होतो. मेळघाटात चार अभयारण्य व एक राष्ट्रीय उद्यान आहे. वान, अंबाबरवा, नरनाळा व मेळघाट ही अभयारण्ये तर गुगामल हे राष्ट्रीय उद्यान मेळघाटच्या सौंदर्यसृष्टीत भर टाकते.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात केवळ वाघच नाहीत तर इतरही प्राणी मोठ्या प्रमाणात आहेत. बिबटे, रानकुत्रे, अस्वल, चितळ, सांबर, उडती खार, चांदी अस्वल, चिवसिंगा,



भेडकी इ. विविध प्राण्यांच्या प्रजाती येथे पाहावयास मिळतात. रानपिंगळा हा अत्यंत दुर्मीळ पक्षीही मेळघाटात आढळतो. त्यामुळे परदेशातील पक्षीप्रेमीही मेळघाटात येतात. सोबत २५० पेक्षा अधिक प्रकारचे इतर या सौंदर्यसृष्टीत भर घालतात. वैविध्यपूर्ण वनस्पतींची उपलब्धता हे देखील मेळघाटाचे वैशिष्ट्य. आर्थिकदृष्ट्या मोलाचे मानले जाणारे सागवान व अनेक वनौषधींचा त्यात समावेश आहे. विविध प्रकारची फुलपाखरे देखील या अरण्याची शोभा वाढवित आहेत.

मेळघाटात वाहनाने फिरण्याकरिता रस्ते आहेत. तसेच पायवाटांनी देखील या ठिकाणचे सौंदर्य लुटता येते. पर्यटकांकरिता वनविभागाने विश्रामगृह, शयनकक्ष तसेच विशेष नैसर्गिक सौंदर्याने युक्त अशा झोपड्यांची व्यवस्था केली आहे.

**कसे जाल ?**

जवळचे विमानतळ - नागपूर - २३० कि.मी.

जवळचे रेल्वेस्थानक - नागपूरहून येणाऱ्यांसाठी बडनेरा तर मुंबईहून येणाऱ्यांसाठी अकोला रेल्वेस्थानक

रस्तामार्ग - अमरावती परतवाडा - १०० कि.मी.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

घनगर्द राई, उंच टेकड्या, वळणदार रानवाटा, रमणीय तलाव आणि महत्त्वाचे म्हणजे प्रसन्न शांतता... मुंबई महानगरी आपल्या अवतीभवतीच आहे. याची पुसटशी जाणीवदेखील आपल्याला होत नाही.

शहरी कोलाहलाचा मागमूसही तुम्हाला इथे सापडणार नाही. निसर्गाच्या सानिध्यातील प्रसन्नतेची अनुभूती घ्यायची असेल तर संजय गांधी राष्ट्रीय उद्यान हा उत्तम पर्याय आहे. मनाला आल्हाद देणाऱ्या सर्व गोष्टी इथे आहेत. इथे घनदाट जंगल आहे. उंच टेकड्या आहेत. वळणदार रानवाटा आहेत. खळाळणारे झरे, रमणीय जलाशय आणि जंगलातील पशु-पक्षी असं सारं काही इथं आहे.

मुंबईतील बोरीवली या उपनगरात हे उद्यान स्थित आहे. ८७ चौ.कि.मी. क्षेत्रफळ असलेल्या या उद्यानाला १९७५ साली राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा मिळाला.

या राष्ट्रीय उद्यानात वाघ, सिंह, बिबटे, चौशिंगा, रानडुक्कर, नीलगाय, चितळ असे प्राणी विपुल प्रमाणात आहेत. पक्ष्यांच्या सुमारे २५० पेक्षा अधिक जाती इथे आढळतात. विशेष म्हणजे या जंगलात वाघाटी ही जगातील सर्वात लहान आणि दुर्मीळ अशी रानमांजर आढळते. 'वनराणी' ट्रेनमधून फिरताना बाळगोपाळांना होणारा आनंद



अवर्णनीय आहे. या मिनी ट्रेनमधून टेकड्यांना वळसा घालून छोटे छोटे पूल, बोगदे आणि हिरव्यागार वनराईची सफर घडविली जाते. येथील सर्वात महत्त्वाचे आकर्षण म्हणजे 'टायगर आणि लायन सफारी' होय. गर्द झाडीतून फिरताना घडणारे वाघ, सिंह या प्राण्यांचे दर्शन रोमांचकारी असते. याच उद्यानाच्या परिसरात सुप्रसिद्ध कान्हेरी गुंफा आहेत. अतिशय प्राचीनतम असलेल्या ही बौद्ध लेणी भारतीय शिल्पकलेचा अतुल्य नमुना आहेत. निबिड अरण्यातील काळ्या पहाडात कोरलेल्या कलाकृती न्याहाळतांना देहभान हरपून जाते.

**कसे जाल ?**

जवळचे विमानतळ -सहारा (२० कि.मी.), सांताक्रूझ (१६ कि.मी.)

जवळचे रेल्वेस्थानक - बोरीवली - छत्रपती शिवाजी टर्मिनस

रस्ता मार्ग- हे उद्यान मुंबईअहमदाबाद या पश्चिम द्रुतगती मार्गावर आहे.

**- टीम लोकराज्य**

# दुर्मीळ खजिना गवसला




**लोकराज्यच्या अंकांचे मोल खूप मोठे आहे. कारण हा महाराष्ट्राच्या वाटचालीचा ऐतिहासिक दस्तऐवज आहे. मात्र ६५ वर्षांच्या दीर्घ परंपरेतील सुरुवातीचे काही अंक उपलब्ध नव्हते. पुणे जिल्ह्यातील धोलवड या छोट्याशा गावी ते उपलब्ध झाले. १९४७ सालापासूनच्या अंकांची स्वगृही परतण्याची ही रंजक कहाणी...**

**किरण केंद्रे**

रविवारचा दिवस होता. त्यादिवशी माझी न्यूज शाखेत सुट्टीच्या दिवशीची ड्यूटी होती. दुपारी साधारण दोन वाजण्याच्या सुमारास लोकराज्य शाखेतला फोन वाजू लागला. सुट्टीच्या दिवशी कोण असेल अशा विचारात थोड्या अनिच्छेनेच फोन घेतला. पलिकडील व्यक्ती बोलू लागली, मी ग्रंथपाल रवींद्र नलावडे बोलतोय, पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील धोलवड या गावातून. मला केंद्रेंशी बोलायचंय. मीच बोलतोय म्हटल्यावर अगदी आनंदात येऊन ते सांगू लागले. अहो काही वर्षापूर्वी मी तुम्हाला बोललो होतो की, आमच्या ग्रंथालयात लोकराज्यचे खूप जुने अंक आहेत. सध्या आम्ही ग्रंथालय नवीन जागेत हलविण्यासाठी सर्व पसारा काढला आहे आणि त्यात लोकराज्यचे खूप जुने अंक आहेत. जुने म्हणजे कोणत्या वर्षाचे अंक आहेत असे विचारल्यावर ते म्हणाले, १९४७, १९५०, १९५२ अशा वर्षाचे अंक आमच्याकडे आहेत. १९४७ हे वर्ष ऐकून मी उडालोच. अरे याच वर्षी तर लोकराज्यची सुरुवात झाली होती. म्हणजे लोकराज्यच्या पहिल्या वर्षाचे अंक! मार्च १९४७ साली लोकराज्य सुरू झाल्याचे ज्ञात आहे. मात्र सुरुवातीच्या काही वर्षांचे अंक उपलब्ध नाहीत. कार्यालय विविध ठिकाणी स्थलांतरित होत असताना मधल्या काळातील काही अंक सापडत नाहीत. मंत्रालयातील केंद्रीय ग्रंथालयात १९५६ पासूनचे अंक उपलब्ध आहेत. मात्र त्यापूर्वीचे अंक नाहीत. लोकराज्यचे प्रारंभिक स्वरूप कसे होते याविषयीचा काही पुरावा नाही. म्हणून १९४७ हे पहिले वर्ष ऐकताच मी रोमांचित झालो. पाठोपाठ मला रवींद्र नलावडेंचे कौतुक वाटले, कारण काही वर्षापूर्वी मी या गावात गेलो होतो. माझा पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये असतानाचा मित्र भूषण राक्षे याचे हे गाव. त्याच्यासोबत त्याच्या गावी गेल्यावर त्याने मला आवर्जून हे ग्रंथालय दाखविले होते आणि तिथल्या पुस्तकांविषयीही सांगितले होते. त्यावेळी ग्रंथपालाशी बोलताना लोकराज्यचा उल्लेख आला असता आमच्या ग्रंथालयात लोकराज्यचे खूप जुने अंक असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र किती जुने ते निश्चित माहीत नव्हते. तरीही जेव्हां केव्हां तुम्ही ग्रंथालय आवराल आणि लोकराज्यचे अंक मिळाले तर संपर्क करा असे सांगून मी तिथून निघालो होतो. आणि आता इतक्या वर्षानंतर तो संदर्भ लक्षात ठेवून ग्रंथपालांनी संपर्क केला होता. मी लगेच रवींद्र नलावडे यांचा मोबाईल नंबर घेतला. त्यांना सर्व अंक वेगळे काढून ठेवण्यास सांगितले आणि हे अंक नेण्यासाठी तुमच्या गावाला नक्की येईन, असे आश्वासन देऊन फोन ठेवला.

लोकराज्यचे १९५६ पासूनचे अंक मी ग्रंथालयात अनेकवेळा चाळले होते. मात्र त्यापेक्षाही जुने प्रारंभीचे अंक मिळणार म्हणून मी जरा जास्तच आनंदात होतो. मनात विचारांची गर्दी जमली होती. लोकराज्यची मोठी परंपरा नजरेसमोर येत होती. लोकराज्य हे केवळ नियतकालिक नाही तर तो आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीचा साक्षीदार आहे. गेल्या सहा दशकात लोकराज्यने खूप काही अनुभवले आहे. देशाच्या स्वातंत्र्याची पहाट संयुक्त महाराष्ट्रासाठी पेटलेला रणसंगर, संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा मंगलकलश, ध्येयासक्त नेत्यांची कारकिर्द, पानशेतचा प्रलय, कोयनेचा भूकंप, याच कोयनेने दिलेल्या विजेची पहिली प्रकाशकिरणे, नव महाराष्ट्राची पायाभरणी, अन्नधान्यात स्वयंपूर्ण करणारी हरितक्रांती, आधुनिक महाराष्ट्र घडविण्यासाठी चाललेली दिग्गजांची धडपड, लातूर-किल्लारीची आपत्ती, कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ, मुंबईतील साखळी बॉम्बस्फोटांपासून दहशतवादी हल्ल्यापर्यंतचा प्रवास तसेच पंचायत राज-सहकार-रोजगार हमी योजना-महिला आरक्षण-माहितीचा अधिकार यांसह विविध क्रांतिकारी निर्णयातून देशात अग्रेसर ठरलेल्या महाराष्ट्राची घोडदौड एकूणच महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इतिहासात अभूतपूर्व ठरलेली सारीच परिवर्तने-आवर्तने लोकराज्यने खूप जवळून अनुभवली आहेत. याच मालिकेतील आणखी काही पाने चाळायला मिळणार या भावनेने मी सुखावून गेलो.

पुणे जिल्ह्यात लोकराज्यचे दुर्मीळ अंक उपलब्ध असल्याची माहिती आमचे महासंचालक श्री.प्रमोद नलावडे व संचालक श्री. प्रल्हाद जाधव यांना सांगितली. त्यांना तर अधिकच आनंद झाला. आता तू लगेचच पुण्याला जाण्याचे नियोजन कर आणि अंक मिळव असे त्यांनी सांगितले. सोबतच पुढील सहकार्यासाठी आमच्या पुणे कार्यालयाला सूचनादेखील केल्या.

२२ फेब्रुवारीला संध्याकाळी पुण्याला पोहचलो. सकाळी लवकर धोलवडला जायचे नियोजन केले. सकाळी आठ वाजता गाडी धोलवडच्या दिशेने निघाली. पुणे-नाशिक महामार्गावर चाकणमार्गे खेड-राजगुरूनगर-मंचर-नारायणगाव-आळेफाटा आणि तिथून ओतूर असा हा प्रवास. धोलवड गाव ओतुरपासून चार किलोमीटर अंतरावर कल्याण-अहमदनगर मार्गावर आहे.

प्रवासात मनात प्रचंड उत्सुकता होती. कसे

असतील लोकराज्यचे प्रारंभीचे अंक? ते सुस्थितीत असतील का? त्याला वाळवी तर लागली नसेल? ते वाचता येतील का? असे अनेक प्रश्न मनात येत होते. दुपारी ११ वाजता आम्ही धोलवडमध्ये पोहोचलो. आधुनिक पद्धतीने केल्या जाणाऱ्या समृद्ध शेतीने नटलेला हा परिसर. जेमतेम ३ हजार लोकवस्तीचे गावही तसेच टुमदार आणि सुंदर. पाहता क्षणीच प्रेमात पडावं असंच. प्रसिद्ध लेखक आणि कार्यकर्ते अनिल अवचट यांच्या 'जगण्यातील काही' या पुस्तकात धोलवड गावचा ओझरता उल्लेख आहे. हे गाव मुख्यत: प्रसिद्ध आहे ते या गावचे ग्रामदैवत असलेल्या मळगंगा देवीसाठी. पुष्पावती नदीच्या काठावरील संगमरवरी बांधकामातील हे मंदिर हजारो लोकांचे श्रद्धास्थान आहे. हे मंदिर वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. खळाळत वाहणारी पुष्पावती आणि काठावरील मळगंगा मंदिर यामुळे हा परिसर पावित्र्याने भारावून गेलेला आहे. देवीच्या दर्शनाला आलेले भाविक, मंदिरातील मंद, मंजुळ घंटानाद आणि हवेच्या सुखद झुळकींमुळे मन प्रसन्न होऊन जाते. दरवर्षी तीन दिवस मळगंगा देवीची भव्य यात्रा भरते. याकाळात पुणे-मुंबई व इतरत्र नोकरी-व्यवसायानिमित्त विखुरलेले धोलवडकर न चुकता हजेरी लावतात.

आम्ही थेट ग्रंथालयात पोहोचलो. ग्रामपंचायतीच्या जुन्या इमारतीत वरच्या मजल्यावर हे ग्रंथालय आहे. ग्रामोन्नती सार्वजनिक मोफत वाचनालय. जुन्या बांधणीची ही दगड आणि लाकडाचा वापर असलेली कौलारू छपराची इमारत मनात ठसणारी आहे. ग्रंथपाल रवींद्र नलावडे वाट पाहत होते. ५० वर्षाचे हे अपंग गृहस्थ. पण उत्साह एखाद्या तरुणाला लाजवणारा. जाताक्षणीच त्यांनी लोकराज्यचा गठ्ठा पुढ्यात टाकला. हळुवार हातांनी पहिला अंक उचलला. माझा माझ्याच डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. लोकराज्य, वर्ष १ ले शनिवार, तारीख २० डिसेंबर १९४७, मुंबई सरकारच्या प्रसिद्धी खात्याचे प्रकाशन, मास्टहेडच्या वरच्या बाजूला 'यतो धर्मस्ततो जय:' तर खालील बाजूस 'बहुजन समाजाच्या कल्याणासाठी झटणारे पत्र' अशा ओळी. ६५ पावसाळे पाहिलेला हा अंक पाहून मी हरखून गेलो. उत्साहाने सर्व अंक चाळू लागलो. त्यापेक्षा जुने नोव्हेंबर, ऑक्टोबर, सप्टेंबरचे अंक मिळाले. त्यांनी मग अजून काही गठ्ठे काढले. त्यात अजून अंक मिळाले. १९४८ साली महात्मा गांधीजींच्या हत्येनंतर त्यांच्या अस्थिकलशाचे नाशिक येथील गोदावरी घाटावर विसर्जन झालेल्या घटनेचे वार्तांकन करणारा अंक भावुक करून गेला. याच अंकात तत्कालीन मुंबई प्रांताचे पंतप्रधान बा.गं. खेर यांचा गांधीजींना श्रद्धांजली वाहणारा हस्तलिखित संदेश आहे. त्यानंतर मग १९५०, १९५२, १९५४, १९५८ या वर्षातील जवळपास १०० अंक मिळाले. (लोकराज्य त्याकाळी साप्ताहिक होते.) त्यातील काही अंक वाळवी लागलेले, जीर्ण झालेले असले तरी बहुतांश अंक सुरक्षित आहेत. इतकी वर्षे अडगळीत राहूनही या अंकांचे मूळ रूप कायम आहे. या सर्व शोधात १९४७ ते १९५८ या काळातील अंक मिळाले. तिथेच बसून त्या अंकांची वर्षवार विभागणी केली. हळुवारपणे त्याची बांधणी केली आणि सर्व गठ्ठे बॅगेत ठेवून दिले.

दुर्मीळ अंक हाती लागले. पण माझ्या मनात एक प्रश्न वारंवार येत होता की, या ग्रंथालयाची स्थापना १९७९ सालची, मग येथे १९४७ सालापासूनचे अंक कसे? या प्रश्नाचे मला मिळालेले उत्तर जितके मनोरंजक तितकेच आश्चर्यकारक आहे. झाले असे की स्वातंत्र्यापूर्वी या परिसरातील बरीच मंडळी कामानिमित्त मुंबईला गेली होती. त्यामध्ये या गावातील सीताराम लक्ष्मण नलावडे उर्फ बापू हे बॉम्बे पोर्ट ट्रस्टमध्ये तर रूख्माजी धोंडिबा मुंढे हे भाऊच्या धक्क्यावर कामाला होते. ते कामगारांचे नेतृत्वही करत असत. त्यांचा तत्कालीन वरिष्ठ कामगार नेत्यांशी चांगला संपर्क होता. वाचनाची मुळातच आवड असलेल्या या कामगारांची ही आवड इथे अधिकच विकसित झाली. विविध वर्तमानपत्रे, मासिके, नियतकालिके ही मंडळी विकत घेऊन वाचू लागली. वेगवेगळ्या अंकाचा संग्रह होत गेला. हे सर्व अंक पेटीत जतन करून ठेवले जात. अशा काही पेट्या जमा झाल्या. त्याला 'पेटी ग्रंथालय' हे नाव पडले. काळ पुढे सरकत गेला. मुंबईसारख्या ठिकाणची जागेची अडचण पाहता ह्या पेट्या ठेवणे जिकिरीचे झाले. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर गावोगावी शाळा उघडू लागल्या. शिक्षणाचे वारे सर्वत्र वाहू लागले. तेव्हा या मंडळींनी विचार केला की, आपल्या गावातील शाळेत जर ही पुस्तके, नियतकालिके पाठविली तर मुलांना त्याचा नक्कीच फायदा होईल. तिथून मग या अनमोल ग्रंथसंपदा असलेल्या पेट्यांचा प्रवास धोलवड गावाकडे सुरू झाला. बरीच वर्षे या ग्रंथांनी शालेय विद्यार्थ्यांची वाचनाची तहान भागविली. पुढे १९७९ साली ग्रामपंचायतीने ग्रंथालय सुरू केले. तेव्हा हे साहित्य ग्रंथालयाकडे आले. तिथे ते उत्तमरीत्या जतन झाले. लोकराज्यचे अंकही जसेच्या तसे राहिले. अशा रीतीने मुंबईहून सुरू झालेल्या अंकाचा प्रवास आता पुन्हा त्याच दिशेने सुरू झाला. एका अर्थाने वर्तूळ पूर्ण झाले आहे.

सर्व अंक हाती पडताच आमचे महासंचालक श्री.प्रमोद नलावडे यांना फोन केला. सर्व वर्णन ऐकून त्यांना अतिशय आनंद झाला. आपण हे अंक योग्यप्रकारे डिजिटाईज्ड रूपात जतन करून ठेवू असे त्यांनी सांगितले. सध्या लोकराज्यचे डिजिटायजेशन सुरू आहे. महासंचालनालयाच्या वेबसाईटच्या माध्यमातून ते आधुनिक रुपात वाचकांना मोफत उपलब्ध करुन दिले जात आहेत. ज्या माणसाने हे अंक जतन करून ठेवले त्यांना मला व्यक्तिश: धन्यवाद द्यायचे आहेत, असेही ते म्हणाले. मग ते ग्रंथपाल नलावडे यांच्याशी ते बोलले. आमचे संचालक श्री.प्रल्हाद जाधव यांना ही बातमी सांगताच त्यांना झालेला आनंद अवर्णनीय होता. त्याचवेळी त्यांनी मला सूचना केली की, त्या लोकांप्रती आपण कृतज्ञता व्यक्त करायला पाहिजे. म्हणून तू त्यांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार कर. लगेच ग्रंथपाल श्री.रवींद्र नलावडे आणि धोलवडचे सरपंच अशोक नलावडे यांचा सत्कार करण्यात आला. गावातली मंडळीदेखील आनंदी होती. आमच्याकडे बरीच वर्ष राहिलेले साहित्य आता योग्य ठिकाणी जात आहे, अशीच सर्वांची भावना होती. अखेर सर्वांचा निरोप घेतला. गाडी पुण्याच्या दिशेने निघाली. येताना मनात आलेल्या अनेक शंका-कुशंकांना पूर्णविराम मिळाला होता. लोकराज्यची दुर्मीळ दौलत घेऊन मी परत चाललो होतो. एखादा माणूस पिशवी भरून सोनं घेऊन जाताना त्याला जो आनंद होत असेल, त्यापेक्षा मला झालेला आनंद नक्कीच कमी नव्हता.


ग्रंथपाल व सरपंचांचा महासंचालनालयाच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

**संपर्क : ७३०३४२८५५५**

# अर्थसंकल्प २०१३ – समृद्धीचे नवे पर्व



**उपमुख्यमंत्री आणि वित्तमंत्री अजित पवार यांनी २० मार्च २०१३ रोजी यंदाचा अर्थसंकल्प सादर केला. महाराष्ट्राच्या सर्वसमावेशक प्रगती आणि समृद्धीसाठी विविध तरतुदी या अर्थसंकल्पात करण्यात आल्या आहेत. त्यांची काही ठळक वैशिष्ट्ये.**

टंचाई निवारण



✻ पाणी टंचाईकरिता ८५० कोटी रुपये.

✻ चारा पुरवठ्यासाठी १८६ कोटी रुपये.

✻ राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीमधून १०५० कोटी रुपये प्रस्तावित.

उद्योग :

✻ औद्योगिक प्रोत्साहन अनुदानासाठी २५०० कोटी रुपये



✻ यंत्रमाग धारकांच्या वीज दरात सवलतीसाठी ९३९ कोटी रुपये.

✻ औद्योगिक क्षेत्रास पूरक पायाभूत सुविधांसाठी १२३ कोटी ११ लाख रुपये.

आरोग्य :


✻ राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेसाठी ३२५ कोटी रुपये.



## राज्याचा आर्थिक आढावा

✻ सन २०१२-१३ मध्ये स्थूल राज्य उत्पन्नात ७.१ टक्के वाढ अपेक्षित.

✻ सन २०११-१२ मध्ये दरडोई राज्य उत्पन्न ९५ हजार ३३९ रुपये.




## राज्य योजना :

✻ राज्याच्या वार्षिक योजनेचे आकारमान ४६ हजार ९३८ कोटी रुपये.

✻ अनुसूचित जाती उपयोजनेसाठी ४ हजार ७८७ कोटी ६८ लाख रुपये.

✻ आदिवासी उपयोजनेसाठी ४ हजार १७७ कोटी ४८ लाख रुपये.

✻ जिल्हा सर्वसाधारण योजनेसाठी ५ हजार २०० कोटी रुपये.

✻ आरोग्य संस्थांचा बृहत आराखडा व बांधकाम ४७७ कोटी ९८ लाख रुपये.

✻ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान ५०० कोटी रुपये.

पाणी पुरवठा व स्वच्छता :

✻ राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमास २०० कोटी रुपये.

✻ ग्रामीण दलित वस्ती पाणीपुरवठा व स्वच्छता ६० कोटी रुपये.

✻ महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानाकरिता १४५ कोटी ४५ लाख रुपये.

पायाभूत सुविधा :

✻ रस्ते विकासासाठी २ हजार ७१६ कोटी ६७ लाख रुपये.

✻ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळासाठी १२० कोटी रुपये.

✻ रस्त्यांच्या चौपदरीकरणाकरिता वर्धनक्षमता तफावत निधी पोटी १७५ कोटी रुपये.

✻ प्रधानमंत्री ग्रामसडक योजना

✻ राज्य हिश्श्यापोटी ६४ कोटी रुपये.

✻ मिहान प्रकल्पासाठी २०० कोटी रुपये.

✻ नविन रेल्वे मार्ग तसेच रेल्वेमार्गाच्या सुधारणेकरिता ६३ कोटी ७२ लाख रुपये. विमानतळ विस्तारीकरण व अद्ययावतीकरणासाठी २४० कोटी ६९ लाख रुपये.



**ऊर्जा :**

✻ महानिर्मितीच्या विविध प्रकल्पांसाठी १ हजार ९०२ कोटी रुपये.

✻ जलविद्युत प्रकल्पांसाठी १९६ कोटी ४७ लाख रुपये.

✻ महावितरणाकरिता शासन भागभांडवल ४०९ कोटी ४२ लाख रुपये.

✻ महापारेषण करिता शासन भागभांडवल ३०० कोटी रुपये.

✻ अपारंपारिक ऊर्जा विकास योजनेसाठी ८० कोटी रुपये.

नगर विकास व गृहनिर्माण :

## शेतकऱ्यांच्या हितासाठी...

✻ शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात कर्जपुरवठा ३४५ कोटी ७५ लाख रुपये.

✻ खतांच्या सुरक्षित साठ्याकरिता ५३ कोटी ५० लाख रुपये.




✻ कृषि विकासाच्या विविध उपक्रमासाठी ७५१ कोटी ४ लाख रुपये.

✻ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी ७८७ कोटी ३९ लाख रुपये.

✻ जलसिंचन प्रकल्पांसाठी ७ हजार २४९ कोटी ७० लाख रुपये.

✻ महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत कालवे व वितरण प्रणाली पुन:स्थापन व
धरणांची सुरक्षा ४०० कोटी रुपये.

**पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्सव्यवसाय क्षेत्र :**

✻ कुक्कुटपालन, शेळीवाटप योजना, कृत्रिम रेतनाद्वारे उत्कृष्ट व




अतिउत्कृष्ट जातीच्या गायीम्हशींची पैदास व आनुवंशिक सुधारणा कार्यक्रम ६८ कोटी रुपये.

✻ गवताळ कुरणांची निर्मिती, चारा बियाणे वाटप, कडबाकुट्टी यंत्राचे वाटप व मुरघास तयार करणे ४३ कोटी ९७ लाख रुपये.

✻ मासेमारी जेट्टींचा विकास करण्यासाठी २५ कोटी रुपये.

✻ मच्छिमारी नौकांचे यांत्रिकीकरण, मासळीची साठवणूक, पणन व वाहतूक ३७ कोटी ६५ लाख रुपये.

✻ जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निर्माण अभियानासाठी १ हजार ६०० कोटी रुपये.

✻ महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महा अभियानासाठी ६५० कोटी रुपये.

✻ नविन व हद्दवाढ झालेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना विशेष अर्थसाहाय्य २० कोटी रुपये.

✻ शहरी गरिबांना मूलभूत सुविधा पुरविणे या योजनेसाठी राज्य हिस्सा २२० कोटी रुपये.

✻ राजीव आवास योजना ४० कोटी रुपये.

### गृह विभाग :

✻ पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाकरिता ३१७ कोटी १७ लाख

✻ राज्यातील कायदा सुव्यवस्था तसेच मुंबई, पुणे व इतर शहरांच्या सुरक्षेसाठी सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्याकरिता १४९ कोटी ७८ लाख रुपये.

### ग्रामीण विकास व पर्यटन :

✻ मागासक्षेत्र अनुदान योजनेकरिता ३०९ कोटी रुपये.



✻ ग्रामीण तीर्थक्षेत्र विकासासाठी २५ कोटी रुपये.

✻ कोकण ग्रामीण पर्यटनासाठी ५० कोटी रुपये.

✻ पर्यटनाच्या पायाभूत सुविधा, तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 'सी-वर्ल्ड' प्रकल्पाच्या भूसंपादनाकरिता २८५ कोटी रुपये.

### नियोजन विभाग :

✻ नागपूर शहरातील ताज-बाग येथील दर्ग्याच्या विकास आराखड्याकरिता २० कोटी रुपये.

✻ वर्धा येथील सेवाग्राम आश्रमाच्या विकास आराखड्यासाठी ३० कोटी रुपये.

### मराठी भाषा विकास :




✻ मराठी भाषा जतन, संवर्धन, दुर्मीळ ग्रथांचे ई-पुस्तक तयार करणे व मराठीसाठी युनिकोड आधारित टंकनिर्मिती करिता १५ कोटी ६० लाख रुपये.

### इमारत बांधकाम :

✻ मध्यवर्ती प्रशासकीय इमारती, शासकीय निवासस्थाने व विविध शासकीय कार्यालये बांधकामासाठी ११८ कोटी ८ लाख रुपये.

✻ जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या प्रशासकीय व निवासी इमारत बांधकामासाठी ५५ कोटी रुपये.

✻ पोलिसांच्या निवासी इमारतीकरिता १०० कोटी ३३ लाख रुपये.

✻ पोलीस ठाणी व कार्यालयीन इमारतीसाठी ८८ कोटी रुपये.

✻ न्यायालयीन इमारती व न्यायाधीशांच्या निवासस्थानांच्या बांधकामासाठी २१३ कोटी ६० लाख रुपये.

✻ शासकीय गोदामांच्या बांधकामासाठी २४ कोटी रुपये. महसूल विभागातील प्रशासकीय व कार्यालयीन इमारतीसाठी १३३ कोटी ६६ लाख रुपये.

### सांस्कृतिक कार्य

✻ ऐतिहासिक वारसा लाभलेली स्मारके तसेच वस्तुसंग्रहालये यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी ३७ कोटी रुपये.

## दुर्बल घटकांना दिलासा

**(अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/अल्पसंख्याक)**



✻ आम आदमी विमा योजनेकरिता ३४ कोटी २९ लाख रुपये.

✻ अनुसूचित जातीच्या कुटुंबांना घरकूल अर्थसाहाय्यासाठी ३२० कोटी रुपये.

✻ आदिवासी आश्रमशाळा, वसतिगृहे व इतर बांधकामासाठी ५०१ कोटी ३८ लाख रुपये.

✻ सुवर्ण महोत्सवी आदिवासी शिष्यवृत्ती योजनेसाठी २०३ कोटी ६८ लाख रुपये.



✻ ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेसाठी २४५ कोटी २३ लाख रुपये.

✻आदिवासी भागातील विद्युतीकरणासाठी ८२ कोटी ८९ लाख रुपये

✻ आदिवासी भागातील आरोग्य विषयक कार्यक्रम २४४ कोटी ३३ लाख रुपये.

✻ अल्प संख्यांकाच्या विकासासाठी २८० कोटी रुपये.

✻ जनश्री विमा योजनेसाठी १२ कोटी रुपये.

## शिक्षण व क्रीडा



✻ सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानासाठी ७११ कोटी ५० लाख रुपये.



✻ मुलींच्या वसतीगृहांसाठी १०० कोटी रुपये.

अनुदान प्राप्त खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतनोत्तर अनुदान २६६ कोटी ८२ लाख रुपये.

✻ संगणक प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता ४५२ कोटी रुपये.


✻ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविण्यासाठी १९३ कोटी रुपये.

✻ राज्याच्या क्रीडा व युवक धोरणासाठी १५० कोटी ८३ लाख रुपये.




✻ दर्जेदार व कार्यक्षम अभियांत्रिकी शिक्षण पद्धतीसाठी ८० कोटी रुपये.

### महिला व बाल विकास



✻ गरोदर स्त्रिया, स्तनदा माता व ० ते ६ वयोगटातील मुलांकरिता पोषण आहारासाठी १ हजार २६४ कोटी ७६ लाख रुपये.

✻ बीड, नांदेड, मुंबई, नाशिक, गडचिरोली, बुलढाणा, कोल्हापूर, सातारा, अमरावती, नागपूर आणि गोंदिया या ११ जिल्ह्यातील ११ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलींच्या सक्षमीकरणासाठी राजीव गांधी सबला योजनेकरिता ११० कोटी ७८ लाख रुपये.



सचखंड गुरुद्वारा

# नांदेड : काल आणि आज

नंदीग्राम हे नाव नांदेडला असो अथवा नसो, हे भरताचं आजोळ असो किंवा नसो नि ते सात हजार वर्षांचं जुनं असो वा नसो; पण ते किमान २ हजार वर्षापूर्वी अस्तित्वात होतं याचे मात्र पुरावे आहेत. वऱ्हाडातील वत्सगुल्म (आजचं वाशीम) येथे सापडलेल्या चौथ्या शतकातील वाकाटक नृपती याने दिलेल्या ताम्रपत्रात गोदावरीच्या इतर तीरावरील नंदीतट हे गाव ब्राह्मणांना अग्रहार म्हणून दान केल्याचा उल्लेख आहे. (अग्रहार म्हणजे जेथे वेद विद्यादान केले जात असे, असे स्थळ किंवा विद्यापीठ) तेव्हा चौथ्या शतकात एवढं विद्याकेंद्र असलेलं नांदेड त्यापूर्वी दोन चारशे वर्षे अस्तित्वात असलं पाहिजे.

सुधाकर डोईफोडे

नांदेड शहर किती प्राचीन आहे? प्रभू रामचंद्रांचा कालखंड इसवीसनापूर्वी ५ हजार वर्षांचा होता असं नुकतच एका ज्योतिर्विज्ञान शास्त्रज्ञानं शोधून काढलं आहे. भरताचं आजोळ नंदीग्राम होतं. भरताचं आजोळ असलेलं नंदीग्राम हेच आजचं नांदेड अशी नांदेडवासीयांची ठाम समजूत आहे. वास्तविक हे भरताचं आजोळ असणं तर सोडाच पण या नगरीचं नाव कधी कधी नंदीग्राम असं होतं असाही पुरावा सापडत नाही. तरीही नंदीग्राम हे नाव लोकांच्या मनात ऐवढं रुतून बसलं आहे की इथे नंदीग्राम हौसिंग सोसायटी, नंदीग्राम मार्केट अशी कितीतरी स्थळं सापडतात. वास्तविक रामाच्या काळी विंध्य पर्वताखाली आर्यांची वसाहत नव्हती. हेच नंदीग्राम भरताचं आजोळ असतं तर किष्किंधेकडे जाताना राम, लक्ष्मण आपल्या भावाच्या आजोळी चहा-पाणी करून पुढे गेले नसते काय, असा गमतीचा विचार लहानपणी माझ्या मनात येत असे.

नांदेड हे शंकराचं वाहन नंदीचं क्षेत्र आहे. एकदा पार्वती रुसून कुठे तरी निघून गेली. तिला शोधण्यासाठी शंकरांनी नंदीला पाठविलं. फिरत फिरत नंदी गोदातटी आला. तिथे असलेल्या उर्वशीवर तो एवढा भाळला की आपले कर्तव्य विसरून इथेच रमला. भगवान शंकरांना हे कळताच ते संतापले. त्यांनी नंदीला शाप दिला आणि त्याला भुलविणाऱ्या अप्सरेलाही शाप दिला की, तू एवढी वाहवलीस, आता कायमची नदी बनून वाहत रहा. तेव्हापासून उर्वशी नदीरुपानं वाहू लागली. गोदा-उर्वशीच्या संगमात स्नान केल्यानंतर नंदीचं पाप फिटलं आणि हे स्थळ नंदीक्षेत्र म्हणून प्रसिद्ध झालं. आज गोदा-उर्वशी संगम ही नांदेड शहराची पश्चिम हद्द आहे.

नांदेड हे २ हजार वर्षांचं प्राचीन असल्यामुळं

इथं धार्मिक बाबींच्या आख्यायिका भरपूर आहेत. उर्वशी तीर्थ ही नांदेडची पश्चिम सीमा तर तारातीर्थ ही पूर्व सीमा होत. जुन्या पुलाजवळ गोदेच्या दक्षिण तीरावर तारातीर्थ आहे. याही स्थळाला आख्यायिका आहेत, पण विस्तारभयास्तव त्या टाळतो. सुमारे ९०० वर्षापूर्वी महात्मा चक्रधर नांदेडीयास आले होते. त्यावेळी ते नांदेड गावाच्या बाजूला भाळेश्वर क्षेत्री नृसिंहाच्या मंदिरात तारातीर्थ सन्मुख बसले होते असा लीळाचरित्रात उल्लेख आहे.

नांदेड हे गोदाक्षेत्रही आहे. ते गोदावरीचे नाभिस्थान आहे. त्यामुळे नाशिक-पैठणच्या बरोबरीने नांदेडचा धर्मक्षेत्र म्हणून उल्लेख होतो. पूर्वी गोदाप्रदक्षिणेची रीत होती. त्र्यंबकेश्वर ते राजमहेंद्री व परत, त्र्यंबकेश्वर ते नांदेड आणि परत तसेच नांदेड पंचक्रोशी अशा तीन प्रकारे ही परिक्रमा होत असे. संत दासगणू महाराजांनी १९३२ साली व त्यांचे शिष्य अनंत महाराज (वरदानंद स्वामी) यांनी १९६८ साली नांदेड ते त्र्यंबकेश्वर आणि त्र्यंबकेश्वर ते नांदेड (शंखतीर्थ) अशा प्रदक्षिणा केल्या. जिथून गोदावरी ओलांडतात त्या शंखतीर्थ क्षेत्री उजव्या वळणाचे शंख सापडतात. जगात फक्त इथेच हे जीव वाढले, परंतु लोकांनी शंखांची एवढी लूट केली की आता ते जवळजवळ नामशेष झाले आहेत.

प्राचीन इतिहासात न रमता इतिहास काळात येऊ. नांदेड हे प्राचीन धर्मक्षेत्र आहे असं म्हटलं खरं, पण प्राचीनत्व सिद्ध करण्याजोगा इथे कोणताही पुरावा नाही. मलिक अंबरच्या स्वारीत नांदेडचा एवढा विध्वंस झाला की इथे २०० ते ४०० वर्षापूर्वीचं एकही मंदिर, वाडा, ग्रंथ शिल्लक राहीला नाही. गाडीपुऱ्यात शहरातील सर्वात मोठं महादेव मंदिर होतं. उग्रमूर्ती नृसिंहही भुयारात लपला आहे. राम मंदिर, कृष्ण मंदिर, गोदा मंदिर ही होळीवरील मंदिरं बाहेरून मंदिर न दिसता वाडे दिसतात.

होळीवर एक त्रिविक्रमाचे मंदिर असल्याचा उल्लेख आहे. इतिहासतज्ज्ञ वि. भा. कोलते यांचे म्हणणे असे की, होळीवर आज सरदेशपांडे यांच्या वाड्यासमोर जे कबरस्थान आहे तिथे हे त्रिविक्रमाचे मंदीर असावे. त्यामुळे नांदेडला 'इतिहास पुसलेलं ऐतिहासिक शहर' असं म्हणणं भाग पडतं. असो,


गोवर्धनघाट पूल

पूर्वी नांदेड हे बीदरच्या अमलाखाली होतं. आजही नांदेडचे जुने लोक दक्षिण दिशा दाखविण्यासाठी 'बेदराकडं' असं म्हणतात. त्यावेळी नांदेडचा समावेश तेलंगणात होत होता व तेलंगण सुभ्याचं मुख्यालय नांदेड हेच होतं. (त्यामुळं नांदेडचं नंदीयाड 'याड' म्हणजे गाव हे तेलगू रूप स्वीकारार्ह वाटतं).

निजामनं इंग्रजांचं मांडलिकत्व स्वीकारल्यावर शांतता निर्माण झाली. १८३५ मध्ये संस्थानात जिल्हा निर्मिती होऊन नांदेड हे जिल्ह्याचं ठिकाण झालं. १९०० मध्ये रेल्वे इथे आली. १९०३ मध्ये लोकमान्य टिळक त्यांचे स्नेही खापर्डे यांच्या चिरंजीवांच्या लग्नासाठी कुबरेला आले होते. ते करखेलीला उतरले आणि बैलगाडीचा कष्टमय प्रवास करून कुबेर जहागिरीला गेले. परत जाताना लोकमान्य नांदेडला उतरले. त्यांचा पानसुपारीचा सत्कार केल्याचा लेखी उल्लेख


डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक

आहे. ते गोदावरीतही पोहले अशी माहिती इतिहास संशोधक तात्यासाहेब कानोले यांनी सांगितली.

साहित्य प्रांतात नांदेड फार सुदैवी आहे. प्रख्यात कवी वामन पंडित (शेष) हे नांदेडचे. त्यांच्या वंशजांच्या मालमत्तेच्या वाटण्यांचे कागदपत्र आहेत. त्यांचे शेषकुलोत्पन्न वंशज आजही नांदेडमध्ये आहेत. मलिकांबरच्या स्वारीत बरेच ग्रंथ नष्ट झाल्याने मध्यकाळात कुणी विद्वान पंडित असल्याचा पुरावा मात्र शिल्लक नाही. अलीकडच्या काळात म्हणजे मागच्या पिढीत संतकवी दे. ल. महाजन आणि वा. रा. कांत ही दोन नावे महाराष्ट्र ख्यात आहेत. निजामाच्या राज्यात केवळ उर्दू हेच शिक्षणाचे आणि राज्य कारभाराचे माध्यम होते. सरकारी शाळांतून मराठी हा विषय शिकविला जात नसे तरीही पंतोजींच्या खाजगी शाळांतून लोकांनी मराठीचा अभ्यास सुरू ठेवला. पुढे ज्या मोजक्या खाजगी शाळांना परवानगी मिळाली. त्यांनी उर्दू माध्यम स्वीकारुन मराठी हा ऐच्छिक विषय शिकवून विद्यार्थ्यांना मातृभाषेचं ज्ञान देणं सुरू ठेवलं. अशा परिस्थितीत १९३० मध्ये वजिराबादला नांदेडकरांच्या पुंडलिकवाडीत हनुमान वाचनालयाची स्थापना झाली. नंतर नगर वाचनालय सुरु झालं. संस्थानाबाहेरून पुस्तकं मागविणे जिकिरीचे असे. पुस्तकात राजकीय असे काही नाही हे पटवून द्यावं लागे तेव्हा करोडागिरीतून पुस्तकांची सुटका होई.

१९३४ साली पहिले मिडल स्कूल स्थापन झाले. त्याकाळी मराठीसाठी सारे शिक्षक पुण्याहून येत. काटदरे, गोडबोले, जोशी हे काही प्रख्यात शिक्षक! पुढे १९३९ मध्ये प्रतिभा निकेतन शाळेची स्थापना झाली.

गोदावरीवर पहिला पूल १९२७ साली


नगिनाघाट पूल

झाला. त्यापूर्वी हैद्राबादहून येणारे निजामचे ओहरेदार, सरदार नबाब गोदावरीच्या दक्षिण काठावरील मुजामपेठमध्ये मुक्काम करीत आणि दुसऱ्यादिवशी मोठ्या समारंभाने नावेने नदी ओलांडून नंदीगिरी किल्ल्याच्या पश्चिमेकडील राजघाटावर उतरत आणि तिथून किल्ल्यात मुक्कामाला जात असत. नंदीगिरीच्या पूर्वेला नावघाट आहे. पूर्वी नांदेड हे नदी बंदर होतं. परदेशातून आलेला माल पैठणहून नावेत भरून नांदेडला आणण्यात येई. पूर्वेकडूनही तेलंगणातील धान्यधुन्य असंच नावेतून येऊन नावघाटावर उतरे. व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी काठावरच एक सराय बांधलेली आहे. ती आजही तशीच आहे. १०० वर्षापूर्वी शहावली नावाचे एक फकीर तिथे मुक्कामाला आले. त्यांचा लौकिक सर्वत्र पसरला. त्यांची कीर्ती ऐकून निजामाच्या वजिरांनी त्यांचे दर्शन घेण्याची इच्छा व्यक्त केली. नबाबानं साधेपणानं यावं असं वजीर साहेबांन फर्मावलं, पण नवाब लवाजाम्यासह वाजतगाजत आले. ते सराईच्या कमानीत येताच शहावली कडाडले, 'कौन कम्बख्त अंदर आने की जुर्रत कर रहा है?

हकालो उसको'. अपमानित होऊन वजीरसाहेब परत गेले.

वली शहा सर्वधर्म समान मानणारे होते. त्यांचे अनुयाची सर्व धर्मांत होते. काशीनाथराव गोडबोले हे शिक्षक त्यांची सेवा करीत. वलीच्या पायात अळ्या झाल्या होत्या. मास्तरसाहेब रोज जखम पुसून चिमट्यानं अळ्या काढून पट्टी बांधून जात. ते गेल्यावर शहासाहेब पट्टी सोडून सर्व अळ्या जखमेत पुन्हा सोडून देत. 'अल्ला की यही मर्जी है' असं त्याचं म्हणणं असे. वलीशहांची मजार आज सराईत असून पौषी अमावस्येला येळेगावाहून १५० किमी अंतरावरुन येणारी पालखी सराईत मुक्काम करते आणि मजारवर चादर चढवून तारातीर्थला रवाना होते. १०० वर्षांपासून ही प्रथा चालू आहे.


पूर्वी लोकांचा जीवनक्रम नदीवर अवलंबून असे, म्हणून वस्त्याही नदीजवळ पुरापासून सुरक्षित जागी असत. नावघाटावर उतरले की होळी. ही ब्राह्मणांची वस्ती म्हणजे नांदेडची सदाशिव पेठ! पूर्वापार सारं राजकारण होळीवरूनच चाले. होळी आणि सराफा, मारवाडगल्ली हे एक युनिट समजल्यास हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील इतिहास इथेच घडला. श्यामराव बोधनकर, भगवानराव गांजवे, गोपाळशास्त्री देव, विनायकराव डोईफोडे, सरस्वतीबाई सरदेशपांडे, शकुंतलाबाई साल्ये, कावेरीबाई बोधनकर, ताराबाई परांजपे हे स्वातंत्र्यवीर होळीवरचेच.

सराफाचा इतिहास समजल्याशिवाय नांदेड समजणार नाही. सराफातील मंडळींचं 'अर्क' या एकाच विशेषणानं वर्णन करता येईल. महाराष्ट्रात मुंबई, सांगली, जळगाव येथील सराफ बाजार प्रसिद्ध आहेत, पण तिथे सर्वच दुकानं सोन्याचांदीच्या विक्रीची नाहीत. नांदेडला पूर्वेला सराफा चौकापासून (अलिकडचे नाव भोजालाल गवळ चौक) व्यंकटीच्या हॉटेलपासून पूर्वेला कामधेनू हॉटेलपर्यंत दोन्ही बाजूंना केवळ सोने चांदीचीच दुकाने! अपवाद म्हणून दुसरं दुकान नाही. सराफा बाजार एवढा अरुंद की एका ठिकाणी तर दोन लठ्ठ माणसं ऐकमेकांना ओलांडू शकत नाहीत. एका दुकानात सौदा न पटला तर गिऱ्हाइक सरळ उठून समोरच्या दुकानात जातं. तेव्हा पहिला दुकानदार ओरडून दुसऱ्या दुकानदाराला आपण काय भाव सांगितला ते जाहीरपणे सांगतो आणि गिऱ्हाइकाचा फालुदा होतो!

सराफ व्यापाऱ्यांत देशस्थ ब्राह्मण, मराठा, सोनार, कोमटी (आर्यवैश्य) आणि मारवाडी



हुजूर साहिब रेल्वे स्थानक



जुना मोंढा



हिंगोली गेट उड्डाणपूल



शिवाजीनगर

जमातीचा ठेपा आहे. येथे ना परांजपे, गाडगीळ आदी कोकणस्थांचे दुकान आहे ना गुजराती ज्वेलरांचे! सर्वांचे संघटन घट्ट! बरीच मंडळी दुकानांच्याच वरच्या मजल्यावर राहतात तर बाकीचे मारवाडगल्ली आणि होळीवर. रात्री जेवणं झाल्यावर यांचा बंद दुकानाच्या ओट्यावर अड्डा जमतो आणि ज्या गप्पा होतात त्या ऐकून तुम्ही थक्क व्हाल! जगातील प्रत्येक गोष्टीची त्यांना माहिती असते आणि प्रत्येक गोष्टीवर त्यांच्याजवळ तोडगा असतो! कश्मीरचा प्रश्न कसा चुटकीसरशी सोडवावा हा तोडगा त्यांच्याकडून ऐकावा 'तुला काय माहिताय बे, इंदिरा गांधींनी १५ ते २० अटम बम करून बळदात लपवून ठेवलेत' ही माहिती इथंच मिळू शकते. रात्री १२ ते १ वाजता हा अड्डा उठतो. मात्र, गेल्या काही वर्षांतील दंगली, वारंवार लागणारी संचारबंदी यामुळे आता या रात्र अड्ड्यांना ग्रहण लागल्यानं, नांदेडचं एक इरसाल वैशिष्ट्य नष्ट होऊ लागलं आहे.

सराफ मंडळी ही अत्यंत धाडशी आणि चळवळी! निजाम काळात स्टेट काँग्रेसचं ऑफिस सराफ्यातच होतं. सत्याग्रहींच्या तुकड्या इथूनच रवाना होत तेव्हा त्यांना जोशात निरोप दिला जाई. वर सांगितलेली बोधनकर, डोईफोडे, गांजवे, सरसर ही सराफ मंडळीच. नांदेडचं झेंडा प्रकरण फारच गाजलं. हैद्राबाद विलीनीकरणापूर्वीही काँग्रेसच्या कार्यालयावर इंडियन युनियनचा झेंडा फडकत होता. एकदा १० हजार रझाकारांची मिरवणूक निघाली. 'परकी' झेंड्याखालून जाण्याला त्यांची तयारी नव्हती. झेंडा उतरवा असं त्यांचे सांगणं, मिरवणूक ऑफिसजवळ येऊन थांबली. इकडे सर्व सराफ मंडळी बंदुका-भाले तलवारी, गावठी बॉम्ब घेऊन गच्ची गच्चीवर उभे! कुणी थोडी आगळीक केली असती तर सारं नांदेड जळून भस्म झालं असतं असं अनंत भालेरावांनी लिहून ठेवलं आहे, पण गाजलेल्या सिनेमाचा शेवट फ्लॉप व्हावा त्याप्रमाणं होळीवरुन केलेल्या एका बंदुकीच्या बारानेचं रझाकार पळत सुटले. नांदेड वाचलं. सराफा मंडळींच्या शौर्याला सलाम!

प्रत्येक सराफाचंही काही वैशिष्ट्य, काही खोडी! त्यांना बाबूराव हत्ती, पिलू भिंगरी, डबलशेठ अशी नावं दिलेली. नावं एवढी रूढ की बाबुराव म्हणून हाक मारली तर ती दुसऱ्याला आहे असं समजून बाबूराव हत्तीप्रमाणे डोलत पुढे जाणार. प्रत्येकाला वेगळ्या चवीचा चहा लागतो आणि त्या चहाला त्याचंच नाव दिलेलं. नवशिक्या गिऱ्हाइकानं 'कामधेनू' त जाऊन दूध कमी साखर जास्त चहा सांगितला की वेटर ओरडून सांगणार 'एक कप अण्णा औंढेकर बनवा!' सराफा हीच नांदेडची खरी ओळख. पाहुण्यांनी सराफाला अवश्य भेट

द्यावी!

निजाम राज्यात मराठवाड्यात औरंगाबाद आणि नांदेड हीच दोन शहरे गणली जात. इथे लाइट होते. नळाचे पाणी होते. लातूर, परभणीला या सोयी ॲक्शननंतर १९६० साली आल्या. नांदेड हे मराठवाड्यातील एकमेव औद्योगिक शहर! उस्मानशाही मिल्सचे कापड परदेशात जात असे. १९५० मध्ये मराठवाड्यात सर्वप्रथम कॉलेज स्थापन झाले ते नांदेड आणि औरंगाबादला. म्हणून ही दोन शहरे उच्च शिक्षणाच्या गंगोत्री, जन्मोत्री आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० जून १९५० रोजी औरंगाबादेत मिलिंद महाविद्यालय सुरू केलं. त्याच तारखेला स्वामी रामानंद तीर्थ यांनी नांदेडला पीपल्स कॉलेज सुरू केलं. त्यामुळेच पुढे चालून औरंगाबादच्या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेबांचे नाव तर नांदेडच्या विद्यापीठाला स्वामी रामनंद तीर्थ यांचं नाव देण्यात आलं.

कॉलेजच्या निमित्तानं नांदेडची रयाच पालटली. ज्येष्ठ गांधीवादी नेते दादासाहेब बारलिंगे यांचे बंधू सुरेंद्र बारलिंगे कुसुमाग्रजांचे बंधू के. रं. शिरवाडकर, ज्येष्ठ समीक्षक प्रा. स. रा. गाडगीळ, राम शेवाळकर, नरहर कुरुंदकर हे आम्हाला शिक्षक म्हणून लाभले हे आमचं केवढं भाग्य! यांच्यासहित म. म. यज्ञेश्वर शास्त्री कस्तुरे, इतिहास संशोधक तात्यासाहेब कानोले, संगीताचार्य अ. ह. गुंजकर, चित्रमहर्षी त्र्यं. शां. वसेकर, रसिकाग्रणी अण्णासाहेब अंबेकर, नास्तिकाचार्य ग. धों. देशपांडे गुरुजी, हे एकत्र बसले म्हणजे काव्यशास्त्र विनोदाला बहर येत असे. १९५५ ते १९६५ चे दशक म्हणजे नांदेडचा सुवर्णकाळ म्हटला जातो. ग. धों. गुरुजी यज्ञेश्वर शास्त्रींच्या घरी राहत. शास्त्रींबुवा पूजेला बसले की हे नास्तिकाचार्य शेजारी पाट टाकून हे कर्मकांड कसं थोतांड आहे हे सांगत. पूजा आटोपल्यावर शास्त्रीबुवा देवाला नमस्कार करून 'चला आता जेवायला, उरलेला उपदेश जेवताजेवता ऐकतो' असं हसून म्हणत. त्याकाळी कुठे ना कुठं व्याख्यान असेच. वक्ते हेच कधी यज्ञेश्वर शास्त्री पूर्वरंग करीत तर उत्तररंग करण्यास कुरुंदकर गुरुजी, गाडगीळांच्या जडबंबाळ भाषणाला शेवाळकरांच्या नर्म विनोदाचा शिडकावा असे. खरोखरच आम्ही शतकोटी भाग्यवान !

नांदेड हे पूर्वीपासून व्यापारी गाव, नांदेड ही लक्ष्मीपुत्रांची पेठ, कापूस, भुईमुगाचा जबर व्यवसाय. इथे शेकडो वर्षांपासून हातमागाचा व्यवसाय होता. मुसलमान मोमीन, तेलगू पद्मशाली आणि मराठी शाळू (विणकर) या धंद्यात होते. पद्मशाली आणि व्यापारी कोमटी (जे हल्ली स्वत:ला आर्यवैश्य म्हणवितात) मूळचे तेलगू भाषिक, आता ते शंभर टक्के मराठी झाले आहेत.

नांदेडची उस्मानशाही मिल्स ही निजाम संस्थानातील सर्वात मोठी कापड गिरणी. नंतरच्या काळात मफतलाल यांच्या मार्गदर्शनाखाली टेक्सटाइल मिल्स सुरू करण्यात आली आणि नांदेडची समृद्धी कळसावर पोचली. पण गैरकारभार आणि भ्रष्टाचार यामुळे उस्मानशाही मिल्स व टेक्सटाईल मिल्स बंद पडल्या. मिल बंद पडल्या म्हणून १४ जिनिंग मिल्स बंद झाल्या. (तिथं आता हौसिंग सोसायट्या आणि मॉल्स सुरू झाले आहेत). कामगार बेकार झाले. सराफी, कापड दुकानदार हातावर हात ठेवून बसून राहू लागले. दरम्यान मिलमध्ये बेकार झालेले विणकर पुन्हा हातमागाकडे वळले. कुणी तरी हातमागावर टेरिकॉट कापड विणलं. पाहता पाहता ते लोकप्रिय झालं. कोलकत्यापासून कोईमतूरपर्यंत नांदेड म्हटलं की हॅण्डलूम टेरिकॉटचं गाव असं लोक ओळख सांगू लागत. पण हा व्यवसायही फार दिवस टिकला नाही.


श्री. गुरुगोविंदसिंघजी इंजिनिअरिंग कॉलेज


गोदावरी पात्र

आज औद्योगिक शहर ही नांदेडची ओळख राहिली नसली तरी निरनिराळ्या व्यवसायानं नांदेड फुलत फळत आहे. गुरुगोविंदसिंगजींचं वास्तव्य हे नांदेडला आर्शीवादपर ठरलं. गुरुजी नांदेडला आले नसते तर नांदेड हे केवळ कसब्याचं गाव राहिलं असतं. श्री गुरुजींनी नांदेडला लिहिलेल्या ग्रंथासाहेबाला ३०० वर्षे झाली. त्यानिमित्त नांदेडचा कायापालट झाला. केंद्र सरकारच्या हजारो कोटी रुपयांच्या अनुदानातून सारे शहर बदलून गेले. मी जेव्हा नांदेडकडे प्रवाशाच्या त्रयस्थ नजरेने पाहतो तेव्हा हे महाराष्ट्रातील सर्वात सुंदर शहर असावं असं भासू लागतं.

आता नांदेडहून देशाच्या प्रत्येक मोठ्या गावी थेट रेल्वे जाते. पुणे, मुंबई, ओखा, जयपूर, अजमेर, श्रीगंगानगर, अमृतसर, दिल्ली, पाटणा, कोलकत्ता, भुवनेश्वर, विशाखापट्टणम, हैद्राबाद, चेन्नई, तिरुपती, रामेश्वर, तिरुवअनंतपुरम, बेंगळूर, कोल्हापूर येथे जाण्यासाठी नांदेडहूनच सुटणाऱ्या थेट गाड्या आहेत. पुणे, नागपूर येथूनही एवढ्या थेट गाड्या सुटत नाहीत. नांदेडशी हवाई सेवेनं मुंबई, नागपूर, दिल्ली, बंगळूर ही शहरं जोडली आहेत. एवढंच कशाला, काळेश्वराच्या याटावरुन २५ ते ३० खेड्यांसाठी लाँच सर्व्हिस आहे. जमीन, आकाश व जलवाहतूक असलेलं (पण समुद्र किनाऱ्यावर नसलेलं) महाराष्ट्रातलं हे एकमेव शहर असावं. आता शहरानं लोकसंख्येचा ७ लाखाचा आकडा ओलांडला आहे. येथे महापालिका आहे आणि महसूल आयुक्तालयही होणारच आहे. असं हे सुंदर प्रगतिशील शहर, एकदा नव्हे, वारंवार भेट द्यावंसं वाटणारं!

**संपर्क : ९४२२१४८५०८**




# टंचाईला मदत अन् रेल्वे रुळावर !

प्रवीण टाके

सध्या दिल्लीच्या पटलावर राज्याच्या टंचाईचा प्रश्न ऐरणीवर असून अनेक प्रश्नांवर सर्वपक्षीय एकमत होताना दिसते. राज्यातील तरूण खासदारसुद्धा या विषयांसाठी पुढाकार घेत असल्याचे चित्र राज्यासाठी सुखद आहे. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचा दिल्लीतील राजकारणाचा व प्रशासनातला अनुभव आणि त्यांच्या प्रयत्नांना कृषीमंत्री शरद पवार, गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्यासह अन्य वरिष्ठ नेते यांच्या पाठबळामुळे हा प्रभाव ठळकपणे दिसून येतो. फेब्रुवारी व मार्च महिन्यात या सार्वत्रिक एकोप्याची फलश्रुती राज्याच्या टंचाई निवारण्यासाठी मिळालेली भरीव मदत आणि रेल्वे अर्थसंकल्पात लोकप्रतिनिधींच्या मागणीनंतर झालेल्या अतिरिक्त तरतुदीने दिसून आली. रेल्वे अर्थसंकल्पात राहिलेली कमतरता, या अर्थसंकल्पावरील सभागृहातील चर्चेदरम्यान भरून नियाली. अनेक प्रकल्प पदरात पाडून येण्याचे दिव्य सभागृहातील एकीच्या महाराष्ट्र बाण्याने शक्य झाले. शरद पवार यांच्या नेतृत्वात सर्वपक्षीय खासदारांनी थेट पंतप्रधानांची भेट घेऊन अनेक प्रकल्प व मागण्यांकडे त्यांचे लक्ष वेधले.

**टंचाईसाठी मदत**



राष्ट्रपती भवनात शहीद दिनाला हुतात्मा राजगुरू यांच्यावरील डाक तिकीटाचे विमोचन आणि यासाठी जमलेला राजगुरू यांचा परिवार, हा मराठी माणसांसाठी एक कृतज्ञता सोहळा ठरला.

या महिन्यातील प्रमुख उपलब्धी ठरली ती टंचाई निवारण्यासाठी केंद्र शासनाकडून मिळालेली १२०७ कोटींची मदत. टंचाई निवारण्यासाठी केंद्र शासनाने स्थापन केलेल्या उच्चाधिकार प्राप्त मंत्री गटाच्या निर्णयानंतर ही मदत जाहीर करण्यात आली. तत्पूर्वी केंद्राच्या



आंतर मंत्रालय कार्य करणाऱ्या केंद्रीय दलाने राज्यातील टंचाईग्रस्त भागाचा दौरा केला. त्यामुळे या भागात झालेल्या बागांच्या नुकसानाचे नेमके चित्र केंद्र शासनापुढे उभे राहिले आहे. कृषीमंत्री शरद पवार हे उच्चाधिकार प्राप्त या मंत्री गटाचे प्रमुख असून त्यांच्या मते राज्यातील टंचाईची भयानकता १९७२ च्या दुष्काळापेक्षा अधिक आहे. त्यामुळेच देश पातळीवर या टंचाई परिस्थितीची नेमकी वस्तुस्थिती मांडण्यात महाराष्ट्राला यश आले. याशिवाय आवश्यकतेनुसार आणखी मदत केंद्राकडून मिळण्याची राज्याला अपेक्षा आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री सातत्याने केंद्रीय नेत्यांच्या संपर्कात आहेत. या भागातील लोकप्रतिनिधी म्हणून कार्य करणारे केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, केंद्रीय कोळसा राज्य मंत्री प्रतिक पाटील यांनीदेखील टंचाई निवारण्यास पूरक असणाऱ्या खात्यांच्या केंद्रीय मंत्र्यांना या भीषणतेची दाहकता समजून सांगणे सुरू केले आहे.

**सर्वपक्षीय एकोपा**

राज्यातील सर्वपक्षीय एकोप्याचे प्रतीक यंदा रेल्वे अर्थसंकल्पातही पाहायला मिळाले. फेब्रुवारी महिन्यामध्ये रेल्वे अर्थसंकल्प जाहीर झाल्यानंतर रेल्वेबाबत राज्याला आवश्यक प्रतिनिधित्व मिळाले नसल्याची खंत खासदारांनी व्यक्त केली. अनेक प्रकल्पांचा उल्लेख यामध्ये नसल्यामुळे खासदारांच्या भावना तीव्र होत्या. त्यामुळे रेल्वे अर्थसंकल्पात अनेक प्रकल्प व मागण्या का मान्य झाल्या नाहीत या मागणीसाठी तरुण खासदारांनी रेल्वेमंत्री पवनकुमार बन्सल यांची २७ फेब्रुवारीला भेट घेतली. खासदारांच्या भावना त्यांनी समजावून घेतल्या. केवळ अर्थसंकल्पात नोंद नाही म्हणून मुंबई व महाराष्ट्रातील रेल्वेसंदर्भातील सुरू असणारी आणि आधीच मंजूर झालेली कामे मागे पडणार नाहीत, असे आश्वासन रेल्वेमंत्र्यांनी दिले. ज्या प्रकल्पाबाबत खासदारांना संशय होता त्या प्रकल्पांची सद्यस्थिती काय आहे, याची माहितीच त्यांनी उपस्थिती सदस्यांना दिली. याशिवाय मुख्यमंत्र्यांनी संपूर्ण राज्यासाठी केलेल्या शिफारशींवर कार्यवाही सुरू असल्याचे सांगितले.

तथापि, या खुलाशानंतरही काही प्रकल्पांबाबत खासदारांचे समाधान झाले नाही. त्यामुळे १ मार्चला पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांची कृषीमंत्री शरद पवार यांच्या नेतृत्वात सर्व




पक्षाच्या खासदारांनी भेट घेतली. या भेटीमध्ये पंतप्रधानांनी महाराष्ट्रासारख्या राज्याकडे दुर्लक्ष होणार नाही, असे आश्वासन दिले. या एकत्रित दबावाने लोकसभेत पुरवणी मागण्या मंजूर करताना रेल्वे मंत्री पवनकुमार बन्सल यांनी नाशिक-पुणे आणि मनमाड-इंदूर अशा दोन नव्या रेल्वेमार्गाची तसेच मुंबई-कराईकल आणि नागपूर-अजमेर या आठवडी एक्सप्रेस गाडयांची अतिरिक्त घोषणा केली. नाशिक-पुणे हा २६० किमी लांबीच्या रेल्वेमार्गाची घोषणा केली. हा रेल्वेमार्ग नाशिक रोड, सिन्नर, संगमनेर, राजगुरुनगर, चाकण आणि पेगडेवाडी असा असेल. २२०० कोटी रुपयांचा मालेगाव, धुळे, नरडाणा अशा मनमाड-इंदूर रेल्वेमार्गाची घोषणा केली.

याच काळात सर्वोच्च न्यायालयाच्या एका महत्त्वपूर्ण निर्णयाने महाराष्ट्र व आंध्रप्रदेश याच्यातील बाभळी बंधाऱ्यावरून उठलेल्या वादाचा तोडगा निघाला. न्यायालयाने महाराष्ट्राच्या बाजूने निर्णय देत बंधाऱ्याचे पाणी अडविण्याचे राज्याला निर्देश दिले आहेत. २८ ऑक्टोबर पासून महाराष्ट्राला या बंधाऱ्याची दारे बंद करता येणार असून यामुळे नांदेड जिल्ह्यातील २० हजार एकर सिंचनाचा प्रश्न सुटणार आहे. त्यामुळे ५० गावांच्या पिण्याच्या पाण्याचा मार्गही मोकळा होईल. न्यायालयाच्या निर्णयानुसार बाभळी बंधाऱ्यात २.७८ टीएमसी क्षमतेचे पाणी साठवता येणार आहे. सोबतच आंध्रप्रदेशातील पोचमपाड धरणासाठी ०.६ टीएमसी पाणी सोडावे लागणार आहे. नांदेड जिल्हयासाठी ही शुभवार्ता असून धर्माबाद, बिल्लोरी, उमरी, नायगाव, मुदखेड या पाच तालुक्यातील गावांच्या पिण्यासाठी तसेच सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. कोंडलवाडी, धर्माबाद व मुदखेड या नगरपालिकांनाही बाभळी धरणातूनच पाणी पुरवठा होणार आहे.

**मराठीचे बहारदार कार्यक्रम**

मराठी भाषा समृध्दिच्या दोन बहारदार कार्यक्रमाचेही इंडिया गेट साक्षीदार ठरले. नवी दिल्ली हे बृहन्महाराष्ट्रातील मराठी भाषेचे एक प्रमुख केंद्र आहे. दिल्लीत गेली ७० वर्षापासून होणारा नाट्यमहोत्सव, मराठी रंगभूमी दिन, मराठी भाषा दिन, असे अनेक कार्यक्रम अस्मिता प्रदर्शनाची सांस्कृतिक चळवळ असते. या चळवळीला बळ देण्याचे कार्य शासनाच्या सांस्कृतिक विभागामार्फत होतेच. याचे नेतृत्व माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे दिल्लीतील महाराष्ट्र परिचय केंद्र करते. यंदा या केंद्रातर्फे मराठी भाषा दिनाचे आयोजन असेच रंगतदार झाले. राष्ट्रीय महिला आयोगाच्या सदस्य निर्मला सामंत प्रभावळकर आणि खासदार हुसेन दलवाई यांनी भाषा संवर्धनावर प्रबोधनात्मक मार्गदर्शन केले. त्यांनी मराठी भाषा समृद्ध आणि व्यापक करण्यासाठी प्रत्येकाने आपल्या घरापासून सुरुवात केली तर बृहन्महाराष्ट्रात ही भाषा बोलणाऱ्यांचे प्रमाण टिकेल व त्यात उत्तरोत्तर वाढ होईल, असे स्पष्ट केले. महाराष्ट्राबाहेर मराठीच्या प्रेमासाठी होत असलेले प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी अन्य राज्याचे रहिवाशी असणारे आणि मराठी मातृभाषा नसतानाही मराठी शिकलेल्या तीन पत्रकारांचा प्रातिनिधिक सत्कार करण्यात आला. यामध्ये कन्नड वृत्तवाहिनीचे ब्युरोचीफ प्रशांत नातू, हितवादचे दिल्ली प्रतिनिधी राजीव शर्मा, टीव्ही-९ महाराष्ट्र वृत्त वाहिनीचे दिल्ली प्रतिनिधी रणजित सिंह यांचा समावेश होता. महाराष्ट्रात पत्रकारिता आणि महाराष्ट्राचे वृत्तांकन करताना मराठी शिकल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. देशात चवथ्या क्रमांकाची लोकभाषा असणाऱ्या मराठीचे ज्ञान असणे, अभिमानाची बाब असल्याचे पत्रकारांनी यावेळी नमूद केले.

साहित्य संस्कृती मंडळ, मराठी भाषा विभाग, आणि महाराष्ट्र परिचय केंद्राने तीन दिवसांचा ग्रंथोत्सव आयोजित केला. ८ मार्चच्या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून वाचन संस्कार आणि महिलांचा पुढाकार या परिसंवादात दिल्लीच्या सर्व क्षेत्रातील दिग्गज महिलांनी लावलेली उपस्थिती राजधानीतही सावित्री, जिजाऊंचा कणखर बाणा व्यक्त करण्यास पुरेशी ठरली. या काळातच ज्येष्ठ पत्रकार सुरेश भटेवरा यांच्या २४ अकबर रोड या अनुवादित पुस्तकाचे दिग्गजांच्या उपस्थितीतील प्रकाशन गाजले.



माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारे प्रोफेसर सुनयना सिंग लिखित 'रिइनव्हेंटींग लिडरशिप' या पुस्तकाचे प्रकाशन थाटात झाले. एका शानदार सोहळयात पुस्तकाची प्रत राष्ट्रपतींना प्रदान करण्यात आली.

गेल्या काही वर्षात मराठी चित्रपटसृष्टीने कात टाकली आहे. मराठी नाटक आणि चित्रपटाची चर्चा हल्ली मंडी हाऊस परिसरात रंगत आहे. दिल्लीत विक्रम गोखले यांनी अनेक दर्जेदार नाटकांमध्ये अभिनय केला आहे. त्यामुळे त्यांना त्यांच्या कसदार अभिनयासाठी मिळालेला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मराठी नाट्यप्रेमींसाठी आनंदाची पर्वणी ठरली. अभिनेत्री उषा जाधव यांनीही यावर्षी 'धग' चित्रपटातील अभिनयासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार पटकाविला.




**संपर्क : ०९७१७१४०४९५** ❑❑

# हसरं बाळ : एचआयव्ही मुक्त बाळ

MSACS महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था

एचआयव्ही/एड्स आज सार्वजनिक आरोग्याचा एक प्रश्न बनला आहे. सार्वजनिक आरोग्यासाठी सरकार वेगवेगळे कार्यक्रम राबवित असते. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांचा आगळा वेगळा उपक्रम म्हणजे पारंपरिक कलाकार आपल्या कलेद्वारे मनोरंजनातून महाराष्ट्रात अगदी ग्रामीण भागात जाऊन एचआयव्ही/एड्सचा आणि त्याचबरोबर गुप्तरोग हया विषयाची सखोल माहिती कलापथकाच्या माध्यमाद्वारे सांगून प्रबोधन करीत आहेत.



महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा एड्स नियंत्रण विभागातील सर्व सदस्य, खाजगी संस्थेचे कार्यकर्ते, ग्रामपंचायत, आशावर्कर, बचत गटातील महिला, अंगणवाडी सेविका या सर्वांच्या सहकार्याने या कामाची पूर्तता गावपातळीवर केली जाते. सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रातील अतिसंवेदनशील जिल्ह्यांमध्ये एचआयव्ही/एड्स विषयी जास्तीत जास्त जनजागृती करण्यासाठी कलापथक अभियानांतर्गत कार्यक्रम राबविले जातात.

लोककला अकादमी आणि साँग ॲन्ड ड्रामा डिव्हिजन या संस्थेत नोंदणीकृत असलेल्या कलापथकांचीच निवड अभियानाच्या कामासाठी केली जाते. या उपक्रमातील सर्व पारंपरिक कलाकारांना प्रशिक्षण देण्यासाठी दोन दिवसांची कार्यशाळा आयोजित केली जाते. त्या कार्यशाळेत त्यांना आपली कला कशी सादर करावी त्याचबरोबर स्क्रिप्टमध्ये एचआयव्ही/एड्स विषयी योग्य माहिती व संदेश कसे विणायचे तसेच जनमानसातील एचआयव्ही/एड्स विषयी कलंक भेदभाव व संदर्भ सेवा आणि उपाय कुठे केले जातात या संबंधी मार्गदर्शन केले जाते. याशिवाय गावागावातील लिंकवर्कर्स अशा कार्यक्रमात सहभागी होऊन लोकांना मार्गदर्शन करतात.




गोंधळ, भारूड, लोकनाटय, खडीगंमत, शाहीरी पोवाडा या कलाप्रकारांच्या माध्यमातून लोकांचे मनोरंजन करत असताना हळूहळू त्यांना आरोग्याविषयीचा मंत्र दिला जातो. त्यातून ''एचआयव्ही/एड्स'' विषयासंबंधी जनजागृती केली जाते. समाजातील प्रत्येक व्यक्तीला समजेल अशा भाषेत त्या कलाप्रकारचे कथन केले जाते. यासाठी कलापथकांचा योग्य तो सराव करुन घेतला जातो.

या कार्यक्रमादरम्यान कलाकार कार्यक्रम वेळेवर आणि व्यवस्थितपणे सादर करतात की नाही हे पाहण्यासाठी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेमार्फत दोन साधन व्यक्ती सौ. शैला खांडगे (स्वतः) आणि श्री. प्रदीप नाईक आणि श्री. विक्रम पडके हे जिल्हास्तरीय पातळीवर संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा करतात. आपला अहवाल सादर करतात.

**शैला खांडगे**

या अनुषंगाने माझ्या काही प्रतिक्रिया सांगू इच्छिते. मी जेव्हा ग्रामीण भागात फिरते तेव्हा मला खूप वेगळा अनुभव येतो. त्यांच्या शब्दात सांगायचे म्हणजे महाराष्ट्रात गरीब शेतकरी/मजूर जो पक्त पोटासाठी कष्ट करतो व शारीरिक भूक भागविण्यासाठी तो कसलीही पर्वा करत नाही व त्यातील धोके त्याच्या लक्षात येत नाहीत. परंतु महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था यांनी राबविलेल्या या कार्यक्रमाद्वारे जेव्हा गावागावात कलापथक अभियानाद्वारे संदेश दिला जातो त्याचा फायदा निश्चितच त्या गरीब मजुरांना होतो. ज्यावेळी हे कलाकार गावागावात जातात तेव्हा तेथील सरपंचापासून तळागाळातल्या माणसांना एकत्रित करणे व तो कार्यक्रम त्यांनी पाहून काही फायदा होतो का, ते पाहणे हे या साधन व्यक्तींचे काम असते. गावात जेव्हा एचआयव्ही संसर्गित रुग्ण भेटतात तेव्हा त्यांच्याशी बोलल्यानंतर त्यांना एक प्रकारचा आधार मिळतो.

कलाकार गोंधळाच्या माध्यमातून देवांना आव्हान करण्याऐवजी मावशी, आत्या, मामी, मामा, दादा रूपी मानवांना आवाहन करतो.

आम्ही गोंधळी गोंधळी
आम्ही ज्ञानाचे गोंधळी
यालू ज्ञानाचा गोंधळ,
वाजवू जागृती संबळ
तुमच्या गावाला येऊन
आयसीटीसी चे देऊ ज्ञान

लोकनाटयाद्वारे जेव्हा कला सादर करतात तेव्हा ढोलकीच्या तालावर म्हणतात,

बाहेर ख्याली करू नका हो
बायको नुसती का नावाला
एचआयव्हीचा धोका जीवाला हो.
त्याप्रमाणे भारूडातही,
एचआयव्ही संसंर्ग जरी झाला
घोर लाउ नका जीवाला
आयसीटीसी सेंटर जाऊन
घ्या हो तुम्ही सल्ला

कार्यक्रम सादर झाल्यानंतर उपस्थित प्रेक्षकांच्या एचआयव्ही/एड्स विषयी शंकांचे निरसन केले जाते. त्यांना माहितीपत्रक वाटली जातात व साधन हेल्पलाइनचा दूरध्वनी क्रमांक आवर्जून सांगितला जातो जेणेकरून संकोच बाळगणाऱ्यांना या क्रमांकावर फोन करून अधिक व संपूर्ण माहिती मिळवता येते. अशाप्रकारे विविध कलाप्रकारांमधून संपूर्ण महाराष्ट्रात एचआयव्ही/एड्स संबंधी जनजागृती केली जाते.

संपर्क : ९८९२४२३५११

# जंगलात फिरताना हे लक्षात ठेवा...

- जंगल हे प्रथमत: वन्यजीवांचे आश्रयस्थान असून आपणच तेथे पाहुणे आहोत हे लक्षात असू द्या.
- भडक रंगाचे कपडे परिधान करु नका. मोठ्याने बोलू नका.
- वाहनाची गती कमी ठेवा. चढाओढ करु नका. वाहनाचा हॉर्न वाजवू नका.
- वाहनद्वारे फिरत असताना वाहनातून उतरू नका.
- वन्यप्राणी स्वत:चे भक्ष्य शोधण्यास सक्षम आहेत. त्यांना तुमच्या जवळील खाद्यपदार्थ देऊ नका.
- सोबत आणलेल्या प्लॅस्टिकच्या पिशव्या, शीतपेय व पाण्याच्या रिकाम्या बाटल्या, डबे इ. साहित्य सोबतच परत न्या. कचरा योग्य त्या ठिकाणीच टाका.
- अभयारण्यात रेडिओ, टेपरेकॉर्डर वाजवू नका.
- अभयारण्यात धूम्रपान करू नका किंवा विस्तव पेटवू नका. यामुळे वणवा भडकून वन्यजीवांची आश्रयस्थळे व वन्यजीव नष्ट होण्याचा धोका असतो.
- वन्यप्राण्यांच्या व पक्ष्यांच्या सूचक आवाजाकडे लक्ष असू द्या. कदाचित त्यावरून जवळपास असलेल्या प्राणी पक्ष्यांच्या अस्तित्वाची सूचना आपणास मिळेल.
- अभयारण्यात फिरताना ‘डोळे व कान उघडे आणि तोंड बंद’ हे सूत्र लक्षात ठेवा.
- निसर्गाची क्षणचित्रे दीर्घकाळ स्मरणात राहावीत म्हणून दुर्बीण व कॅमेरा सतत सोबत असू द्या व योग्य वेळी त्याचा वापर करा.
- पक्षी व प्राणी निरीक्षणाचे पुस्तक सोबत असू द्या.
- वरील सर्व सूचनांचे पालन आपल्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि वन्यप्राण्यांना विचलित न करता निर्भेळ आनंद घेण्यासाठी महत्त्वाचे आहे.

RABHA

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, April 2013.
Date of Publication : 10th of every Month




O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ

लोकराज्य LOKRAJYA

प्रति / To :

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रमोद त्र्यं. नलावडे, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रमोद त्र्यं. नलावडे